**HIRING ALERT**
Looking For 2 waiters, 2 house boy
(Preffered Male Candidate)
Hotel : Outpost
Job Location : Alibaug
Salary As Per Industry Standards,
Age :- Below 40,
Relevant Experience : 4 to 6 years.
Interested candidates may connect immediately on 8010169688 / 7798467555 & email your latest resume on Sujit.patil@outpostalibaug.com and Pradeep.bhardwaj@Outpostalibaug.com and update your expected salary.

कृषीवल
रायगड, शुक्रवार, दि. २४ एप्रिल २०२६
किंमत ४ ₹

# बोर्लीत 'पेपर'वर विकास

■ ग्रामपंचायतीत कोट्यवधींच्या निधी अपहाराचा संशय व्यक्त

■ चौकशी आदेश असूनही कारवाई शून्य, तक्रारदार प्रतिक कणगी यांचा दावा

। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।

मुरुड तालुक्यातील बोर्ली ग्रामपंचायतीत विकासकामांच्या नावाखाली कोट्यवधी रुपयांचा निधी लाटल्याचा गंभीर आरोप समोर आला असून, चौकशी पूर्ण होऊनही प्रशासनाने कारवाई न केल्याने संपूर्ण यंत्रणाच संशयाच्या भोवऱ्यात अडकली आहे. तक्रारदार प्रतिक कणगी यांनी २५ मार्च रोजी केलेल्या तक्रारीनंतर कोकण विभागीय आयुक्त कार्यालयाने तत्काळ चौकशीचे आदेश दिले. जिल्हा परिषदने चौकशी पूर्ण केली; मात्र, त्यानंतरची प्रशासनाची भूमिका पूर्णतः 'मूकदर्शक' असल्याची टीका होत आहे. बोर्ली ग्रामपंचायतीतील कथित निधी अपहार प्रकरण आता गंभीर वळणावर पोहोचले असून, प्रशासनाच्या निष्क्रियतेमुळे भ्रष्टाचाराला खतपाणी •> पान २ वर




**चौकशीत समोर आलेल्या धक्कादायकबाबी**

गणेश आळी ते नांदगावकर घरापर्यंतचा रस्ता प्रत्यक्षात झालेला नसताना, इतर ठिकाणचे फोटो वापरून बनावट जिओ-टॅगिंगद्वारे निधी खर्च दाखवला. - सुरई अंतर्गत गटार बांधकामासाठी नवीन निधी दाखवला, मात्र प्रत्यक्षात ते गटार १५२० वर्षांपूर्वीचे असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. यामुळे बनावट कागदपत्रे तयार करून सार्वजनिक निधीचा अपहार झाल्याचा गंभीर संशय व्यक्त केला जात आहे.

> बोर्ली येथील कामाच्या तक्रारीबाबत प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली. पाहिजे तसे काम दिसून आले नाही. वरिष्ठांना याबाबत अहवाल पाठविण्यात आला आहे. संबंधित बांधकाम विभागाकडून ती कार्यवाही होणे आवश्यक आहे.
> – राजेश वाडेकर, पंचायत समिती मुरूड

# रुग्ण प्रशासनाला शेकापचा दणका



■ ॲड. मानसी म्हात्रे, सुरेश घरत यांच्या मागणीची दखल

■ संपावर असलेल्या परिचारिका कामावर रुजू

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

जिल्हा रुग्णालयातील परिचारिका गेल्या दोन दिवसांपासून संपावर होत्या. त्यामुळे रुग्णांना अतितातडीची सेवा मिळणे कठीण झाले होते. तसेच, अनेक शस्त्रक्रीया लांबणीवर गेल्या होत्या. त्यामुळे रुग्णांच्या नातेवाईकांमध्ये प्रचंड संताप निर्माण झाला. ही बाब शेकापच्या महिला आघाडी प्रमुख ॲड. मानसी म्हात्रे तसेच तालुका चिटणीस सुरेश घरत यांनी जिल्हा शल्यचिकित्सक यांची भेट घेऊन त्यांच्या निदर्शनास आणली. यावेळी त्यांनी, अत्यावश्यक सेवेतील परिचारिकांना तात्काळ कामावर रूजू करून घ्या, अन्यथा नातेवाईकांसह शेकापतर्फे आंदोलन करू, असा इशारा दिला होता. त्यामुळे शेकापच्या दणक्याने रुग्ण प्रशासन खडबडून जागे झाले असून, संपावर गेलेल्या परिचारिकांना तात्काळ कामावर हजर •> पान २ वर

**मागण्यांकडे दुर्लक्ष**

मंगळवारपासून राज्यातील शासकीय व निमशासकीय कर्मचारी यांनी बेमुदत संप पुकारला आहे. या संपामध्ये महाराष्ट्र गर्व्हनमेंट नर्सेस फेडरेशननेदेखील सहभाग घेतला. परिचारिका कामावर नसल्याने रुग्ण सेवेमध्ये मोठ्या प्रमाणात परिणाम झाला. अनेक तातडीच्या शस्त्रक्रीया लांबणीवर गेल्याने रुग्णांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला होता. कंत्राटी परिचारिकांच्या भरोवश्यावर जिल्हा रुग्णालयातील कारभार चालू होता. कंत्राटी परिचारिकांना १२-१२ तास राबविले जात होते. त्यांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष केले जात होते. रुग्ण प्रशासनाच्या भोंगळ कारभाराबाबत रुग्णांच्या नातेवाईकांमध्ये असंतोष निर्माण झाला होता.

## वेधक

### आ. गायकवाडांची प्रकाशकाला धमकी

**मुंबई :** आमदार निवासातील कँटीनमध्ये कर्मचाऱ्याला मारहाण केल्यामुळे वादात सापडल्यानंतर आमदार संजय गायकवाड यांनी पुन्हा एकदा नवा वाद ओढवून घेतला आहे. शिवाजी कोण होता? या दिवगंत कॉम्रेड गोविंद पानसरे यांच्या पुस्तकाचे प्रकाशक प्रशांत आंबी यांना अश्लील शिवीगाळ करुन जीवे मारण्याची धमकी संजय गायकवाड यांनी दिल्याचा आरोप केला जात आहे.१९८८ मध्ये लिहलेल्या शिवाजी कोण होता? या पुस्तकाचा आमदार गायकवाड यांना अचानक साक्षात्कार झाला आहे. त्यांनी प्रकाशकाला अर्वाच्य भाषेत शिवीगाळ करुन धमकी दिल्याने सर्वच स्तरातून तीव्र प्रतिक्रिया समोर येऊ लागल्या आहेत. गायकवाड यांनी प्रशांत आंबी यांना फोन •> पान २ वर

### अशोक खरात प्रकरण भोवलं

**मुंबई :** अशोक खरातची वेगवेगळ्या प्रकरणांमध्ये सखोल चौकशी सुरू आहे. याआधी अनेक नेते आणि महत्त्वाच्या पदावरील व्यक्ती अशोक खरातच्या संपर्कात होते, अशी माहिती समोर आलेली आहे. अशातच आता एका बड्या व्यक्तीला आपल्या पदाचा राजीनामा द्यावा लागला आहे. समता पतसंस्थेचे संस्थापक काका कोयटे यांनी राज्य पतसंस्था फेडरेशनच्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला आहे. गेल्या अनेक वर्षांपासून काका कोयटे फेडरेशनचे अध्यक्ष होते; काही दिवसांपूर्वी अशोक खरात याचे समता पतसंस्थेशी कनेक्शन समोर आल्यानंतर सभासदांकडून राजीनाम्याची मागणी करण्यात आली होती.

### सोने, चांदीच्या दरात घसरण

**नवी दिल्ली :** अमेरिका आणि इराण यांच्यातील युद्धात सिझ फायर कालावधी संपताच सोन्या चांदीच्या दरावर मोठा परिणाम झाला आहे. सोने आणि चांदीचे भाव सराफ बाजारात अस्थिर असल्याचे पाहायला मिळाले. सतत या भावांमध्ये मोठी वाढ झाली आहे. मात्र, गरूवारी (दि.२३) भाव चांगलेच घसरले आहेत. सोन्याच्या दरात १,२०० रुपयांची घसरण झाली आहे. तर, चांदीच्या दरात ५ हजार रुपयांची घसरण झाली आहे. ही घसरण पाहून अनेकांना आनंद झाला आहे. त्यामुळे गुरूवारी (दि.२३) १० ग्रॅम सोन्याचा भाव जीएसटीसह १ लाख ५५ हजार ५३० रुपयांवर आला आहे. तर, चांदीचे दर जीएसटीसह २ लाख ५५ हजार ४४० रुपयांवर आले आहेत. सोने चांदीचे दर घसरल्याने ग्राहकांना काही प्रमाणात दिलासा मिळाला आहे.

# खंडाळेत प्रचाराला सुरुवात

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

**चित्रलेखा पाटील यांची उपस्थिती**



अलिबाग तालुक्यातील नागाव, वैजाली व खंडाळे ग्रामपंचायतीच्या तीन सदस्यपदांच्या जागांसाठी निवडणूक होणार आहे. त्या पार्श्वभूमीवर शेतकरी कामगार पक्षाच्यावतीने प्रचाराला सुरूवात करण्यात आली आहे. खंडाळच्या सदस्यपदाच्या उमेदवार समिक्षा सागर गुरव यांच्या प्रचाराला बुधवारी (दि.२२) सायंकाळी तळवली येथील मारुती मंदिर नाका येथून शेकाप प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांच्या हस्ते सुरुवात झाली.

यावेळी रायगड बाजाराचे उपाध्यक्ष प्रमोद घासे, माजी सरपंच संतोष गुरव, नरेश गोंधळी, विलास वालेकर, सुधीर पाटील, अनिल माळी, अनिल पाटील, उदय वेळे, संदेश पाटील, दिलीप वेळे, राजेंद्र पाटील, सुनील नाईक, सुप्रिया नाईक, सविता वेळे, कविता वेळे, नमिता वेळे, मनोहर पाटील, सागर गुरव, रेश्मा नाईक, साधना पाटील, मयुरी घरत, तृप्ती घरत, सुधीर कवळे, गिता थळे, रुपेश वेळे आदींसह ग्रामस्थ, शकाप कार्यकर्ते व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

खंडाळे ग्रामपंचायतीच्या प्रभाग ४ मधील पोट निवडणूकमध्ये शेतकरी कामगार •> पान २ वर

# टोरंट कंपनीकडून पाण्याची चोरी

**राजनाला कालव्यात मोटार लावून पाण्याचा उपसा**

। कर्जत । प्रतिनिधी ।

कर्जत तालुक्यातील पाली पोटल भागात टोरंट कंपनी जलविद्युत प्रकल्प उभारणार आहे. या प्रकल्पाला शासनाने तांत्रिक मान्यता दिली आहे; परंतु, या प्रकल्पाला सर्वस्तरातून विरोध होत आहे. त्यात आता या प्रकल्पाच्या ड्रॉलिंगच्या कामासाठी आणि येथे राहणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी आवश्यक असलेले पाणी राजनाला कालव्यातून उचलले जात आहे. दरम्यान, कालव्याचे पाणी शेतीसाठी असताना टोरंट कंपनीकडन राजनाला कालव्याच्या बंधाऱ्यातील पाणी मोटारीच्या आधारे उचलले जात आहे. त्यामुळे खासगी कंपनीला कोणत्या आधारे पाणी दिले जात आहे, असा प्रश्न स्थानिकांनी उपस्थित केला आहे.

टोरंट कंपनी पाली तर्फे कोतवाल खल्लाटीमधील साई डोंगर तसेच ढाक डोंगर येथे दोन जलविद्युत प्रकल्प उभारणार आहे. या प्रकल्पासाठी शेतकऱ्यांनी जमिनी दिल्या नाहीत, असे असताना आदिवासी शेतकऱ्यांच्या जमिनीमध्ये घुसखोरी करून माती आणि दगडांची तपासणी करण्यासाठी ड्रिलिंग केले जात आहे. या कामासाठी लागणारे पाणी उन्हाळ्यात कोरड्या असलेल्या पेज नदीमध्ये मिळू शकत नाही. त्यामुळे टोरंट कंपनीने मोठी शक्कल लढवली असून येथील आदिवासी वाडीच्या बाजूने आंध्र धरणातील वीज निर्मिती झालेले पाणी शेतीसाठी कालव्यातून सोडले जाते. पाणी शेतीसाठी मिळावे म्हणून बंधारा बांधला असून त्या बंधाऱ्यातून पुढे पोटल गावाकडे असलेल्या कालव्यात पाणी सोडले जाते. मात्र, त्याआधी •> पान २ वर



**पाटबंधारे खात्याची संशयास्पद भूमिका**

टोरंट कंपनीने त्या ठिकाणी असलेल्या पाणी साठवण बंधाऱ्यातून चक्क मोटार लावून पाणी किमान २ किलोमीटर पर्यंत नेले आहे. त्याचवेळी तेथे असलेल्या कर्मचाऱ्यांना पाणी दिले आहे. तर, माती आणि दगड परीक्षण करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर पाणी लागत असून ते सर्व पाणी कालव्यातून बेकायदा उचलले जात आहे. याबाबत पाटबंधारे विभागाकडे माहिती घेतली असता कर्जत पाटबंधारे विभागाचे उप अभियंता अमित पारधे यांनी, मंत्रालय स्तरावरून पाणी उचलण्याची परवानगी दिली असल्याचे सांगितले. स्थानिक पातळीवर पाणीपट्टी भरल्याशिवाय पाणी उचलून दिले जात नाही, असे असताना पाटबंधारे खात्याची भूमिका संशयास्पद असल्याचे शेतकरी बोलत आहेत.

# बारामतीमध्ये ५२.४४ टक्के मतदान

। मुंबई । प्रतिनिधी ।

बारामती आणि राहुरी या विधानसभा मतदारसंघांसाठी पोटनिवडणूक पार पडली आहे. बारामतीमध्ये सरासरी ५२.४४ टक्के मतदानाची नोंद झाली असून, राहुरीमध्ये सायंकाळी ५ वाजेपर्यंत सरासरी ५०.६८ टक्के मतदान झाले आहे. पुणे जिल्ह्यातील बारामती विधानसभा जागेसाठीची पोटनिवडणूक, तत्कालीन उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनामुळे आवश्यक ठरली. अजित पवार यांचे २८ जानेवारी रोजी एका विमान अपघातात निधन झाले होते. त्यांची पत्नी आणि उपमुख्यमंत्री, सुनेत्रा पवार या या जागेवरून निवडणूक लढवत आहेत. महाविकास आघाडीने या जागेसाठी कोणताही उमेदवार उभा केला नसला, तरी या निवडणुकीच्या रिंगणात इतर २२ उमेदवार आहेत. दरम्यान, अहिल्यानगर जिल्ह्यातील राहुरी विधानसभा जागेसाठीची पोटनिवडणूक, गेल्या वर्षी ऑक्टोबरमध्ये भाजपचे आमदार शिवाजी कर्डिले यांच्या निधनामुळे आवश्यक ठरली. त्यांचे पुत्र आणि भाजपचे उमेदवार अक्षय कर्डिले हे राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार गोविंद मोकाटे आणि वंचित बहुजन आघाडीचे संतोष चालके यांच्यासह निवडणुकीच्या रिंगणात आहेत. मतमोजणी ४ मे रोजी होणार आहे. •> पान २ वर

# पळस्पे फाट्याजवळ महिलेचा विनयभंग

। नवीन पनवेल । प्रतिनिधी ।

गाडीची बॅटरी खराब झाली आहे, तुला मी फुकट नवीन बॅटरी घेऊन देतो, असे बोलून हाताला स्पर्श करून जवळीक साधण्याचा प्रयत्न केल्या प्रकरणी एका व्यक्ती विरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दि.२१ एप्रिल रोजी सकाळच्या सुमारास पीडित महिला त्यांच्या चुलत भावाच्या गाडीमध्ये जात होती. त्यावेळी गाडीची बॅटरी चेक करायला ते पळस्पे फाटा पनवेल येथे थांबले. त्यावेळी दुकानदाराने बॅटरी चेक करून बॅटरी खराब झाली आहे, असे सांगून 'तुला फुकट नवीन बॅटरी घेऊन देतो' असे बोलून महिलेच्या हाताला स्पर्श केला आणि जवळीक साधण्याचा प्रयत्न केला.

# रिलायन्सच्या सुरक्षा अधिकाऱ्याची मुजोरी




■ अपघाताचे वार्तांकन करताना रोखले

■ पत्रकार संघटनांसह पत्रकारांकडून निषेध व्यक्त

। पाली/बेणसे । प्रतिनिधी ।

पत्रकारांवरील वाढते हल्ले, दबाव, मुस्कटदाबी सारख्या घटना वाढल्या असताना आता पत्रकारांना आपले कर्तव्ये बजावण्यासाठी रोखण्याचे काम काही महाभाग करीत आहेत. असाच संतापजनक प्रकार गुरुवारी रिलायन्स नागोठणे मटेरियल गेटसमोर घडला. नागोठणे-पोयनाड मार्गावर रिलायन्स कंपनीतील एका कारने एका व्यक्तीला जोरदार धडक दिली. या अपघातात त्या व्यक्तीच्या पायाला गंभीर दुखापत झाली. रुग्णवाहिका येईपर्यंत प्रतीक्षा करीत असताना यावेळी घटनास्थळी उपस्थित असलेले पत्रकार धम्मशील सावंत यांनी वार्तांकन करण्याच्या हेतूने मोबाईलमध्ये व्हिडीओ व फोटो घेण्यास सुरुवात केली. मात्र, या ठिकाणी उपस्थित असलेल्या रिलायन्सच्या आरजीएसएसच्या सुरक्षा अधिकाऱ्याने, 'पत्रकार असलेत तरी व्हिडीओ करू शकत नाही', असे सांगत हातातून मोबाईल खेचून घेतला. सुरक्षा अधिकाऱ्याने आपला मुजोर व उर्मठपणा कायम ठेवला. त्यामुळे रिलायन्सच्या सुरक्षा अधिकाऱ्याच्या या कृतीचे व घटनेचा राज्यातील पत्रकार संघटनांसह पत्रकारांनी निषेध दर्शविला आहे. दरम्यान, रिलायन्स व्यवस्थापन अशा मुजोर सुरक्षा अधिकाऱ्याला समज देणार की पुन्हा अशी मुजोरी करायला बळ देणार हे पाहणे औत्सुक्याचे आहे.

# ॲन्टोनी गॅरेजेस कंपनीत आग

। रसायनी । प्रतिनिधी ।

रसायनी पाताळगंगा अतिरिक्त औद्योगिक क्षेत्रातील चांवढोली गावानजिक असणाऱ्या ॲन्टोनी गॅरेजेस प्रा.लि. कंपनीच्या यार्डला भीषण आग लागण्याची घटना घडली. या आगीमुळे कंपनी यार्डमध्ये असलेल्या वाहनांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या आगीमध्ये त्या ठिकाणी असलेल्या बसेस जळून सुमारे ३६ लाख २५ हजार रुपये इतके नुकसान झाले आहे. याबाबत प्रविण मुंढे यांनी रसायनी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असून रसायनी पोलीस ठाण्याचे पोलीस निरिक्षक अभिजीत भुजबळ यांच्या मार्गदर्शनाखाली मपोना शेळके पास करीत आहेत.

### दुचाकी घसरल्याने तरुणाचा मृत्यू

**पोलादपूर :** शहरातील पश्चिमेकडील सर्व्हिस रोडवर एक्टिव्हा घसरल्याने तरुण गंभीर जखमी झाला होता. बुधवारी (दि.२२) सायंकाळी साडेसात वाजण्याच्या सुमारास झालेल्या अपघातातील जखमी तरूणावर प्राथमिक उपचार करून त्याला पनवेल येथे रवाना करण्यात आले. परंतु, नागोठणेदरम्यान त्या तरूणाचा मृत्यू झाला. मिळालेल्या माहितीनुसार, महालगुर येथील जय धोंडू कदम हा कामानिमित्त एक्टिव्हावरून पश्चिमेकडील सर्व्हिस रोडवरून जात होता. यावेळी एक्टिव्हा घसरल्याने जय कदम हा रोडच्या डिव्हायडरवर आदळला. त्यामुळे त्याच्या डोक्याला खोलवर जखम होऊन रक्त वाहू •> पान २ वर

**मीठ उत्पादनात मोठी घट** | **परंपरागत व्यवसाय वाचवण्यासाठी धडपड**

# पेणची मिठागरे इतिहासजमा

संतोष पाटील
। पेण ।

पेण तालुका हा पूर्वी मिठाच्या उत्पादनासाठी प्रसिद्ध होता. तालुक्यात तब्बल २७ मिठागरे कार्यरत होती. भातशेती आणि गणपती व्यवसायासोबत मीठ उद्योग हा स्थानिक अर्थकारणाचा कणा होता. छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळापासून राजाश्रय लाभलेल्या या उद्योगाची आज मोठी पडझड झाली आहे. मोजकेच शेतकरी आणि काही जिद्दी कारभारी अजूनही हा पारंपरिक व्यवसाय टिकवण्यासाठी धडपड करीत आहेत.

पेण तालुक्यातील अंतोरा येथील बशीर कासम आणि त्यांचे बंधू, पेण देवआळीतील सदानंद देव आणि त्यांचे बंधू, तसेच सध्याच्या नगरपालिकेच्या ठिकाणी हजारोंची मिठ गिरणी अशी मोठी उत्पादन केंद्रे होती. भूंडा पुलाजवळील भागातही मीठ गिरण्या कार्यरत होत्या. या गिरण्यांमधून तयार होणारे मीठ मोठ्या प्रमाणावर धारावीपर्यंत पाठवले जात असे. गावोगावी बैलगाड्यांमधून मीठ विक्री करणारे विक्रेते हे त्या काळचे वैशिष्ट्य होते. "मीठवाले मीठ" अशी हाक ऐकून महिलांची लगबग उडायची आणि पावसाळ्यासाठी खड्या मिठाची साठवण केली जायची. मात्र, बदलत्या काळात हे चित्र पूर्णपणे बदलले. बैलगाड्या लुप्त झाल्या आणि मीठ विक्रीची पारंपरिक पद्धतही इतिहासजमा झाली. •> पान २ वर



**एक नजर आकडेवारीवर**

पूर्वी मिठागरे: २७, सध्या कार्यरत: ४, पूर्वीचे उत्पादन: ३०-३५ हजार टन/वर्ष, सध्याचे उत्पादन: १,५०० ते २,००० टन/वर्ष, प्रमुख बाजारपेठ: पुणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, खोपोली.

> मीठ म्हणजे शेतकऱ्याचे पांढरे सोने आहे. वडिलोपार्जित व्यवसाय बंद करायचा नाही म्हणून तोटा सहन करत मीठ उत्पादन सुरू ठेवले आहे. मात्र मजुरांची कमतरता, अवकाळी पाऊस आणि वाढते खर्च यामुळे हा व्यवसाय टिकवणे कठीण होत चालले आहे.
> – कल्पेश पाटील, मीठ उत्पादक, शिर्की

# गो मासाची वाहतुक करण्याला अटक

। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।

श्रीवर्धन पोलिसांनी बुधवारी (दि.२२) सकाळी साडेसात वाजता श्रीवर्धन-म्हसळा मार्गावरती २४ किलो गोवंशीय मासाची वाहतूक करणाऱ्या आरोपीला रंगेहात पकडले आहे. त्यामुळे पुन्हा एकदा गोवंश मासाची विक्री होण्याची घटना पकडण्यात पोलिसांना यश आले आहे. या प्रकरणी अझमततुल्ला अब्दुल रशीद नाडकर (६०) यांच्या विरोधात श्रीवर्धन पोलीस ठाण्यात गुन्हा करण्यात आला आहे. या गुन्ह्यात वापरलेली काळ्या रंगाची स्कुटी देखील पोलिसांनी ताब्यात घेतली आहे. या प्रकरणाचा अधिक तपास श्रीवर्धनचे पोलीस निरीक्षक सुरेंद्र गरड यांचे मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक प्रदीप राठोड हे करीत आहेत. पोलिसांनी केलेल्या या कारवाई बद्दल हिंदुत्ववादी संघटनांनी पोलिसांचे आभार मानले आहेत.

परंतु, या अगोदर देखील मेटकर्णी येथील एका आरोपीला स्कुटीवरून गोवंश मांस घेऊन येताना पोलिसांनी पकडले होते. हे मांस माणगाव तालुक्यातील मोरबा येथून आणल्याचे आरोपीने सांगितले आहे. त्यामुळे या ठिकाणी मोठ्या प्रमाणात गोवंशाची कत्तल केली जात आहे. परंतु, या प्रकाराकडे पोलिसांचे सपशेलपणे दुर्लक्ष होत असल्याचे स्थानिकांमधून बोलले जात आहे. त्यामुळे हे रायगड जिल्हा पोलिसांचे अपयशच म्हणावे लागेल. राज्यात गोवंश हत्या बंदीचा •> पान २ वर

पान १ वरून

## दुचाकी घसरल्याने तरुणाचा मृत्यू

लागल्याने तो अत्यवस्थ झाला. अपघाताची माहिती मिळताच पोलादपूरचे सहाय्यक पोलीस निरीक्षक आनंद रावडे, पोलीस हवलदार संदीप कदम, पोलीस कर्मचारी यांच्यासह स्थानिक नागरिकांनी घटनास्थळी धाव घेत जखमी तरुणाला पोलादपूर ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. त्याठिकाणी प्राथमिक उपचार करून अधिक उपचारासाठी पनवेल एमजीएम हॉस्पिटलमध्ये हलविण्यात आले. मात्र, जय कदम याला रूग्णवाहिकेने पनवेलकडे नेत असताना नागोठणेदरम्यान त्याचा मृत्यू झाला त्यामुळे त्याचा मृतदेह पुन्हा पोलादपूरला आणण्यात आला.

## आ. गायकवाडांची प्रकाशकाला धमकी

करुन अश्लील शिवीगाळ केली, याचा कथित ऑडीओ सध्या समाज माध्यमांवर व्हायरल होत आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचा एकेरी उल्लेख करणारा गोविंद पानसरे कोण? असे म्हणत गायकवाड आंबी यांना घरात घुसून मारीन, चिरडून टाकण्याची आणि जीभ कापून टाकण्याची धमकी या ऑडीत देत आहेत. तसेच, पानसरेंचे काय झाले? माहिती आहे ना? असाही इशारा दिला. गायकवाड आणि आंबी यांचा समोर आलेल्या कथित ऑडीओत त्यांना अत्यंत अश्लील शिवीगाळ केल्याचे समोर आले आहे. गायकवाड आंबी यांनी तू ब्राम्हण आहेस का? असे विचारत असल्याचे देखील या ऑडीओतून समोर आले आहे. त्यामुळे आमदार गायकवाड यांच्या वक्तव्याचा निषेध करण्यासह त्यांच्यावर जोरदार टीका केली जात आहे.

## रुग्ण प्रशासनाला शेकापचा दणका

राहण्यास सांगण्यात आले. शेकापच्या दणक्याने काही तासातच  सायंकाळी परिचारिका कामावर रुजू झाल्या.

अलिबागमधील जिल्हा सामान्य रुग्णालयात मोठ्या प्रमाणात रुग्ण उपचारासाठी येत असतात. शहरी भागासह ग्रामीण भागातील हजारो रुग्ण रुग्णालयात येऊन उपचार घेतात. जिल्हा रुग्णालयातील बाह्य रुग्ण कक्षामध्ये सकाळी प्रचंड गर्दी होते. वेगवेगळ्या तपासणीसाठी रुग्ण रुग्णालयात येतात. मंगळवार (दि.२१) पासून राज्यातील शासकीय व निमशासकीय कर्मचारी यांनी बेमुदत संप पुकारला आहे. या संपामध्ये महाराष्ट्र गर्व्हनमेंट नर्सेस फेडरेशननेदेखील सहभाग घेतला. परिचारिका कामावर नसल्याने रुग्ण सेवेमध्ये मोठ्या प्रमाणात परिणाम झाला. अनेक तातडीच्या शस्त्रक्रीया लांबणीवर गेल्याने रुग्णांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला होता. कंत्राटी परिचारिकांच्या भरोवश्यावर जिल्हा रुग्णालयातील कारभार चालू होता. कंत्राटी परिचारिकांना १२-१२ तास राबविले जात होते. त्यांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष केले जात होते. रुग्ण प्रशासनाच्या भोंगळ कारभाराबाबत रुग्णांच्या नातेवाईकांमध्ये असंतोष निर्माण झाला होता. ही बाब शेकाप महिला आघाडी प्रमुख ॲड. मानसी म्हात्रे तसेच सुरेश घरत यांच्या लक्षात आली. त्यांनी गुरुवारी (दि.२३) सकाळी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. निशीकांत पाटील यांची भेट घेतली. शेकापच्यावतीने तसेच रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांच्या मार्फत जिल्हा रुग्णालयासमोर आंदोलन केले जाईल, अशा इशारा शेकाप महिला आघाडी प्रमुख ॲड. मानसी म्हात्रे यांनी दिला होता. शेकापच्या दणक्याने रुग्ण प्रशासन खडबडून जागे झाले आणि संपावर गेलेल्या परिचारिकांना तात्काळ कामावर रूज व्हा, अशी सुचना जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. निशीकांत पाटील यांनी  केली. त्यानंतर काही तासातच परिचारिका सायंकाळी कामावर रूजू झाल्या.

## खंडाळेत प्रचाराला सुरुवात

पक्षाचे उमेदवार समीक्षा सागर गुरव यांच्या प्रचाराचा नारळ वाढविण्यात आला. यावेळी घरोघरी जाऊन प्रचार करण्यात आला. या प्रचाराला कार्यकर्त्यांसह मतदारांकडून उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला. तालुक्यातील वैजाली ग्रामपंचायतीच्या एक सदस्यपदासाठी दोन, नागावच्या एक सदस्यपदासाठी दोन आणि खंडाळेच्या एक सदस्यपदासाठी तीन उमेदवारी अर्ज दाखल झाले आहेत. वैजाली, खंडाळे व नागाव या ग्रामपंचायतीच्या तीन सदस्यपदाच्या जागांसाठी पोट निवडणूक होणार आहे. दि.२८ एप्रिलमध्ये सकाळी साडेसात वाजल्यापासून मतदानाला सुरुवात होणार आहे. मतमोजणी दुसऱ्या दिवशी दि.२९ एप्रिलला होणार आहे. नागाव ग्रामपंचायतीच्या सदस्यपदाच्या उमेदवार मंजुषा राणे, वैजाली ग्रामपंचायतीच्या सदस्यपदाचे उमेदवार नंदकुमार प्रभाकर पाटील, खंडाळे ग्रामपंचायतीच्या सदस्यपदाचे उमेदवार समिक्षा सागर गुरव हे शेकापचे उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहे.

## पेणची मिठागरे इतिहासजमा

एकेकाळी दरवर्षी ३० ते ३५ हजार टन उत्पादन करणारा हा उद्योग आज केवळ दीड ते दोन हजार टनांवर आला आहे.

पूर्वी उचेडे, कांदळेपाडा, मळेघर, पिंपळपाडा या भागातील अनेक पुरुष व महिलांना मिठागरांमध्ये रोजगार मिळत होता. कांदळे येथील अनंत पाटील आणि बाळाराम ठाकूर हे मुकादम म्हणून काम पाहात असत आणि त्यांच्या मार्गदर्शनाखाली ३० ते ३५ तरुण कार्यरत होते. आज मात्र स्थानिक तरुण या व्यवसायाकडे वळत नसल्याने गुजरातमधून मजूर आणण्याची वेळ आली आहे. सध्या २७ मिठागरांपैकी केवळ चारच मिठागरे कार्यरत असून त्यात चिखली अगर, हीरा अगर आणि वाहना अगर यांचा समावेश आहे. येथे तयार होणारे मीठ पुणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग आणि खोपोली येथे पाठवले जाते. वीटभट्टी, औद्योगिक वापर, बर्फनिर्मिती तसेच अर्थिंगसाठी या मिठाचा उपयोग केला जातो.

शहरीकरण, जमिनींची विक्री आणि बदललेली जीवनशैली यामुळे मीठ उद्योगाला मोठा फटका बसला आहे. काही ठिकाणी धनदांडग्यांनी कमी दरात मिठागरांची जमीन खरेदी केल्याने हा पारंपरिक व्यवसाय अधिकच कमी झाला आहे. तरीही काही शेतकरी हा वडिलोपार्जित व्यवसाय टिकवण्यासाठी तोटा सहन करत प्रयत्नशील आहेत.

## बोर्लीत 'पेपर'वर विकास

मिळत असल्याची टीका होत आहे. आता या प्रकरणात सरकार व वरिष्ठ अधिकाऱ्यांची पुढील भूमिका काय असेल, याकडे संपूर्ण रायगड जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

**चौकशी पूर्ण, पण कारवाई कुठेय?**

१ जानेवारी २०२६ रोजी प्रत्यक्ष चौकशी पूर्ण झाली असे तक्रारदार प्रतिक कणगी यांचे म्हणणे आहे. तरीही २३ एप्रिल २०२६ पर्यंत ना फौजदारी गुन्हा, ना प्रशासकीय कारवाई झाली. शासनाच्या नियमांनुसार ४ जानेवारी २०१७ च्या परिपत्रकानुसार १ महिन्यात कारवाई बंधनकारक असताना प्रशासन या प्रकरणाकडे का दुर्लक्ष करतंय याबाबत अनेक प्रश्न उपस्थित झाले आहेत. याशिवाय दोषींवर फौजदारी गुन्हे दाखल करणे बंधनकारक असून अपहार झालेली रक्कम वसूल करणे आवश्यक आहे. मात्र या प्रकरणात सर्व नियम पायदळी तुडवले गेल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. परिणामी, हे प्रकरण जाणीवपूर्वक दडपले जात असल्याचा संशय कणगी यांनी व्यक्त केला आहे.

**संगनमताचा संशय**

तक्रारदाराने सरपंच, ग्रामसेवक, गटविकास अधिकारी, अभियंता व ठेकेदार यांच्यात संगनमत असल्याचा गंभीर आरोप केला आहे. तसेच तात्काळ कारवाई न झाल्यास हे प्रकरण, लोकायुक्त व उच्च न्यायालयात नेले जाईल, असा इशारा तक्रारदाराने दिला आहे.

**प्रशासकीय कामकाजावर प्रश्नचिन्ह**

चौकशी आदेश असूनही कारवाई होत नसल्याने प्रशासनाची भूमिका संशयास्पद असल्याचे नागरिकांकडून बोलले जात आहे. भ्रष्टाचार प्रकरण दडपण्याचा प्रयत्न करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई कधी होणार, असा प्रश्नही उपस्थित केला जात आहे.

## टोरंट कंपनीकडून पाण्याची चोरी

पाणी साठवण बंधाऱ्यातून पाणी चोरण्याचे काम टोरंट कंपनीकडून केले जात आहे. टोरंट कंपनीने त्या ठिकाणी शेतीसाठी असलेले पाणी साठवण बंधाऱ्यातून पंपाद्वारे उचलले आहे. त्यासाठी कर्जत येथील पाटबंधारे विभागाचे उप विभागीय अधिकारी कार्यालयातून परवानगी घेणे आवश्यक आहे. शेतीसाठी असणारे पाणी अन्य वापरासाठी उचलले जात असेल तर त्यास परवानगी देता येते काय? याबाबत शंका स्थानिकांनी व्यक्त केली आहे. दरम्यान, औद्योगिक कामासाठी राजनाला कालवा पाणी वापरता येते की नाही याबाबत पाटबंधारे विभागाने आम्हाला सांगावे, अशी मागणी पप्पू देशमुख यांनी केली आहे.

## गो मासाची वाहतुक करण्याला अटक

कायदा लागू झाल्यापासून रायगड जिल्ह्यातील कर्जत, महाड, माणगाव त्याचप्रमाणे श्रीवर्धन तालुक्यात गोवंशाची कत्तल होत असल्याचे पाहायला मिळाले होते. तरी रायगडच्या पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांनी याबाबत तातडीने कारवाई करावी, अशी मागणी विश्व हिंदू परिषद व बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांकडून केली जात आहे.


### कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड
(भारत सरकारचा उपक्रम)

सादर सेवा

**ई-लिलाव सूचना**

कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लि. कडून व्यावसायिक करारांचा ई-लिलाव जाहीर करण्यात येत असून तो आयआरईपीएस ई-निविदा प्रणालीवर खालील वेळापत्रकानुसार प्रकाशित करण्यात आलेला आहे.

| अ. क्र. | कराराचे नाव | करारांची / लॉट्सची संख्या | ई-लिलावाची दिनांक व वेळ |
|---|---|---|---|
| 1 | मडगाव – मंगळुरू सेंट्रल – मडगाव (10107/10108) मेमू ट्रेन तसेच दिवा – सावंतवाडी पॅसेंजर (10105/10106) ट्रेनमध्ये अंतर्गत जाहिरातींचे प्रदर्शन | 02 | 30/04/2026 रोजी 11:00 वाजता |
| 2 | मडगाव येथे पार्सल स्कॅनर | 01 | 30/04/2026 रोजी 11:00 वाजता |
| 3 | प्रधानमंत्री भारतीय जन औषधी केंद्र (पीएमबीजेके) – मडगाव | 01 | 30/04/2026 रोजी 11:00 वाजता |
| 4 | दिवा – सावंतवाडी पॅसेंजर (10105/10106), दिवा – रत्नागिरी पॅसेंजर (50104/50103), कोकण कन्या एक्सप्रेस (20112-20111), मांडवी एक्सप्रेस (10104-10103) या ट्रेनच्या बाह्य भागावर जाहिरातींचे प्रदर्शन | 03 | 01/05/2026 रोजी 11:00 वाजता |
| 5 | एसएलआर लीजिंग – ट्रेन क्र. 11004, 20112, 10104, 22907, 56615-II | 05 | 01/05/2026 रोजी 11:00 वाजता |
| 6 | रोड अंडर ब्रिज / रोड ओव्हर ब्रिज जवळ महाराष्ट्र राज्यात होर्डिंग्सद्वारे जाहिरात | 07 | 02/05/2026 रोजी 11:00 वाजता |
| 7 | चिपळूण, कणकवली, कुडाळ, करमळी, गोकर्ण रोड, होन्नावर, भटकल व सुरतकल स्थानकांवर डिजी लॉकर बसविणे | 08 | 02/05/2026 रोजी 11:00 वाजता |
| 8 | रेल्वे स्थानकांवर जाहिरात फलकांद्वारे जाहिरात, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, थिविम, मडगाव स्थानकांवर होर्डिंग्स तसेच थिवीम व उडुपी येथे व्हिडिओ वॉल | 06 | 04/05/2026 रोजी 11:00 वाजता |
| 9 | करमळी, थिविम, कुंदापुरा, मूकाम्बिका रोड येथे पे अँड यूज शौचालय सुविधा | 04 | 04/05/2026 रोजी 11:00 वाजता |
| 10 | आडवली, विलवडे, राजापूर रोड, मूकाम्बिका रोड, पडुबिद्री, बारकूर, काणकोण, कोलाड स्थानकांवर फेअर रिपीटर बसविणे | 08 | 05/05/2026 रोजी 11:00 वाजता |
| 11 | क्लॉक रूम - मूकाम्बिका रोड | 01 | 05/05/2026 रोजी 11:00 वाजता |
| 12 | थिविम, करमळी येथील एफओबी वर जाहिरात फलकांद्वारे जाहिरात | 02 | 06/05/2026 रोजी 11:00 वाजता |
| 13 | बारकूर येथे पे अँड पार्किंग सुविधा | 01 | 06/05/2026 रोजी 11:00 वाजता |
| 14 | करमळी स्थानक परिसरात व्हिडिओ स्क्रीनद्वारे व्यावसायिक जाहिरात | 01 | 07/05/2026 रोजी 11:00 वाजता |

**चौकशीसाठी कृपया संपर्क साधा:** 1. श्री. प्रविण डावरे, मोबाईल क्र. 9004470597, 2. श्री. विनय गावंकर, मोबाईल क्र. 9004476129, 3. श्री. मधुकुमार शेट्टी, मोबाईल क्र. 9004476082. अधिक माहितीसाठी कृपया **www.ireps.gov.in** या संकेतस्थळास भेट द्या.

**मुख्य वाणिज्य व्यवस्थापक**
**कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड**



### पनवेल महानगरपालिका, पनवेल
### ई- निविदा सुचना
### विद्युत विभाग

मा. आयुक्त, पनवेल महानगरपालिका यांच्या वतीने ई - निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) ब - १ नमुन्यातील खालील नमूद कामांची निविदा महाराष्ट्र शासनाकडील योग्य त्या वर्गातील विद्युत विभागाकडील नोंदनीकृत ठेकेदाराकडुन मागविण्यात येत आहे.

| अ क्र | निविदा क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय (GST सोडून) | निविदा अनामत रक्कम (रू.) | कोरी ई निविदा किंमत (रू) |
|---|---|---|---|---|---|
| १. | पमपा/विद्युत/०३/२०२६ | पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील कामोठे नोडमधील सेक्टर-३२ येथील ८५ MLD क्षमतेचे मलप्रक्रिया केंद्राच्या (STP) HT वीज कनेक्शनची कॉन्ट्रॅक्ट डिमांड कमी करणे करीता नव्याने ११ KV, KIOSK (Cubical Metering Unit) स्थापित करून कार्यान्वित करणे | ७,७१,५२२.०० | ७,७१५.०० | ५९०.०० |

या निविदेबाबतची विस्तृत माहिती पनवेल महानगरपालिका संकेतस्थळ www.panvelcorporation.maharasthra.gov.in या साईटवर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. याची सर्व संबंधित निविदाधारकांनी नोंद घ्यावी.

जा.क्र./पमपा/विद्युत/९९२६/प्र.क्र. ३८/३६१/२०२६
दिनांक-२३/०४/२०२६

सही/-
**शहर अभियंता**
पनवेल महानगरपालिका



### ग्रुप ग्रामपंचायत भाले ता. माणगांव, जि. रायगड

जाहीर निविदा सन २०२६/२७ नोटीस बोर्ड प्रसिद्धी दि. २२/०४/२०२६

सर्व खालील साहित्य व सेवा पुरवठादार यांस कळविण्यात येते की, ग्रामपंचायत भाले, ता. माणगाव, जि. रायगड यांना सन २०२६/२७ या आर्थिक वर्षाच्या कालावधीमध्ये खालील दर्शविल्याप्रमाणे साहित्य सेवा आवश्यकतेनुसार कमी अधिक प्रमाणात लागणार आहेत. तरी इच्छुक पुरवठादार यांनी खालील साहित्याचे कामाचे तपशिलासह व सर्व करासहित असलेले आपले दरपत्रक निविदा ग्रामपंचायतीला २९/०४/२०२६ रोजी सायं. ५:०० वाजेपर्यंत सादर करावेत. निविदा उघडणेचा दि. ३०/०४/२०२६ राहील.

| अ.क्र. | साहित्यांचे/कामांचे नाव | निविदा फॉर्म फी रु | कामाची मुदत |
|---|---|---|---|
| १) | ग्रा.पं. लेख संहिता २०११ अंतर्गत अभिलेखे, विविध नमुने, पावती पुस्तके, रजिस्टर इ. पुरविणे. | १००/- | गरजेप्रमाणे |
| २) | ग्रामपंचायत कार्यालयीन कामाकरिता स्टेशनरी साहित्य पुरविणे. | १००/- | गरजेप्रमाणे |
| ३) | पाणी शुद्धीकरणासाठी टी. सी. एल. पावडर पुरविणे. | १००/- | गरजेप्रमाणे |
| ४) | पाणी पुरवठा विभागाकरिता आवश्यक साहित्य पुरवठा करणे. | १००/- | गरजेप्रमाणे |
| ५) | पाणी पुरवठा योजना साधनांची दुरुस्ती करणे. | १००/- | गरजेप्रमाणे |
| ६) | कार्यालयीन संगणकीय दुरुस्ती व आवश्यक साहित्य पुरविणे. | १००/- | गरजेप्रमाणे |
| ७) | विद्युत विभागाकरिता विद्युत साहित्य पुरवठा करणे. | १००/- | गरजेप्रमाणे |
| ८) | शासकीय योजना, इ. प्रचार प्रसिद्धी फ्लेक्स बॅनर्स फ्रेम्स पुरविणे. | १००/- | गरजेप्रमाणे |
| ९) | शेवाळी प्रतिबंधात्मक पावडर पुरविणे. | १००/- | गरजेप्रमाणे |
| १०) | सार्वजनिक स्वच्छतेकरिता कार्बोलिक पावडर पुरविणे. | १००/- | गरजेप्रमाणे |
| ११) | ग्रामपंचायत कार्यालयासाठी आवश्यक फर्निचर पुरविणे. | १००/- | गरजेप्रमाणे |
| १२) | ग्रामपंचायत कर्मचारी यांना गणवेश, रेनकोट, छत्री इ. पुरविणे. | १००/- | गरजेप्रमाणे |
| १३) | सहाय्यभूत उपकरणे (घमेल, कुदळ, फावडे, ग्लोज, झाडू, मास्क, टिकाव, पाने, बॅटरी, बॅग) इ. पुरविणे. | १००/- | गरजेप्रमाणे |
| १४) | वृक्ष लागवड व संवर्धनासाठी रोपे व अनुषांगिक साहित्य पुरविणे. | १००/- | गरजेप्रमाणे |
| १६) | धूरफवारणी, निर्जंतुक औषध फवारणीकरिता औषधे, इंधन पुरविणे. | १००/- | गरजेप्रमाणे |

**अटी व शर्ती :** (१) सही नसलेली व अटी शर्तीची कोटेशन स्विकारली जाणार नाहीत.
२) कोटेशन नोटीस व करारनामा हा कोटेशनचा एक भाग असेल.
३) निधीच्या उपलब्धते नुसार कामाची देयके अदा करण्यात येतील.
४) कामासाठी लागणारे साहित्य स्पेसिफिकेशन प्रमाणे व नमूद केलेल्या मान्यता प्राप्त कंपन्यांचे वापरणे/पुरविणे पुरवठादारास बंधनकारक राहिले.

वरील कामकाजाबाबतची सर्व माहिती ग्रामपंचायत मध्ये कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत मिळू शकेल. कोणतेही कोटेशन कोणतेही कारण न देता स्विकारणे अथवा नाकारणे तसेच प्राप्त झालेल्या सर्वच कोटेशन नाकारणेचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे.

**ग्रामपंचायत अधिकारी**
**ग्रुप ग्रामपंचायत भाले**
**ता. माणगांव, जि.रायगड**

**सरपंच**
**ग्रुप ग्रामपंचायत भाले**
**ता. माणगाव, जि. रायगड**



### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे भायमळा, ता.अलिबाग, जि.रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत संबंधित मिळकतीचे विद्यमान मालकांकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं | क्षेत्र(हे.आर.) | आकार | मालकाचे नाव |
|---|---|---|---|---|
| भायमळा | ७७ | एकूण ०-४५-००<br>पैकी ०-०७-००<br>पो.ख.०-००-००<br>एकूण ०-०७-०० | ०.८८ | श्री.नरेश हिराचंद जैन |

सदरची मिळकत ही त्यांचे निर्वेध मालकी हक्कांच्या व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकणेचा त्यांस हक्क व अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. सदर मिळकती संदर्भात आमचे अशिलांनी मिळकतीचे विद्यमान मालक यांचेसोबत खरेदी-विक्री संदर्भात बोलणी करून सदर मिळकत खरेदी करण्याचा निर्णय घेतलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा त्याचे कोणत्याही भागावर कोणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, रस्त्याच्या वहिवाटीचे हक्क, वारसा हक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत खाली दिलेल्या आमच्या पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहीत लेखी स्वरूपात आणून द्याव्यात. मुदतीत कोणाचेही कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही या विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्काची आहे व त्याच्यावर अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हितसंबंध व हक्क नाही. अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभात सोडून दिला आहे. असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पुर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कोणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

अलिबाग
दि.२३/०४/२०२६

सही/-
**ॲड.जयेंद्र तातुराम गुंजाळ**
मु.परहूर, पो.कामार्ले,
ता.अलिबाग, जि.रायगड
मो.नं.७२७६१२९७९९



### जाहीर नोटीस

तमाम जनतेस सदर जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशील यांनी खाली नमूद परिशिष्ट 'अ' व परिशिष्ट 'ब' मध्ये सविस्तर वर्णन केलेली मालमत्ता सदर मालमत्तेचे मालक **श्री. राजीव बिजॉय चक्रबर्ती** यांचेकडून विकत घेण्याचा तसेच **परिशिष्ट 'क'** मध्ये सविस्तर वर्णन केलेल्या मालमत्तेबाबत **श्री. राजीव बिजॉय चक्रबर्ती** यांच्याकडे सध्या अस्तित्वात असलेले भाडेपट्टा हक्क (Leasehold Rights) हस्तांतरित करून घेण्याचे निश्चित केले आहे.

जर वरील नमूद मिळकत व मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळहक्क, वहिवाट, ताबा, कब्जा, ईजमेंट (Easement), साठेखत/करार. फेरफार, गहाण, दान, बक्षीस, चार्ज, अटॅचमेंट, लीज इत्यादी कोणत्याही प्रकारचा हक्क किंवा हितसंबंध अस्तित्वात असल्यास, ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून **२१ दिवसांच्या** आत आपला हक्क व हितसंबंधाचे स्वरूप नमूद करून आवश्यक कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणाऱ्यांच्या पत्त्यावर लेखी हरकत नोंदवावी. अन्यथा, नमूद कालावधीत कोणतीही हरकत/दावा प्राप्त न झाल्यास, अशा सर्व हक्क, दावे किंवा आक्षेप हे स्वतःहून त्याग केलेले (Waived) व कायमचे रद्द (Abandoned) समजण्यात येतील, तसेच त्याबाबत पुढील कोणतीही हरकत ग्राह्य धरली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट 'अ'**
**(जमिनीचे सविस्तर वर्णन)**

मौजे नागाव, ता. अलिबाग, जि. रायगड येथे स्थित गट क्र. १६४८/३/१/३, क्षेत्रफळ ९१५ चौ. मीटर असलेली बिगर शेती (Non-Agricultural) जमीन, तसेच त्यास अनुसरून असलेले सर्व हक्क, उपभोग हक्क, मार्ग हक्क, सोयीसुविधा व उपांग (Appurtenances) यांसह.

**परिशिष्ट 'ब'**
**(इमारत/बांधकाम व रिसॉर्ट व्यवसायाचे वर्णन)**

परिशिष्ट 'अ' मध्ये नमूद केलेल्या जमिनीवर ग्रामपंचायत नागाव तसेच संबंधित प्राधिकरणाकडून आवश्यक त्या परवानग्या प्राप्त करून उभारण्यात आलेली आर.सी.सी. (RCC) बांधकाम असलेली इमारत, ग्रामपंचायत मालमत्ता क्रमांक ३५५४ अशी नोंद असलेली व अधिकृत नोंदीत समाविष्ट, तसेच सदर ठिकाणी चालविण्यात येणारा 'मिराना रिसॉर्ट (MIRANA RESORT)' हा व्यवसाय, त्यासंबंधित ब्रँडिंग, सदिच्छा (Goodwill) व रेस्टॉरंट व्यवसायासह.

**परिशिष्ट - 'क'**
**(भाडेपट्टा हक्क असलेल्या खुल्या जमिनीचे वर्णन)**

मौजे नागाव, ता. अलिबाग, जि. रायगड येथील गट क्र. १६४८/३/१ मधील एकूण ४ गुंठे १० आर क्षेत्रफळापैकी अंदाजे ३ गुंठे क्षेत्रफळाची खुली जमीन, जी M/s Samira Lifestyle Private Limited यांच्या मालकीची असून सदर जमीन श्री. राजीव बिजॉय चक्रबर्ती यांचेकडे ९९ वर्षांच्या भाडेपट्टा कराराअंतर्गत आहे. सदर जमीन सध्या 'मिराना रिसॉर्ट' साठी पार्किंग, बाग व खेळाच्या मैदानासाठी पूरक स्वरूपात वापरात असून, त्यासंबंधित सर्व हक्क, सोयीसुविधा व उपांग, तसेच भाडेपट्टा करारातील अटी व शर्ती अधीन राहून.

**सही/-**
**ॲड. समीर शांताराम म्हात्रे**



### PUBLIC NOTICE

PUBLIC NOTICE IS HEREBY GIVEN to the general public that our client intends to purchase the immovable property more particularly described in Schedule A and Schedule B hereunder, and further intends to acquire/transfer the leasehold rights in respect of the property described in Schedule C hereunder, as held by Mr. Rajeev Bijoy Chakrabarti, and that any person having any claim, right, title, interest, lien, charge, mortgage, inheritance, easement, tenancy, lease, or any other objection of whatsoever nature in respect of the said properties is hereby required to make the same known in writing along with supporting documentary evidence to the undersigned within a period of 21 (Twenty-One) days from the date of publication of this notice, failing which such claim or objection, if any, shall be deemed to have been waived and/or abandoned.

**SCHEDULE - A**
**(Description of Land)**

All that piece and parcel of non-agricultural land situated at Village Nagaon, Taluka Alibag, District Raigad, within the jurisdiction of Sub-Registrar Alibag, bearing Gat No. 1648/3/1/3, admeasuring 915 Square Meters, along with all rights, easements and appurtenances thereto.

**SCHEDULE - B**
**(Description of Structure / Building & Resort)**

All that RCC structure/building constructed on the land described in Schedule A above, after obtaining due permission from the Group Gram Panchayat, Nagaon/ concerned authority, bearing Gram Panchayat Property No. 3554, and duly assessed in the records of the said Gram Panchayat, along with the running resort business conducted therein under the name and style "MIRANA RESORT", including its branding, goodwill, and restaurant business.

**SCHEDULE - C**
**(Description of Leasehold Open Land)**

All that piece and parcel of open land admeasuring approximately 3 Gunthas (out of total land admeasuring 4 Gunthas 10 Ares), forming part of Gat No. 1648/3/1, situated at Village Nagaon, Taluka Alibag, District Raigad, owned by M/s. Samira Lifestyle Private Limited, and held by the Mr. Rajeev Chakrabarti on leasehold basis for a period of 99 years. The said land is presently used for parking, garden, and playground purposes ancillary to "MIRANA RESORT", together with all rights and appurtenances thereto, subject to the terms and conditions of the lease.

Any person having any claim or objection in respect of the above-mentioned property is required to send the same in writing to the undersigned at the address mentioned below within 21 days from the date of publication of this notice.

Date: 23/04/2026

**Adv. Sameer Mhatre**
102, Shri Balaji CHS, above Saraswat Bank, Nityanand Road, Panvel, Dist.- Raigad, 410206, Mobile No. 9821657456



### जाहीर नोटीस

सर्व लोकांस कळविण्यात येते कि, आमचे अशिलाने खालील वर्णन केलेली मौजे पिंपळपाडा, ता. कर्जत, जिल्हा रायगड येथील मिळकत, मिळकत मालक यांचेकडून खुषखरेदीने घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| गट क्र. | क्षेत्र हे.आर.प्र. | आकार | मालकाचे नाव |
|---|---|---|---|
| ७/१/ब | ००.९१.००<br>००.१३.००<br>०१.०४.०० | ०.६५ | गंगू बारकू पवार<br>सुरेश बारकू पवार |

वरील वर्णन केलेली मिळकत स्वकष्टार्जित असून निर्वेध व बोजारहीत असल्याबाबत मिळकत मालकीचे म्हणणे आहे. तरी सदर मिळकतीवर कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, लिज, मृत्युपत्र, विक्रीचा करार, साठेकरार, पोटगी चार्ज, ताबा, वहीवाट, इजमेंट, बोजा तारण, वारसा, ट्रस्ट, कुळहक्क अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्याने ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ दिवसांच्या आत खाली सही करणार यांच्याकडे कागदपत्रे पुराव्यासहीत लेखी कळवावे. तशी कोणाचाही कोणत्याही प्रकारची हरकत तक्रार मुदतीत आमच्याकडे न आल्यास मिळकतीवर कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अगर अथवा तो असल्यास तो आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिलेला आहे असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेली तक्रार आमच्या अशिलावर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी, कळावे,

ठिकाण - कर्जत
दिनांक -२४/४/२०२६

सही/-
**ॲड.अक्षय अंकुश तिखंडे**
शॉप नं.२, राजलक्ष्मी को. ऑ. हौ सोसायटी
कर्जत, रायगड मो. नं.-९९२३४६५३५३



### ग्रुप ग्रामपंचायत भाले, ता. माणगांव, जि. रायगड. जाहीर निविदा

नोटीस बोर्ड प्रसिद्धी दि. २२/०४/२०२६

ग्रुप ग्रामपंचायत भाले यांचेकडील १५ वा वित्त आयोग/ग्रा.पं. फंड अंतर्गत खालील कामांकरिता अधिकृत ठेकेदार/पुरवठादार यांचेकडून जाहीर निविदा मागविणेत येत आहेत.

| अ.क्र. | कामांचे नांव | योजनेचे नाव | अंदाजीत रक्कम | इसारा फी | निविदा फी | निविदा स्विकारण्याचा अंतिम दिनांक | निविदा उघडणेचा दिनांक | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | जावटे शाळा संरक्षक भिंत बांधणे | ग्रा.पं.फंड | ६००००/- | ६००/- | २००/- | २९/०४/२०२६ | ३०/०४/२०२६ | १ महिना |
| २ | जावटे गावाचे दक्षिणेकडील पाणीसाठवण टाकी दुरुस्ती करणे. | १५ वा वित्त आयोग | ६७२००/- | ६७२/- | २००/- | २९/०४/२०२६ | ३०/०४/२०२६ | १ महिना |
| ३ | जावटे पाणीसाठवण टाकी दुरुस्ती व संरक्षक जाळी बसविणे. | १५ वा वित्त आयोग | ३५०००/- | ३५०/- | २००/- | २९/०४/२०२६ | ३०/०४/२०२६ | १ महिना |
| ४ | जावटे पाणीपुरवठा योजना साठवण टाकी रंगरंगोटी करणे. | १५ वा वित्त आयोग | ९२५६/- | ९२/- | २००/- | २९/०४/२०२६ | ३०/०४/२०२६ | १ महिना |
| ५ | ग्रामपंचायत सार्वजनिक ठिकाणी सुशोभीकरण करणे. | ग्रा.पं.फंड | १०००००/- | १०००/- | २००/- | २९/०४/२०२६ | ३०/०४/२०२६ | १ महिना |
| ६ | भाले बौद्धवाडी सार्वजनिक शौचालय दुरुस्ती करणे. | ग्रा.पं. फंड (१५%) | ५०५००/- | ५०५/- | २००/- | २९/०४/२०२६ | ३०/०४/२०२६ | १ महिना |
| ७ | भाले व्यायामशाळेकरिता पाणीसुविधा करणे. | १५ वा वित्त आयोग | १३९३८/- | १३९/- | २००/- | २९/०४/२०२६ | ३०/०४/२०२६ | १ महिना |

**अटी व शर्ती :-** १) निविदा संबधी सविस्तर माहिती ग्रामपंचायत कार्यालयात कार्यालयीन वेळेत पहावयास मिळेल. २) निविदा स्विकृती अंतिम दि. २९/०४/२०२६ असून अपूर्ण व उशिरा पोहचलेल्या निविदांचा ग्रामपंचायत विचार करणार नाही. ३) निविदेसोबत अनामत रक्कम भरणा पावती/चलन जोडलेली असावी. ४) कोणतेही कारण न देता एक किंवा सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे. ५) कामाच्या अंदाजपत्रकानुसार काम करणे बंधनकारक राहील. ६) निविदा मंजुरीअंती ठेकेदार/ पुरवठादार यांस रीतसर करारनामा करून द्यावा लागेल. ७) कार्यारंभ आदेश प्राप्त झाल्यापासून विहित केलेल्या मुदतीचे कालावधीत काम पूर्ण करणे बंधनकारक राहील. अन्यथा नियमानुसार दंड व शास्ती लागू करणेत येईल. ८) साहित्य/वस्तू यांचा दर्जा व गुणवत्ता चांगली असावी. ९) शासनाकडून प्राप्त निधीच्या उपलब्धतेनुसार देयके अदा केली जातील. १०) नोंदणीकृत ठेकेदार उपलब्ध न झाल्यास स्थानिक ठेकेदारांचे निविदांचा विचार केला जाईल. ११) ठेकेदार/पुरवठादार यांचे बँक खाते राष्ट्रीयकृत बँकेत असावे व PFMS प्रणालीशी संलग्न असावे. १२) कामाच्या देयकातून सर्व शासकीय कपाती वजा करून देयक अदा केले जाईल. १३) मा. उपअभियंता (ग्रा.पा.पु/बांध.) उपविभाग माणगांव यांचे तांत्रिक मार्गदर्शनानुसार व मा. सरपंच ग्रा.पं. भाले यांचे देखरेखीखाली कामे पूर्ण करावयाची आहेत.

**ग्रामपंचायत अधिकारी**
**ग्रुप ग्रामपंचायत भाले**
**ता. माणगांव, जि.रायगड**

**सरपंच**
**ग्रुप ग्रामपंचायत भाले**
**ता.माणगाव, जि.रायगड**

# पनवेल महानगरपालिका




## नागरिकांच्या सोयीसाठी आणि पारदर्शक प्रशासनाच्या दिशेने **एक मोठे पाऊल**

स्मार्ट डिजिटल सुविधा आता आपल्या सेवेत उपलब्ध आहेत. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून सेवा अधिक जलद, सोपी आणि सर्वांसाठी सुलभ करण्याचा हा उपक्रम आहे.

### करमित्र (KARMITRA)

**तुमचा विश्वासू डिजिटल साथीदार**

करमित्र चॅटबॉटद्वारे तुम्ही घरबसल्या मालमत्ता करासबंधी, विविध सेवांबाबत माहिती विचारू शकता तसेच तत्काळ कर भरणा करू शकता. **हा चॅटबॉट 24 x 7 उपलब्ध असून नागरिकांना वेळेची मोठी बचत करून देतो.**

whatsaap चॅटबॉट No. 8956891145



### किऑस्क मशीन

(KIOSK MACHINE)

**झटपट आणि सुलभ पेमेंट सुविधा**

कर भरण्याची प्रक्रिया आता अधिक सोपी आणि जलद झाली आहे. प्रभाग कार्यालयांमध्ये उपलब्ध किऑस्क मशीनद्वारे नागरिकांना QR कोड स्कॅन करून किंवा मोबाईल नंबर टाकून काही क्षणांतच पेमेंट करू शकतात. **रांगांपासून मुक्तता, वेळेची बचत आणि सुरक्षित व्यवहार - हे या सुविधेचे मुख्य वैशिष्ट्य आहे.**

### प्रॉपर्टी पासबुक

(PROPERTY PASSBOOK)

**पूर्ण पारदर्शकता तुमच्या हातात**

मालमत्तेशी संबंधित सर्व माहिती एका क्लिकवर मिळवण्याची सुविधा आता उपलब्ध आहे. डिमांड, कलेक्शन, बाकी रक्कम, मालमत्तेतील बदल आणि व्यवहारांचा संपूर्ण तपशील सहज पाहता येतो. यामुळे **नागरिकांना त्यांच्या कर स्थितीची स्पष्ट आणि अद्ययावत माहिती मिळते.**

**ही सर्व डिजिटल साधने नागरिकांना अधिक सक्षम बनवण्यासाठी आणि प्रशासन अधिक कार्यक्षम करण्यासाठी तयार करण्यात आली आहेत.**

## डिजिटल सुविधा - स्मार्ट नागरिक, स्मार्ट शहर!

## मालमत्ता कर विभाग

# आजच भरणा करुन सवलतीचा लाभ घ्या!

आर्थिक वर्ष २०२६-२७ साठी मालमत्ता कर देयके वितरीत करण्याचे कार्य सुरु आहे.

**३१ मे २०२६ पर्यंत कराचा भरणा केल्यास चालू मागणीवर तब्बल ५% सूट मिळवा!**

ऑनलाईन भरणा करुन अतिरिक्त **२% सूट मिळवा.**

PANVEL CONNECT

मालमत्ता कर भरणा करण्यासाठी
**Karmitra PMC & Panvel Connect App**
डाउनलोड करा

@pmc_panvel @pmc_panvel

## पहलगामचे एक वर्ष

काश्मिरात पहलगाम इथे दहशतवादी हल्ल्याला एक वर्ष झाले. गेल्या वर्षी २२ एप्रिल रोजी झालेल्या या हल्ल्यात २६ जण मारले गेले होते. त्यातले बहुतांश पर्यटक होते. काही स्थानिक होते. पहलगामच्या ज्या बैसरन व्हॅली इथे हा प्रकार घडला तिथे कायमच पर्यटकांची गर्दी असे. तेथे आसपासच्या जंगलातून काही अतिरेकी आले आणि त्यांनी पर्यटकांना धर्म विचारून गोळ्या घातल्या. मात्र यात एक स्थानिक मुस्लिमही मारला गेला. वास्तविक काश्मीरमध्ये गेल्या अनेक वर्षांपासून सर्व प्रकारची पोलिस दले तसेच सैन्य तैनात आहे. तरीही आपल्या गुप्तचर यंत्रणांना या हल्ल्याचा अजिबात सुगावा लागला नाही. तसेच गोळ्या घालण्याचा प्रकार बराच काळ चालू राहूनही पोलिस व सैनिक तेथे तात्काळ पोचू शकले नाहीत. त्यांना हल्लेखोरांचा पाठलागही करता आला नाही. मोदी सरकारचे हे जबरदस्त मोठे अपयश होते. गेल्या चाळीस वर्षांपासून काश्मीरमध्ये अशांतता आहे. मात्र तेथे कधीही या प्रकारे पर्यटकांवर हल्ला झालेला नव्हता. एखाद दुसऱ्या पर्यटकांवर काही वेळा हल्ले झाले असतील. पण इतक्या घाऊक प्रमाणात मृत्यू झाले नव्हते. पर्यटन हा काश्मिरी लोकांचा मुख्य व्यवसाय आहे. त्याला धोका निर्माण झाला तर आपल्याला स्थानिक पातळीवर शत्रू निर्माण होतील हे पाकिस्तानी लष्कराचे गणित होते. त्यामुळे पाकिस्तानातून येणारे अतिरेकी असोत वा स्थानिक दहशतवादी ते केवळ लष्कर, पोलिस वा राजकारणी यांच्यावरच हल्ले करत होते. पहलगाममुळे दहशतवाद्यांनी आपले धोरण बदलले असे स्पष्ट झाले. मात्र त्यानंतर त्यांचा मागोवा काढण्यात लष्कराला जे अपयश आले ते आश्चर्यकारक होते. जवळपास तीन महिने हल्ल्यामागील अतिरेक्यांचा ठावठिकाणा समजू शकलेला नव्हता. नंतर विलक्षण योगायोग घडला. ज्या दिवशी संसदेत पहलगाम हल्ल्याबाबत चर्चा होती त्याच दिवशी नेमके या हल्लेखोरांना मारल्याची बातमी आली. मोदी सरकारचा कारस्थानीपणा व लबाड्या लक्षात घेता हा सगळा बनाव असावा असेच अनेकांचे मत झाले. कालांतराने ते खरेही ठरले. कारण, पहलगाम हल्ल्याचे खरे सूत्रधार पाकिस्तानात मोकाट फिरत आहेत असे आता निष्पन्न झाले आहे.

### हल्ल्यांचे रहस्य

सहा वर्षांपूर्वी काश्मीरचे त्रिभाजन करून ३७० वे कलम हटवण्यात आले. तेव्हापासूनकाश्मिरात सर्व काही सुरळीत चालू आहे असे भासवण्याचा प्रयत्न चालू आहे. मात्र त्यासाठी प्रचंड प्रमाणावर पोलिस दले तेथे तैनात आहेत व इंटरनेट बराच काळ बंद करून ठेवण्यात आले होते हे दडवले जाते. आता तेथे निवडणुका झाल्या असल्या तरी स्थानिक सरकारला जवळपास शून्य अधिकार आहेत. कायदा सुव्यवस्था व इतर आर्थिक अधिकारही नायब राज्यपालांच्या किंवा पर्यायाने केंद्राच्या हातात आहेत. मधल्या काळात काश्मिरातील पर्यटन वाढले अशी जाहिरात करण्यात येते. पण यात भाजपच्या प्रचाराचा बराच भाग आहे. कारण, दहशतवाद जोरात होता तेव्हाही पर्यटक तेथे जातच होते हे लक्षात ठेवायला हवे. दुसरे म्हणजे, सामान्य लोकांचे रोजगार पर्यटनावरच अवलंबून असल्याने पर्यटकांचे स्वागत ते करणार हे उघड आहे. मात्र दहशतवादाचा धोका सरकारला संपवता आलेला नाही हे पहलगाममुळे सिध्द झाले. जिवावरची जोखीम असूनही पर्यटक तिथे गर्दी करीत असतील तर ते त्यांचे धाडस म्हणायला हवे व त्यांची तारीफ करायला हवी. पण म्हणून सरकारचे अपयश लपवता येत नाही. पहलगाम नंतर गेल्या वर्षभरात दिल्लीमध्ये मोठा बॉंबस्फोट झाला. त्यामागे काश्मिरी डॉक्टरांचे एक टोळके असल्याचे दिसून आले. या टोळक्याला पाकिस्तानात प्रशिक्षण मिळाले होते. त्यांनी प्रचंड प्रमाणात स्फोटके जमा केली होती. हे करताना पोलिसांना त्याचा अजिबात सुगावा लागला नव्हता हे आश्चर्यकारक होय. त्यानंतरही कहर म्हणजे यांच्याकडून जप्त केलेली व काश्मिरातील पोलिस ठाण्यात नेऊन ठेवलेल्या या स्फोटकांना रहस्यमय रीत्या आग लागून ती नष्ट झाली. काश्मिरातील प्रत्येक अशा दहशतवादी घटनेच्या आगेमागे अशा संशयास्पद गोष्टी घडलेल्या दिसतात. पुलवामामध्ये आरडीएक्स भरलेली कार जवानांच्या ताफ्यातल्या बसवर येऊन मुद्दामहून आदळली होती. हे कसे घडू शकले याचे उत्तर आजतागायत मिळू शकलेले नाही. पुलवामामध्ये दहशतवादी गायब कसे झाले हेही कोडेच होते. त्यापूर्वी पठाणकोट इथल्या आपल्या हवाई दलाच्या छावणीमध्ये दहशतवादी घुसू कसे शकले हे कोडे उलगडलेले नाही.

### दुटप्पी

भाजपकडे जबरदस्त प्रचारयंत्रणा आहे. तिच्या जोरावर ते या सर्व रहस्यमय गोष्टी दडपून टाकतात. काँग्रेसचा काळ असता तर भाजपवाल्यांनी या गोष्टींवरून देशभर हंगामा केला असता. माध्यमांनीही सरकारला धारेवर धरले असते. पण माध्यमे भाजपची बटीक झाल्याने आता ती उलटे विरोधकांनाच प्रश्न विचारतात. पहलगामनंतर मोदी सरकारने ऑपरेशन सिंदूर केले. त्यात पाकिस्तानात घुसून आपण दहशतवाद्यांचे अड्डे उद्ध्वस्त केले असे सांगितले गेले. यापुढे भारतात पाकिस्तानने दहशतवादी कारवाया करण्याचा प्रयत्न केला तर याच्याहून मोठा जबाब दिला जाईल असे आपण म्हटले होते. पण दिल्लीतील बॉंबस्फोट त्यानंतरच घडला. त्यामुळे सरकारची पंचाईत झाली. मग त्या बॉंबस्फोटाचा पाकिस्तानशी काहीही संबंध नाही असे भासवण्याचा प्रयत्न झाला. अन्यथा, आता ऑपरेशन सिंदूरचा भाग दोन का नाही असा सवाल जनतेने केला असता. दुसरे म्हणजे ऑपरेशन सिंदूर ज्या रीतीने आपण एकाएकी थांबवले तेही रहस्यमय होते. त्याची घोषणा डोनाल्ड ट्रम्प यांनी आधी केली. नंतर आपण केली. त्यामुळे हे सर्व त्यांच्या इशाऱ्यावरून झाले असे स्पष्ट झाले. मोदी सरकारने त्याचा इन्कार केला असला तरी तो कोणालाही पटलेला नाही. इराण युध्दानंतर तर आता ट्रम्प हे पाकिस्तानच्या प्रेमातच आहेत. पाकिस्तान हा अधिकृत मध्यस्थ म्हणून काम पाहत आहे. ट्रम्प यांची युध्दातून सोडवणूक होऊ शकलीच तर ती पाकिस्तानमुळे होणार आहे. त्यामुळे पाकिस्तानला दुखावणारे कोणतेही पाऊल ते उचलणार नाहीत व भारतालाही उचलू देणार नाहीत. टॅरिफच्या मुद्द्यावर त्यांनी भारताची नाकेबंदी केली आहेच. मुद्दा असा की, पहलगाम नंतर पुन्हा असा हल्ला झाला नसला तरी तो कोणत्याही क्षणी होऊ शकतो व भारत पुन्हा सध्या ऑपरेशन सिंदूर वगैरे पद्धतीने जबाब देण्याच्या स्थितीत नाही. बंगालच्या निवडणुकांमध्ये सध्या भाजपने बांगलादेशी घुसखोरांचा मुद्दा लावून धरला आहे. वास्तविक सीमेचा पाहारा करणे ही केंद्र सरकारची जबाबदारी आहे. घुसखोर येत असतील तर ते केंद्राचेच पाप आहे. पण आपले अपयश दुसऱ्याच्या नावावर टाकून राजकीय लबाड्या करत राहणे हेच भाजपचे कायमचे राजकारण राहिलेले आहे. काश्मीरातील हिंसाचाराबद्दल आजपर्यंत तो काँग्रेसला जबाबदार धरत आला. आता पहलगाम किंवा दिल्ली बॉंबस्फोटांची जबाबदारी मात्र आपली नाही असा त्याचा आविर्भाव आहे. भाजपवाले किती दुटप्पी आहेत हेच पहलगाम हल्ल्याने अधोरेखित केले आहे.

**विचार**

# उत्स्फूर्त मतदानाची दोन रूपे

***अलिकडेच पार पडलेल्या आसाम, केरळ आणि पुद्दुचेरी विधानसभा निवडणुकीमध्ये झालेल्या विक्रमी मतदानातून मतदार किती सजग झाला आहे, मतदारांचा लोकशाहीवरील विश्वास किती वाढला आहे, हे दिसून आले. आता पश्चिम बंगालमध्ये असेच चित्र पहायला मिळते का, याकडे राजकीय निरिक्षकांचे लक्ष लागले आहे. या राज्यामध्ये मतदानाप्रसंगी हिंसाचाराची मोठी परंपरा आहे. त्यात कितपत बदल घडतो, ते पहायचे.***



**अजय तिवारी**

पश्चिम बंगाल निवडणुकीला 'पॉलिटिकल ट्रेंडसेटर' म्हणण्यामागे ठोस कारणे आहेत. या राज्यात दिसणारा राजकीय कल अनेकदा इतर राज्यांमध्ये आणि पुढील लोकसभा निवडणुकांमध्येही प्रतिबिंबित होतो. त्यामुळे येथे समोर येणारा निकाल हा केवळ आकड्यांचा खेळ नसून जनमताचा संकेत मानला जातो. दिल्लीपासून देशाच्या कानाकोपऱ्यापर्यंत या निवडणुकीकडे लागलेली नजर ही याच व्यापक परिणामांची साक्ष देते. या निवडणुकीमध्ये केवळ विकास, रोजगार किंवा स्थानिक प्रश्न नाहीत, तर राष्ट्रीय सुरक्षा, सीमा व्यवस्थापन, स्थलांतर आणि सामाजिक संतुलन यासारखे व्यापक मुद्देही मध्यवर्ती ठरत आहेत. बांगलादेश सीमेला लागून असलेले हे राज्य संवेदनशील मानले जाते आणि त्यामुळेच केंद्र विरुद्ध राज्य अशी राजकीय लढत अधिक तीव्र होते. या पार्श्वभूमीवर पश्चिम बंगाल हे केवळ प्रादेशिक नव्हे, तर राष्ट्रीय सुरक्षेच्या चर्चेचेही केंद्र बनले आहे. सुमारे सात कोटी मतदार आणि विधानसभेच्या २९४ जागा असलेले पश्चिम बंगाल देशातील मोठ्या आणि प्रभावी राज्यांपैकी एक आहे. येथे मिळालेला विजय कोणत्याही पक्षासाठी राष्ट्रीय ताकद वाढवणारा ठरतो. म्हणूनच पश्चिम बंगाल जिंकणे म्हणजे फक्त एक राज्य जिंकणे नाही, तर देशाच्या राजकारणात आपली पकड अधिक भक्कम करणे होय. या निवडणुकीमध्ये मुख्य लढत तृणमूल काँग्रेस आणि भाजप यांच्यातच केंद्रित झालेली दिसते. तृणमूल काँग्रेस गेली १५ वर्षे सत्तेत आहे आणि ममता बॅनर्जी चौथ्यांदा विजय मिळवण्याचा प्रयत्न करत आहेत.

दुसरीकडे, भाजपने गेल्या काही वर्षांमध्ये आपला जनाधार वाढवला असून या वेळी सत्तेवर येण्यासाठी सर्व शक्ती पणाला लावली आहे. भाजपला येथे विजय मिळणे केवळ राजकीय नव्हे तर प्रतीकात्म कदृष्ट्याही मोठे यश ठरेल. ही निवडणूक २०२९ च्या लोकसभा निवडणुकीआधीची महत्वाची लढत मानली जात आहे. येथे मिळणारा विजय किंवा पराभव पक्षांच्या आत्मविश्वासावर आणि आगामी रणनीतीवर मोठा प्रभाव टाकेल. त्यामुळेच प्रत्येक पक्षासाठी ही निवडणूक प्रतिष्ठेची बनली आहे. सीमा, घुसखोरी आणि सुरक्षा हे या निवडणुकीतील प्रमुख मुद्दे आहेत. भाजपकडून अवैध स्थलांतराचा मुद्दा जोरात मांडला जात आहे, तर सत्ताधारी पक्ष या आरोपांना राजकीय रंग देत आहे. याशिवाय, कोलकात्यातील आर. जी. कर वैद्यकीय महाविद्यालयातील बलात्कार आणि हत्येच्या प्रकरणाने राज्य सरकारच्या प्रतिमेपुढे प्रश्नचिन्ह निर्माण केले आहे. हा मुद्दा शहरी आणि सुशिक्षित मतदारांमध्ये जास्त चर्चिला जात आहे. धर्म आणि राजकारण यांचे मिश्रणही या निवडणुकीत प्रकर्षाने दिसते. सुमारे ३० टक्के मुस्लिम लोकसंख्या असलेल्या राज्यात धार्मिक ध्रुवीकरण हा निर्णायक घटक ठरू शकतो. तृणमूल काँग्रेसवर तुष्टीकरणाचे आरोप होत असताना भाजपवरही ध्रुवीकरणाचा आरोप केला जात आहे. त्यामुळे प्रत्येक छोटा वादही राष्ट्रीय चर्चेचा विषय बनला आहे. यासोबतच, निवडणूक हिंसा हा पश्चिम बंगालच्या राजकारणातील जुना पण अजूनही जिवंत असलेला मुद्दा आहे. मतदानाच्या काळात हिंसाचाराच्या घटनांमुळे ही निवडणूक अधिक संवेदनशील बनते आणि त्यावर संपूर्ण देशाची नजर राहते.

एकूणच, पश्चिम बंगालची निवडणूक आता केवळ सत्तेची लढाई नाही, तर देशातील राजकीय प्रवाहाची दिशा ठरवणारी निर्णायक परीक्षा बनली आहे. स्थानिक मुद्दे विरुद्ध राष्ट्रीय अजेंडा, ओळख विरुद्ध विकास आणि प्रादेशिक नेतृत्व विरुद्ध राष्ट्रीय शक्ती या सर्वांचा संगम या निवडणुकीत दिसतो. त्यामुळेच पश्चिम बंगालमधील २०२६ विधानसभा निवडणुकीचा निकाल हा २०२९ च्या लढतीचा 'ट्रेलर' ठरू शकतो आणि म्हणूनच संपूर्ण देशाची नजर या निवडणुकीवर खिळली आहे. आसाम, केरळ, पश्चिम बंगाल, तमिळनाडू या चार भारतीय राज्यांमध्ये आणि पुदुच्चेरी केंद्रशासित प्रदेशामध्ये विधानसभा निवडणुका होत आहेत. पश्चिम बंगालमध्ये मतदान दोन टप्प्यांमध्ये म्हणजे २३ आणि २९ एप्रिल रोजी पार पडणार आहे; मात्र गेल्या काही वर्षांमध्ये पश्चिम बंगालमध्ये सहा, सात, किंबहुना कधी आठ टप्प्यांमध्येही मतदान झाले आहे. त्या तुलनेत यंदाचा कार्यक्रम लहान आहे. संपूर्ण एक महिना चालणाऱ्या प्रक्रियेऐवजी केवळ एका आठवड्यात निवडणूक पूर्ण होणार आहे. तरीही फक्त हेच एक कारण नाही, की पश्चिम बंगालचा निवडणुकीचा माहोल देशातील इतर भागांपेक्षा वेगळा दिसतो. सुमारे पन्नास वर्षांपासून या राज्यात प्रामुख्याने त्या पक्षांचे वर्चस्व राहिले आहे, ज्यांचे प्रमुख राजकीय प्रतिस्पर्धी दिल्लीतील सत्ताधारी पक्ष राहिले आहेत. यामुळे केंद्र आणि राज्य सरकारांमधील संघर्ष हा पश्चिम बंगालच्या राजकारणात वारंवार दिसणारा घटक बनला आहे. सध्याच्या विधानसभा निवडणुकीकडे पाहता किमान पाच महत्त्वाचे घटक असे आहेत, जे या निवडणुकीला देशातील इतर निवडणुकांपासून वेगळे ठरवतात.

पश्चिम बंगालमध्ये निवडणुकीपूर्वी, निवडणुकीदरम्यान आणि निवडणुकीनंतर ज्या प्रमाणावर राजकीय हिंसा होते, त्याची तुलना देशातील इतर कोणत्याही राज्याशी करता येत नाही. ग्रामीण भागात असे वारंवार घडते, की पराभूत पक्षाच्या समर्थकांना आणि कार्यकर्त्यांना घरातून हाकलून दिले जाते आणि त्यांना अनेक महिने इतरत्र रहावे लागते. राज्यात असे दृश्य अजिबात दुर्मिळ नाही. ज्या राज्यांची कायदा-सुव्यवस्थेबाबत प्रतिमा वाईट मानली जाते, तिथेही साधारणपणे अशा घटना दिसत नाहीत. राष्ट्रीय आकडेवारीनुसारही निवडणुकांदरम्यान राजकीय हिंसाचारात सर्वाधिक जीवित हानी पश्चिम बंगालमध्येच होते. यामागील एक रचनात्मक कारण म्हणजे राज्यात असलेली शेतीची मर्यादित जमीन आणि अतिशय जास्त लोकसंख्या घनता. कमी जमिनीवर अधिक लोकांमधील स्पर्धेमुळे संघर्षाची परिस्थिती निर्माण होते. याशिवाय, कोणताही पक्ष सत्तेत असो, 'जो जिंकतो तोच सर्वकाही मिळवतो' अशी मानसिकता येथे प्रभावी राहते. म्हणजे सत्ताधारी पक्ष समाजाच्या प्रत्येक स्तरावर आपले नियंत्रण प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करतो. यामुळे सत्ताधारी पक्षाचा प्रभाव गावापासून शहरांपर्यंत सर्वत्र दिसून येतो. कोलकाता शहराची प्रतिमा सुसंस्कृत आणि बुद्धिजीवी रहिवाशांमुळे बनली असली, तरी ग्रामीण पश्चिम बंगालमध्ये राजकीय हिंसा दैनंदिन जीवनाचा भाग बनली आहे. १९४० च्या दशकातील तेभागा आंदोलनापासून मारीचझापी, नानूर, छोटो आंगारिया आणि बोगटुई हत्याकांडांपर्यंत या हिंसेची परंपरा इतिहासात खोलवर रुजलेली आहे.

निवडणुकांच्या काळात ही हिंसा अनेक पटींनी वाढते आणि यंदा वेगळे चित्र दिसण्याची फारशी शक्यता नाही. निवडणूक आयोगाने मतदार याद्या सुधारण्यासाठी 'स्पेशल इंटेन्सिव्ह रिव्हिजन' (एसआयआर) प्रक्रिया सुरू केली आहे. ही प्रक्रिया बिहार, उत्तर प्रदेश आणि केरळसारख्या राज्यांमध्ये सुरळीत पार पडली आहे किंवा सुरू आहे; पण पश्चिम बंगालमध्ये या प्रक्रियेवर अभूतपूर्व वाद, आंदोलन, न्यायालयीन खटले आणि अव्यवस्थेचे आरोप झाले.

सर्वोच्च न्यायालयानेही प्रश्न उपस्थित केला की इतर राज्यांमध्ये काही समस्या नसताना पश्चिम बंगालमध्येच एवढे प्रश्न का निर्माण झाले? याचे उत्तर राज्याच्या सीमावर्ती बदलत्या परिस्थितीत आणि स्थलांतराच्या दीर्घ इतिहासात दडले आहे. १९४७ च्या फाळणीनंतर पश्चिम बंगालमध्ये शरणार्थी सतत येत राहिले. कालांतराने अवैध स्थलांतर हा मोठा राजकीय मुद्दा बनला. कोलकाता हे पूर्व आणि ईशान्य भारतातील मोठे औद्योगिक केंद्र असल्याने रोजगारासाठी मोठ्या प्रमाणावर लोक स्थायिक झाले. यातील अनेकांना 'मूळ रहिवासी' मानले गेले नाही. त्यामुळे नागरी हक्कांसाठी त्यांना संघर्ष करावा लागला. परिणामी, मतदार यादीत नाव असणे ही केवळ प्रशासकीय बाब नसून ओळख आणि हक्कांचा प्रश्न बनला आहे. याच कारणामुळे ममता बॅनर्जी यांनी हा मुद्दा राष्ट्रीय पातळीवर नेला, आंदोलन केले आणि निवडणूक प्रचाराचा मुख्य मुद्दा बनवला. निवडणूक आयोगाच्या अंमलबजावणीतील त्रुटींमुळे लोकांचा रोष अधिक वाढला आहे. मात्र या सर्वांचा परिणाम ही निवडणूक कोणत्या बाजुला झुकवतो, हे आता पहायचे.

**चर्चा आजची**

# राजकारणाच्या कचाट्यात महिला आरक्षण

**सुयोग आंग्रे**

महिला आरक्षणासंबंधीचे दुरुस्ती विधेयक संसदेत पराभूत होऊनही सत्ताधारी पक्ष आणि विरोधकांचे आपल्या विजयाचे दावे आणि स्वत:ला महिला स्नेही म्हणवून घेण्यात फारसे आश्चर्य नाही. विधिमंडळात ३३ टक्के महिला आरक्षण कधी आणि कसे लागू होईल हे येणारा काळच सांगेल, पण देशाचे संपूर्ण राजकारण निम्म्या लोकसंख्येभोवती केंद्रित होणार हे नक्की. काँग्रेसला 'सुधारणाविरोधी' ठरवताना पंतप्रधान भूतकाळातील उदाहरणे देण्यास विसरले नाहीत. विरोधी पक्षनेते राहुल गांधींपासून ते तामिळनाडूचे मुख्यमंत्री एमके स्टॅलिन यांच्यापर्यंत विरोधी पक्षांच्या नेत्यांनी पलटवार केला आहे की महिला आरक्षण विधेयक २०२३ मध्येच एकमताने मंजूर झाले आहे, आता भाजपला सीमांकन विधेयकाच्या नावाखाली देशाचा राजकीय नकाशा बदलायचा आहे. साहजिकच काही स्वाभाविक प्रश्न टाळून दोन्ही बाजूंनी आपापल्या राजकारणाला साजेसे युक्तिवाद निवडले आहेत. देशाच्या निम्म्या लोकसंख्येला यापुढे धोरणनिर्मिती प्रक्रियेतील सहभागापासून वंचित ठेवता येणार नाही, असे सरकारला वाटले. त्यामुळेच संसदेचे अर्थसंकल्पीय अधिवेशन तहकूब करण्याऐवजी तीन दिवसांची विशेष बैठक बोलावून महिला आरक्षणाशी संबंधित दुरुस्ती विधेयक मंजूर करून घेण्याचा सपाटा लावला गेला. निवडणुकीत महिलांचा वाढता सहभाग आणि निर्णायक भूमिका यामुळे त्यांना विधिमंडळात लवकरच आरक्षण देऊन आपली सत्ता सुरक्षित करता येईल, याची जाणीव राजकीय शक्तींना झाली आहे. मात्र, विधिमंडळात महिलांच्या अधिकाधिक सहभागाची काळजी दाखवणारे पुरुषप्रधान राजकारण त्यांना त्यांच्या जागेवर वाटा देण्यास तयार नाही. त्यामुळेच संसदेच्या ५४३ जागा वाढवून ८५० पर्यंत ३३ टक्के महिला आरक्षणाचा सुरक्षित मार्ग सापडला आहे. या कसरतीचा फायदा पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकीत एनडीएला होऊ शकतो, हे अनेक दशकांपासून सत्तेत यशस्वी खेळ करणाऱ्या विरोधकांना समजायला वेळ लागला नाही. महिला आरक्षणावर सर्वसाधारण एकमत असले तरी ताज्या जनगणनेच्या आधारे परिसीमनाची अट हटवण्याच्या घटनादुरुस्तीवरून सत्ताधारी आणि विरोधक यांच्यातील वादाच्या मुळाशी राजकारण असले तरी सत्तेच्या समतोलाचीही चिंता आहे. आत्तापर्यंत परिसीमनाचा आधार जनगणना होता. त्यामुळे दक्षिण भारतीय राज्ये लोकसभेच्या जागांच्या संख्येत आणि परिणामी राष्ट्रीय राजकीय समतोल यात मागे पडण्याची शक्यता आहे. अर्थात, लोकसंख्या नियंत्रण आणि उत्तम साक्षरता दराच्या मदतीने आर्थिक विकास आघाडीवर दक्षिण भारताने उत्तर भारतापेक्षा चांगली कामगिरी केली आहे. देशाच्या महसुलातही त्यांचा वाटा तुलनेने जास्त आहे. यासाठी त्यांना राजकीय शिक्षा होऊ नये, परंतु या आघाड्यांवर राजकीय नेतृत्व आणि प्रशासनाच्या अपयशाची शिक्षा उत्तर भारतीय राज्यांनाही देता येणार नाही. लोकसभा मतदारसंघाची लोकसंख्या दक्षिण भारताच्या तुलनेत उत्तर भारतात दुप्पट असणे तर्कसंगत नाही. भारतासारख्या मोठ्या आणि वैविध्यपूर्ण देशात अशा गुंतागुंतीच्या आव्हानांना वैचारिक चिंतनाने सामोरे जाऊन भविष्यासाठी समतोल धोरणे आखली जाऊ शकतात, परंतु आपल्या राजकारणाला समस्यांपासून दूर राहण्याची सवय झाली आहे. १९७६ मध्ये आणीबाणीच्या काळात, इंदिरा गांधी सरकारने ४२ व्या घटनादुरुस्तीद्वारे लोकसभेच्या ५४३ जागा २००१ पर्यंत गोठवल्या, तर वाजपेयी सरकारने २०२६ पर्यंत वाढवल्या. कमी राजकीय प्रतिनिधित्वाबाबत दक्षिणेकडील राज्यांची भीती दूर करत अमित शहा यांनी आश्वासन दिले की सर्व राज्यांमधील जागांची संख्या ५० टक्क्यांनी वाढेल, ज्यामुळे गुणोत्तराच्या समतोलावर कोणताही परिणाम होणार नाही. तरीही, विरोधक सीमांकन न करता महिला आरक्षण लागू करण्याचा आग्रह धरत आहेत आणि ताज्या जनगणनेच्या आधारे परिसीमनाची घटनात्मक तरतूद आहे, त्यालाही कारणे आहेत. प्रथम, ५० टक्के जागांच्या वाढीच्या सूत्रामुळे भाजपचे वर्चस्व असलेल्या उत्तर आणि पश्चिम भारतातही जागा वाढतील, ज्यामुळे लोकसभेत बहुमत मिळवणे सोपे होईल. दुसरे म्हणजे, घटना दुरुस्ती विधेयकात या सूत्राचा उल्लेख नव्हता. म्हणजेच २०११ च्या जनगणनेच्या आधारे सीमांकन केले गेले असते. या विधेयकातील दुरुस्तीसाठी शहा यांनी एक तासाचा अवधी मागितला, मात्र विरोधकांनी ते मान्य केले नाही. ताज्या जनगणनेच्या आधारे परिसीमन करण्याचे घटनात्मक बंधन काढून टाकून संसदेतील साध्या बहुमताच्या म्हणजेच सरकारच्या इच्छेवर सोडण्याच्या धोक्यांबाबत विरोधकांच्या चिंता समजू शकतात, परंतु सीमांकनासंबंधीच्या गुंतागुंतीवर तोडगा राष्ट्रीय विचारानेच शक्य आहे, राजकीय नव्हे. संविधानाने प्रत्येक मतदाराला एका मताचा अधिकार दिला असून प्रत्येक मताचे संख्याबळ समान आहे. त्यामुळे केवळ राजकीय समतोल साधण्यासाठी लोकसंख्येकडे दुर्लक्ष करण्याची कल्पना अलोक तांत्रिक आहे. कर महसूल, जीडीपी आणि सामाजिक विकासाच्या मापदंडांच्या आधारे राज्याच्या जागा निश्चित करण्याची तेलंगणाचे काँग्रेसचे मुख्यमंत्री रेवंत रेड्डी यांची मागणी राष्ट्रीय एकात्मतेसाठी फूट पाडणारी आहे, तर महिला आरक्षणात ओबीसी आणि मुस्लिम आरक्षणाची मागणी सामाजिक सलोख्यासाठी घातक आहे. सत्ताधारी आणि विरोधक यांच्यात कथनाचे युद्ध सुरू झाले आहे. घटनादुरुस्तीसाठी आवश्यक दोन तृतीयांश बहुमत नसतानाही, भाजपचा भूतकाळ कथनात्मक लढाईत पराभूत झाल्यामुळे संसदेच्या मध्य निवडणुकीची विशेष सभा घेण्याचा धोका असल्याचे मानले जात आहे, परंतु यावेळी त्यांच्या आघाडीचे पहिले संकेत सध्या सुरू असलेल्या विधानसभा निवडणुकीच्या निकालांवरून मिळू शकतात. तामिळनाडू आणि बंगालमध्ये मतदान होणे बाकी आहे, जेथे महिला मतदार तुलनेने अधिक प्रभावशाली आहेत.

**लोकसंसद**

### चीन मध्ये तब्बल २७ लाख घटस्फोट ..

चीनमध्ये १९७९ साली लोकसंख्या नियंत्रित आणण्यासाठी वन चाईल्ड पोलिसीचा अवलंब केला गेला यामुळे लोकसंख्या कमी होऊ लागली आता तेथे लोकसंख्या वाढीसाठी प्रयत्न चालू आहेत. आज चीन मधील तरुणाई मात्र लग्नाला तयार नाही. बरे लग्ने झाली तर प्रचंड प्रमाणात घटस्फोट होत आहेत. विशेषतः महिलांचा पुढाकार या बाबतीत मोठा आहे. तब्बल सत्तर टक्के महिला याबाबतीत पुढाकार घेत आहेत. चीन मध्ये जे विवाह झाले आहेत किंवा होत आहेत ते लगेचच घटस्फोटाच्या मार्गावर जात आहेत. महिलांचे आर्थिक स्वातंत्र्य, तसेच घटस्फोटित महिलांचा समाज सहज स्वीकार करत आहे. आणि विशेष म्हणजे समाजात या गोष्टीला मान्यता सुद्धा मिळत आहे. ही बातमी नुकतीच वाचली. दबावाखाली असलेले आयुष्य घालविण्याऐवजी स्वतंत्र राहण्याकडे कल वाढत आहे. सरकारने तेथे घटस्फोटाची प्रक्रिया अधिक कठीण केली आहे तरीसुद्धा त्यात बदल होत नाहीत. मते जुळत नाहीत किंवा लग्नाची गुणवत्ता चांगली नाही अशी कारणे पुढे आली आहेत. पारंपरिक कुटुंब व्यवस्था नष्ट होण्याच्या मार्गावर आहे. महिलांना आता आर्थिक स्वातंत्र्य हवे आहे. त्यांना लग्नाच्या बंधनात अडकवायचे नाही. हा बदल चीनमध्ये घडून येत आहे. जगात हळूहळू बदल होत असून भारत सुद्धा याला अपवाद नाही. अजून चीन सारखी परिस्थिती भारतात आली नाही पण कुटुंब व्यवस्थेत बदल घडून येत आहेत. आज भारतात मुला मुलींची लग्ने उशिरा होत आहेत किंवा होत नाहीत. मुली शिकत आहेत. त्यांच्या अपेक्षा वाढत आहेत. त्यांना शहरात राहणारा मुलगा हवा आहे. पारंपरिक कुटुंब व्यवस्था मोडकळीस आली आहे.

**– शांताराम वाघ, पुणे**

**दिनविशेष**

# नाट्य अभिनेते मास्टर दीनानाथ मंगेशकर

दीनानाथ गणेश मंगेशकर हे मराठी गायक, नाट्यअभिनेते, संगीतकार होते. त्यांचा जन्म २९ डिसेंबर १९०० रोजी गोव्यातील मंगेशी येथे झाला. तेथील निसर्गसम्य परिसरात दीनानाथांचे बालपण गेले. त्यांना उपजतच उंच, खणखणीत, सुरेल व भिंगरीसारखी फिरत असलेला असामान्य आवाज व अस्खलित वाणी लाभली होती. बालपणीच त्यांचा नावलौकिक 'किर्लोस्कर नाटक मंडळी' सारख्या श्रेष्ठ नाट्यसंस्थेच्या चालकांच्या कानावर गेला आणि केवळ चौदा वर्षांच्या दीनानाथांना बालगंधर्वांसारख्या अलौकिक गायकनटाची जागा भरून काढण्यासाठी पाचारण करण्यात आले. किर्लोस्कर मंडळीच्या 'ताजे वफा', 'काँटोंमें फूल' इत्यादी हिंदी-उर्दू नाटकांतील दीनानाथांच्या संगीत भूमिका विलक्षण लोकप्रिय ठरल्या. आपल्या विशाल, पाणीदार नेत्रांच्या, देखण्या व प्रसन्न व्यक्तिमत्त्वाने व निर्भर अशा मुक्त गायनाने त्यांनी रंगभूमी गाजवून सोडली.



बाबा माशेलकर हे दीनानाथ मंगेशकर यांचे पहिले गुरू होते. १९१४ साली बालगंधर्वांनी गंधर्व नाटक मंडळी नावाची संस्था सुरू केली. त्यावेळी किर्लोस्करांनी गंधर्व नाटक मंडळीची दीनानाथांना ओळख करून दिली आणि या संस्थेमार्फत दीनानाथ रंगभूमीसोबत जोडले गेले.

दीनानाथ यांनी १९१५ साली 'ताजेवफा' या हिंदी नाटकाच्या माध्यमातून रंगभूमीवर पदार्पण केलं. या नाट्यसंस्थेत चार वर्ष काम केल्यानंतर त्यांनी १९१८ साली 'बलवंत संगीत मंडळी' नावाच्या नाटक कंपनीची स्थापना केली. या नाट्यसंस्थेचा साहित्याकडे सर्वाधिक कल होता. नाट्य संगीताला महाराष्ट्रभरात ओळख देण्यात दीनानाथांचा मोठा हातभार आहे.

दीनानाथ हे 'बलवंत संगीत मंडळी' चे (स्थापना १९१८) प्रमुख मालक-भागीदार होते. या नाटक मंडळीने मनोरंजनाबरोबरच बोध, देशभक्ती, समाजसुधारणा यांचे दर्शन घडवणारी राम गणेश गडकरी, वीर वामनराव जोशी, स्वातंत्र्यवीर सावरकर, वासुदेव शास्त्री खरे, विश्राम बेडेकर इत्यादी अग्रगण्य नाटककारांची नवनवीन नाटके रंगूभूमीवर आणली. 'गंधर्व' आणि 'ललितकलादर्श' अशा प्रस्थापित नाटक मंडळ्यांबरोबर बलवंतने स्वतःचे स्वतंत्र स्थान निर्माण केले.

दीनानाथांच्या सुरुवातीच्या 'किंकिणी' आणि पुढे 'कालिंदी' (पुण्यप्रभाव), 'लतिका' (भावबंधन), 'पद्मावती' (उग्रमंगल), 'तेजस्विनी' (रणदुंदुभी), वेगळ्या घाटणीचा 'धैर्यधर'(मानापमान), 'सुलोचना' (संन्यस्त खड्ग), 'गोतम' (ब्रह्मकुमारी), 'शिंवागी' (राजसंन्यास) इत्यादी स्त्री-पुरूष भूमिका व त्यांची वेगळ्या शैलाची तडफदार गाणी नाट्यरसिकांना वेड लावून गेली. दीनानाथांच्या गाण्यांतून व अभिनयातून वीर, शृंगार, शांत हे रस प्रामुख्याने प्रत्ययास येत. कुणाचेही अनुकरण न करता, स्वतःचे स्वतंत्र आणि चमत्कृतीपूर्ण, पण अत्यंत भावमधुर व काळजाला भिडणारे गाणे गाऊन गेले, यातच दीनानाथांचे महत्त्व व मोठेपण सामावले आहे. दीनानाथ मंगेशकर यांनी मैफली गाजवल्या आहेत. आकाशवाणीच्या मुंबई केंद्रावरुन त्यांनी रसिकांचं मनोरंजन केलं आहे. सारंगीवादन, कथ्थक नृत्य, संस्कृत साहित्य हे दीनानाथांचे आवडते छंद होते. तसेच ते एक उत्तम ज्योतिषीदेखील होते. अशा या प्रतिभावान नाट्यअभिनेत्याचे २४ एप्रिल १९४२ रोजी निधन झाले.

अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

२४ एप्रिल

१) श्री.रमेश जगन्नाथ नागवेकर
पंतनगर, अलिबाग
दि.२४-४-१९३८

२)श्रीम.नीता शरद राउळगावकर
मु.विद्यानगर, अलिबाग
दि.२४-४-१९४०

३)श्रीम.वसुधा अनंत कामतेकर
ब्राम्हणआळी, अलिबाग
दि.२४-४-१९४३

४)श्री.के.एस.पुष्पगंधन
गोंधळपाडा, अलिबाग
दि.२४-४-१९६१

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)

- मुख्य संपादक, कृषीवल

आजचे अन्नदाते



श्री. वसंत कानू सिंगासने, वाढदिवस, चेंढरे अलिबाग

## शितपेयांना वाढती मागणी

**कोलाड :** मार्च महिना संपताच खऱ्या अर्थाने उन्हाळा सुरु झाला असून तापमानाचा पारा ४१ अंशा पेक्षा जास्त गेला आहे. त्यामुळे वाढत्या उष्णतेमुळे जनता पूर्णपणे हैराण झाली आहे. यासाठी कलिंगड, ज्यूस, शितपेय जनता अधिक पसंती देत यांची मागणी वाढली आहे. वाढते प्रदूषण व सतत होणाऱ्या पर्यावरणाचा ऱ्हास यामुळे राने वने ओस पडू लागली आहेत. यामध्ये भरीत भर म्हणून सिमेंटचे रस्ते यामुळे दिवसेंदिवस उष्णतेचे प्रमाण वाढत आहे. या वाढत्या तापमानामुळे नागरिक पूर्णपणे हैराण होत आहे. यामुळे शरीराचा दाह कमी करण्यासाठी तसेच शरीराला गारवा मिळण्यासाठी कलिंगड, शितपेय,ज्यूस याकडे लोकांचा कळ वाढतांना दिसत आहे. भरमसाठ वृक्षतोड व दिवसेंदिवस वाढत चाललेले वनवे यामुळे परिसर व रस्ते आग ओकतांना दिसत आहेत.

# ... तर मराठी आलीच पाहिजे

## ● मंत्री प्रताप सरनाईक यांचा इशारा

**| मुंबई | प्रतिनिधी |**

राज्य सरकारने नुकतेच १ मे म्हणजेच महाराष्ट्र दिनापासून परवानाधारक रिक्षा आणि टॅक्सीचालकांसाठी मराठी भाषा बोलणे सक्तीची करण्याचा निर्णय जाहीर केला. परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी याबाबतची घोषणा काही दिवसांपुर्वी केली होती. यावरून मुंबईमध्ये अनेक प्रतिक्रिया उमटू लागल्यात आहे. राज्य सरकारच्या या निर्णयाला आता अनेकांनी विरोध केला आहे. अशामध्ये परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी गुरुवारी (दि.२३) आणखी एक पत्रकार परिषद घेत मराठी न येणाऱ्या आणि समजणाऱ्या रिक्षा आणि टॅक्सी चालकांसाठी एक महत्त्वाची घोषणा केली आहे.

महाराष्ट्रात व्यवसाय करायचा असेल तर मराठी शिकावीच लागेल असा पवित्रा शासनानं घेतला आहे. ज्यांना मराठी शिकायची इच्छा आहे त्यांना आम्ही अगदी सोप्या भाषेत मराठी शिकवू. परंतु, मराठी बोलावीच लागेल, असे परिवहन मंत्री सरनाईक म्हणाले.



राज्यात मराठी भाषेचा प्रसार व्हावा आणि नागरिकांशी संवाद अधिक सुलभ व्हावा, यासाठी रिक्षा व टॅक्सी चालकांना व्यावहारिक मराठी बोलणे अनिवार्य करण्याचा निर्णय परिवहन विभागाने घेतला आहे. त्यासाठी मोटार वाहन नियम ४, २८ आणि ८५ मध्ये आवश्यक बदल करण्यात येणार आहे. याबाबत महत्त्वाची बैठक गुरुवारी (२३) घेण्यात आली. या बैठकीस परिवहन आयुक्त राजेश नार्वेकर, मराठी भाषा विभागाचे उपसचिव नामदेव भोसले, राज्य मराठी विकास संस्थेचे संचालक डॉ. शामकांत देवरे तसेच डॉ. उज्ज्वला मेहेंदळे, मिनाक्षी जयकर, प्रा. सुहासिनी किर्तीकर, तुकाराम कांदळकर, सतीश सोलांकूरकर, अरुण म्हात्रे, शिवाजी गावडे, अशोक चिटणीस, प्रा. मनीषा राजपूत, डॉ. अनुपमा उजगरे आदी उपस्थित होते.

मराठी राजभाषा अधिनियम परिवहन विभागाला लागू असून नागरिकांशी संवाद साधताना चालकांना किमान 'वर्किंग नॉलेज' स्वरूपातील मराठी येणे आवश्यक आहे. यासाठी कायद्यातील तरतुदींच्या आधारे नियमांमध्ये सुधारणा करून परवाना (लायसन्स), बॅज व परमिट देताना किंवा त्यांचे नूतनीकरण करताना मराठी ज्ञानाची अट लागू करण्यात येणार आहे. तसेच, चालकांवर अतिरिक्त ताण न आणता त्यांच्या दैनंदिन व्यवहारात उपयोगी पडतील अशी वाक्ये शिकविण्यावर भर दिला जाणार आहे.

कोणाच्याही रोजगारावर गदा आणण्याचा हेतू नाही. पण, महाराष्ट्रात व्यवसाय करणाऱ्यांनी मराठी शिकणे आवश्यक आहे, अशी स्पष्ट भूमिका मांडत सक्तीपेक्षा जनजागृती, प्रोत्साहन आणि सुलभ मराठी शिक्षण यांवर भर देत हा उपक्रम राबविण्यात येणार असल्याचे सांगितले.

### प्रशिक्षण केंद्रे सुरू करणार

रिक्षा-टॅक्सी चालकांना मराठी शिकविण्याची जबाबदारी कोकण मराठी साहित्य संघ आणि मुंबई मराठी साहित्य संघ या संस्थांकडे देण्यात येणार आहे. त्यांच्या माध्यमातून मुंबई महानगर प्रदेशात विविध प्रशिक्षण केंद्रे सुरू केली जाणार आहेत. प्रशिक्षण पूर्ण केलेल्या चालकांना प्रमाणपत्र देण्यात येईल, जे भविष्यात लायसन्स किंवा परमिट प्रक्रियेत उपयुक्त ठरेल. या उपक्रमासाठी सुमारे १०० दिवसांचा कालावधी निश्चित करण्यात येणार असून, या कालावधीत अभ्यासक्रम, प्रश्नावली आणि प्रशिक्षण व्यवस्था पूर्ण केली जाईल.

## वाढदिवशी जोपासला समाजसेवेचा वारसा



## ● विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप

**| नागोठणे | प्रतिनिधी |**

नागोठण्याजवळील कोंडगाव येथील धामणे कुटुंबियांच्या आणि आपले दिवंगत आजोबा सजनाजी धामणे यांच्या समाजसेवेचा वारसा जतन करून तो पुढे नेण्याचे काम युवा उद्योजक विनोदशेठ विजय धामणे यांच्याकडून सुरू आहे. याच समाजसेवेचा एक भाग म्हणून विनोद धामणे यांनी बुधवारी (दि.२२) साजरा झालेल्या आपल्या वाढदिवसाचे औचित्य साधून कोंडगाव व लगतच्या आदिवासी वाड्यातील प्राथमिक व अंगणवाडी शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय उपयोगी साहित्याचे वाटप केले. आपल्या धामणे कुटुंबियांचा सामाजिक वारसा पुढे सुरू ठेवल्याने विनोद धामणे यांचे सर्वत्र कौतुक व अभिनंदन करण्यात येत आहे. शालेय साहित्य वाटप कार्यक्रमाचे आयोजक असलेल्या शिवराज मित्रमंडळ, कोंडगाव यांच्या सहकार्याने हा उपक्रम राबविण्यात आला. युवा उद्योजक कु. विनोदशेठ धामणे यांच्या वाढदिवसा निमित्त कोंडगावसह, कातळावाडी, तळईवाडी आणि पायरवाडी येथील अंगणवाडी आणि प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना दफ्तर, पाणी बाटली, वह्या, कंपास पेटी, पेन, पेन्सिल अशा शालेय उपयोगी साहित्याचे वाटप करण्यात आले.

## एकाच दिवशी तीन आत्महत्येच्या घटना

**पालघर :** मिरा- भाईंदरमध्ये एकाच दिवशी तीन आत्महत्या झाल्याच्या धक्कादायक घटना घडल्या आहेत. पहिली घटना भाईंदर पूर्वेच्या गोल्डन नेस्ट परिसरात घडली आहे. यात एका २९ वर्षीय व्यक्तीने इमारतीवरून उडी मारून आत्महत्या केली आहे. तर दुसऱ्या घटनेत भाईंदर पश्चिमेच्या गणेश देवल नगर परिसरात २१ वर्षीय युवकाने गळफास घेऊन आत्महत्या केली आहे. तर तिसऱ्या घटनेत मिरारोड पूर्वेच्या काशिगाव स्मशानभूमीजवळ २१ वर्षीय युवकाने गळफास लावून आत्महत्या केल्याची घटना घडली आहे.

या नवघर पोलीस ठाण्यात दाखल झालेल्या अकस्मात मृत्यू नोंदीत जितेशकुमार परिहार (वय २९ वर्ष रा. रामेश्वर टॉवर न्यू गोल्डन नेस्ट, भाईंदर पूर्व) यांनी राहत्या इमारतीमधून कोणत्यातरी अज्ञात कारणावरून उडी मारून आत्महत्या केली आहे. तर दुसऱ्या घटनेत भाईंदर पश्चिमेच्या गणेश देवल नगर, जनता नगर रोड येथे विकासकुमार बिंद (२१) याने घरात एकटा असताना छताच्या लोखंडी आडव्या बारला साडीच्या साह्याने गळफास लावून आत्महत्या केली आहे. तर तिसरी घटनाही काशिगाव पोलीस ठाण्यात पोलीस ठाणे हद्दीत घडली आहे. यात दीपक शर्मा (वय २१, रा.दाचकुलपाडा, काशिगाव) याने कोणत्यातरी अज्ञात कारणावरून राहत्या घरात साडीच्या साह्याने गळफास लावून आत्महत्या केल्याची घटना घडली आहे. या तिन्ही घटनांचा तपास पोलिसांकडून सुरू आहे.

## गाव-वाड्यांना टँकरचा आधार

**| खेड | प्रतिनिधी |**

वाढत्या उन्हाच्या झळांमुळे खेड तालुक्यात पाणीटंचाईची समस्या दिवसेंदिवस गंभीर होत चालली आहे. पिण्याच्या पाण्यासाठी नागरिक हैराण झाले असून, प्रशासनाने तातडीने पावले उचलत तालुक्यातील ६ गावे आणि १० वाड्यांमध्ये टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू केला आहे.



तालुक्यातील काही भागात पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई निर्माण झाली आहे. परिस्थितीवर नियंत्रण मिळवण्यासाठी प्रशासनाने टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू केला असून, सध्या एक दिवस आड या धर्तीवर पाणी वाटप केले जात आहे. प्रशासनाचे या संपूर्ण परिस्थितीवर बारकाईने लक्ष असून, पाणीपुरवठा सुरळीत ठेवण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

९ एप्रिलपासून घेरासालगड-भराडे धनगरवाडी, निमणी-धनगरवाडी, कशेडी-बोरटोक व बांगला, खवटी (खालची व वरची धनगरवाडी), सावेणी-धनगरवाडी, केळणे-भोसलेवाडी, मांगलेवाडी, हुंबरी आणि म्हाळुंगे-धनगरवाडी या ठिकाणी टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू करण्यात आला आहे. या परिस्थितीमुळे ग्रामस्थांना काहीसा दिलासा मिळाला असला तरी, उन्हाचा वाढता पारा चिंतेचा विषय ठरत आहे.

## महत्वाचे पॉईंट्स सुशोभीकरणाच्या प्रतीक्षेत

**| माथेरान | प्रतिनिधी |**

पर्यटननगरी माथेरानमध्ये आजही अनेक महत्वाचे पॉईंट्स सुशोभीकरणाच्या प्रतीक्षेत दिसत आहेत. वेळीच या मुख्य पॉईंट्सला गतवैभव प्राप्त करून दिले नाही तर हळूहळू हे पॉईंट नामशेष होण्याच्या मार्गावर जाण्याची शक्यता नाकारता येत नसल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे.



माथेरान याठिकाणी थंड हवा, शुद्ध वातावरण आणि स्वच्छ सुंदर निसर्ग ह्या व्यतिरिक्त अन्य काही करमणुकीची साधने उपलब्ध नाहीत की, ज्या माध्यमातून पर्यटकांना आकर्षित करता येऊ शकते. पर्यटनात वाढ होऊ शकते असा एकही महत्वाकांक्षी प्रकल्प आजतागायत कोणत्याही सत्ताधारी गटाने राबविलेला नाही. ठराविक पॉईंट्सवर सेल्फी झोन अथवा पर्यटकांना विश्रांती घेण्यासाठी अद्ययावत सोयीसुविधा, धूळविरहित रस्ते, मुलांना खेळण्यासाठी साहित्य असे कोणतेही विकासात्मक काम करण्यात आलेले नाही. दर पाच वर्षांनी तेच तेच जाहीरनामे आणि पोकळ आश्वासने देऊन सर्वसामान्य लोकांची एकप्रकारची फसगत होत असते. महत्वाचा भाग म्हणजे येणाऱ्या पर्यटकांमुळेच इथे सर्वांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतात. नगरपरिषदेला प्रवासी कराच्या माध्यमातून दरवर्षी लाखो रुपयांचे उत्पन्न प्राप्त होते. त्यामुळे येणारा पर्यटक सातत्याने इथे यायला हवा यासाठी प्रयत्न होणे गरजेचे असल्याचे मत स्थानिक व्यक्त करताना दिसत आहेत.

काही पॉईंट्सवरील संरक्षण रेलिंग तुटले आहेत. त्यामुळे अपघात होण्याची दाट शक्यता असते. अशा पॉईंट्सचे रुपडे पालटले तर पर्यटनात वाढ होऊ शकते.

## भातसई येथे विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन

**धाटाव :** रोहा तालुक्यातील श्री क्षेत्र भातसई येथे श्री महादाई देवी व धावीर महाराज मूर्तींच्या वर्धापन दिनानिमित्त मंगळवार दि.२८ एप्रिल रोजी विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या निमित्ताने श्री सत्यनारायणाची महापूजा, अभिषेक, हरिपाठ, कीर्तन व महाप्रसाद असे विविध कार्यक्रम पार पडणार आहेत. कार्यक्रमाची सुरुवात सकाळी ८ ते ९ वाजता काकडा याने होणार आहे. त्यानंतर ९ ते १० अभिषेक, तसेच सकाळी ११ वाजता श्री सत्यनारायणाची महापूजा, सायंकाळी ६.०० ते ७.०० हरिपाठ आयोजित करण्यात आला असून, विविध पंचक्रोशीतील वारकरी संप्रदाय यामध्ये सहभागी होणार आहेत. त्यानंतर रात्री ७ ते ८ महाप्रसाद व रात्री ९ ते ११ कीर्तन आयोजित करण्यात आले आहे.

## आंतरराष्ट्रीय ई-संमेलन उत्साहात

**| चिरनेर | प्रतिनिधी |**

उद्योजकता आणि व्यवस्थापनातील उदयोन्मुख प्रवाह या विषयावर आधारित आंतरराष्ट्रीय ई-संमेलन अत्यंत उत्साहात पार पडले. हे संमेलन अंजुमन इस्लाम जंजिरा डिग्री कॉलेज ऑफ सायन्स, मुरुड-जंजिरा, रयत शिक्षण संस्थेचे वीर वाजेकर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, फुंडे, उरण, कला व वाणिज्य महाविद्यालय, खारेपाटण, ता. कणकवली, जि. सिंधुदुर्ग) आणि अंजुमन इस्लाम जंजिरा डिग्री कॉलेज ऑफ कॉमर्स, श्रीवर्धन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आले होते.

कार्यक्रमात देश-विदेशातील मान्यवर, प्राध्यापक, संशोधक व विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला. प्रास्ताविक सादर करताना डॉ. साजिद शेख यांनी संमेलनाचे उद्दिष्ट स्पष्ट करताना सांगितले की, व्यवस्थापन क्षेत्रात नव्या प्रवाहांची ओळख करून देणे व संशोधनाला चालना देणे, हे या उपक्रमाचे प्रमुख ध्येय आहे. त्यांनी विद्यार्थ्यांनी जागतिक स्तरावरील संधींचा लाभ घ्यावा, असेही आवाहन केले.

प्रमुख भाषणात डॉ वाल्मिक सरवदे यांनी डिजिटल युगातील व्यवस्थापनाचे बदलते स्वरूप स्पष्ट केले. त्यांनी उद्योजकतेत नवकल्पना आणि संशोधन यांचे महत्त्व अधोरेखित करत जागतिक स्पर्धेत टिकून राहण्यासाठी कौशल्यविकास आवश्यक असल्याचे नमूद केले.

पहिल्या निमंत्रित व्याख्यानात प्रा. डॉ. अरुण चैनीत यांनी आंतरराष्ट्रीय व्यवस्थापनातील नवीन ट्रेंड्स आणि तंत्रज्ञानाचा वापर यावर मार्गदर्शन केले. त्यांनी जागतिक स्तरावर स्पर्धात्मक बनण्यासाठी विद्यार्थ्यांनी नवकल्पना व संशोधनाकडे वळावे, असे सांगितले.

दुसऱ्या निमंत्रित व्याख्यानात डॉ. अतिक शेख यांनी आधुनिक व्यवस्थापन कौशल्ये, नेतृत्वगुण आणि उद्योगक्षेत्रातील संधी यावर प्रकाश टाकला. त्यांनी विद्यार्थ्यांनी व्यावसायिक कौशल्ये विकसित करून उद्योगजगताशी सुसंगत राहणे आवश्यक असल्याचे सांगितले. त्यानंतर ३८ संशोधकांनी आपापले संशोधन पेपर सादर केले.

पाण्याच्या स्त्रोतांचे प्रदूषण कमी होणार | वातावरणाची गुणवत्ता वाढणार

# राज्य कॉम्प्रेस्ड बॉयोगॅस धोरण जाहीर

**| मुंबई | प्रतिनिधी |**

महाराष्ट्र राज्य कॉम्प्रेस्ड बायोगॅस धोरण २०२६ राबविण्यास झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. या धोरणाच्या अंमलबजावणीमुळे शहरांतील कचऱ्याची विल्हेवाट पर्यावरणपूरक पध्दतीने लावणे शक्य होणार आहे. त्याचबरोबर कचरा साठविण्यामुळे निर्माण होणाऱ्या विविध समस्या, पाण्याच्या स्त्रोतांचे प्रदूषण कमी होईल, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

या धोरणाच्या अंमलबजावणीसाठी सन २०२६-२७ या वर्षासाठी ५०० कोटी रुपयांची तरतूद करण्यास मान्यता देण्यात आली. तसेच कॉम्प्रेस्ड बॉयोगॅसच्या गरजेनुरूप वापरण्यायोग्य गॅस उपलब्ध होण्यासाठी आवश्यक तंत्रज्ञान वापरून प्रकल्प उभारण्यास मान्यता देण्यात आली. धोरणांच्या अंमलबजावणीसाठी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली सुकाणू समिती स्थापन करण्यात येणार आहे. प्रकल्प पीपीपी आणि हायब्रिड अँन्युटी तत्वावर राबविण्यात येणार आहे. हे धोरण कचऱ्याचे ऊर्जा आणि खतामध्ये रूपांतर करून रोजगार आणि संपत्ती निर्माण करणारे आहे.

राज्याच्या नागरी भागातील कचऱ्याचे विलगीकरण, संकलन, प्रक्रिया आणि स्वच्छ ऊर्जेत रुपांतर करण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांना सक्षम करणे धोरणाचा उद्देश आहे. या धोरणाव्दारे कॉम्प्रेस्ड बॉयोगॅसच्या उत्पादनास आणि घनकचरा व्यवस्थापन यंत्रणेच्या एकत्रिकरणास प्रोत्साहन दिले जाणार आहे.

यामुळे घनकचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या जागेवरील भार कमी होईल, सार्वजनिक आरोग्यात सुधारणा होईल आणि हरितगृह वायुचे उत्सर्जन कमी झाल्यामुळे वातावरणाची गुणवत्ता वाढीस लागेल. जमीनीचा ऱ्हास, वायु प्रदूषण, ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना देण्यासाठी नागरी कचरा आणि कृषी कचरा स्त्रोतांवर कॉम्प्रेस्ड बॉयोगॅस उपक्रमांना प्रोत्साहन देणे, धोरणाचा मुख्य उद्देश आहे.

या धोरणामुळे ऊर्जा आणि आयात घट होईल. जीवाश्म इंधनावरील अवलंबित्व कमी होऊन, कार्बन उत्सर्जनात घट, वाहतूक, औद्योगिक आणि घरगुती क्षेत्रासाठी स्वच्छ इंधनाचा पर्याय उपलब्ध होईल.

### दीर्घकालीन भाडेतत्त्वावर जमीन उपलब्ध

कच्चा माल, प्रकल्प विकासक आणि संकलन संस्थांमध्ये समन्वय साधण्यासाठी डिजिटल इंटिग्रेशन, पोर्टल आणि मोबाईल ॲप आधारित व्यवस्था उभारण्यात येणार आहे. सरकारी जमीन, कचरा प्रक्रिया केंद्रांजवळील जमीन आणि आवश्यक पायाभूत सुविधांसाठी राखीव जमीन दीर्घकालीन भाडेतत्त्वावर उपलब्ध करून देण्याची तरतूद आहे. प्रकल्पांना एक खिडकी मंजुरी, जमीन उपलब्धता आणि इतर आवश्यक परवानग्या जलदगतीने देण्याची तरतूदही करण्यात आली आहे.

### प्रकल्प उभारण्याची तरतूद करणार

सीबीजी प्रकल्पांसाठी किमान २०० टन प्रतिदिन क्षमतेचा निकष ठेवण्यात आला आहे. हे प्रकल्प स्थानिक स्वराज्य संस्था, सार्वजनिक क्षेत्रातील कंपन्या व उपक्रम, खाजगी विकासक आणि तेल व वायू वितरण कंपन्यांमार्फत ग्रीनफिल्ड किंवा ब्राऊनफिल्ड स्वरूपात राबविता येतील. ज्या ठिकाणी पुरेसा कचरा उपलब्ध नाही तिथे क्लस्टर-आधारित प्रकल्प, तसेच कृषी उत्पादक संस्थाच्या मदतीने कृषीतील टाकाऊ घटकांचे एकत्रिकरण करून प्रकल्प उभारण्याची तरतूद करण्यात आली आहे.

## निवडक



### शिवशाही बसला भीषण आग

**ठाणे :** ठाणे रेल्वे स्टेशनवरील सेटीस ब्रिजवर शिवशाही बसला भीषण आग लागली. बसच्या खालील बाजूस इंजन आणि डिझेल टाकीजवळ ही आग लागल्याने बसने पेट घेतला, त्यामध्ये बस पूर्णपणे जळून खाक झाली. ही शिवशाही बस ठाण्याहून पालघरमार्गे बोईसरकडे रवाना होत होती. दरम्यान बसला आग लागल्याने प्रवाशांसह सर्वांचाच खोळंबा झाला. आगीचे प्राथमिक कारण शॉर्ट सर्किट असल्याचे सांगितले जात आहे. यावेळी बसमध्ये एकूण १५ प्रवासी होते, मात्र आग लागल्याचे समजताच प्रवाशांनी बसमधून बाहेर धाव घेतल्याने सुदैवाने मोठी दुर्घटना टळली. सध्या बसमधील सर्व प्रवासी सुखरुप आहेत. बसला आग लागल्यानंतर स्थानिकांनीही घटनास्थळी धाव घेतली, काहींनी आग आटोक्यात आणण्यासाठी प्रयत्न केले. बसला आग लागल्यानंतर तात्काळ अग्निशमन दलाच्या गाडीला पाचारण करण्यात आले. अग्निशमनच्या जवानांकडून आग विझवण्यासाठी शर्थीचे प्रयत्न करण्यात आले.



### तिनविरा येथे वर्ल्ड बुक डे साजरा

**चिरनेर :** जे.एस.डब्ल्यू फाउंडेशन आणि मॅजिक बस इंडिया फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने रायगड जिल्ह्यातील पेण आणि अलिबाग तालुक्यांमधील २६ शाळांमध्ये जे.एस.डब्ल्यू ॲस्पायर प्रोजेक्ट डोलवी हा उपक्रम राबविला जात आहे. या उपक्रमांतर्गत शाळांमध्ये आणि कम्युनिटीमध्ये वेगवेगळे उपक्रम राबविले जातात. याचाच भाग म्हणून टी.टी.पाटील विद्यामंदिर तिनविरा येथे वर्ल्ड बुक डे साजरा करण्यात आला. या कार्यक्रमासाठी टी.टी.पाटील विद्यामंदिर तिनविरा शाळेचे मुख्याध्यापक ततरे, शिक्षक, विद्यार्थी तसेच बालपंचायत सदस्य उपस्थित होते. सर्वप्रथम मुलांना वर्ल्ड बुक डेबद्दल माहिती सांगण्यात आली. त्यानंतर वाचनाचे महत्त्व सांगण्यात आले. वर्ल्ड बुकच्या निमित्ताने मुलांना बुक मार्क तयार करणे ही ॲक्टिव्हिटी घेण्यात आली. मुलांना 'बुक मार्क' ही संकल्पना खूप आवडली. त्यामुळे आपण आपल्या पुस्तकांची वह्यांची काळजी कशाप्रकारे घेऊ शकतो, हे समजले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मॅजिक बसचे डॉ.प्रगती पाटील (मॅनेजर), दर्शना पाटील (अकॅडमिक एज्यूकेटर), मीनल धुमाळ (लाईफ स्किल एज्यूकेटर), रश्मी पाटील (सी.सी.) यांनी विशेष मेहनत घेतली.



### सहा फूटी अजगराची सुटका

**पाताळगंगा :** हाळ बुद्रुक गावात राहणारे अमजद सोंडे यांना पहाटेच्या सुमारास घराजवळील कोंबड्यांच्या खुराड्यात संशयास्पद हालचाल दिसली. त्यांनी जवळ जाऊन पाहिले असता सहा फुटी अजगर कोंबड्यांवर हल्ला करण्याच्या तयारीत होता. त्यांनी हेल्प फाउंडेशनचे सर्पमित्र अमोल ठकेकर यांच्याशी संपर्क साधला असता गुरुनाथ साठेलकर यांनी तात्काळ येऊन अजगर पकडला आणि जंगलात सोडला. या खुराड्यात अडकलेल्या अजगरामुळे कोंबड्यांमध्ये भीती पसरली होती. पकडल्याने त्यांचा चिवचिवाट थाबला. पूर्वीही या भागात मुंगूस, अजगर व घोणस साप कोंबड्यांच्या पिंजऱ्यात अडकल्याच्या घटना घडल्या आहेत. प्रत्येक वेळी हेल्प फाउंडेशनच्या सर्पमित्रांनी तत्परतेने मदत करत परिस्थिती नियंत्रणात आणली आहे. यामुळे आजच्या या धाडसी आणि वेळेवर केलेल्या कामगिरीबद्दल अमजद सोंडे यांनी हेल्प फाउंडेशनचे आभार मानले.



### जागतिक पुस्तक दिनानिमित्त ग्रंथप्रदर्शन

**म्हसळा :** केशवराव खांबेटे सार्वजनिक वाचनालयात 'जागतिक पुस्तक दिन' उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त मान्यवरांच्या हस्ते ग्रंथप्रदर्शनाचे उद्घाटन तसेच ग्रंथपूजन करण्यात आले. कार्यक्रमाला माजी सभापती महादेव पाटील, सहा.कृषी अधिकारी रामेश्वर मगर, वाचनालयाचे अध्यक्ष संजय खांबेटे, खजिनदार सुनील उमरोटकर, संचालक प्रा.रायप्पा माशाळे, सहाय्यक अधीक्षक सुशीलकुमार गाडगे, कृषी सेवक धनंजय साठे, राहुल झडे, मंदार नवघरे, रमेश पवार, डाटा ऑपरेटर परशुराम नाक्ती, ग्रंथपाल उदय करडे, सायली चोगले, अनुष्का म्हात्रे उपस्थित होते. ग्रंथ प्रदर्शनात विश्वकोश, महर्षी व्यास, माझी मायबोली, साने गुरुजी, युगंधर, रामायण, महाभारत, ज्ञानेश्वरी, वचनामृत, स्वामी, मृत्युंजय, पानिपत, कृष्णमय मीरा, चंद्रगुप्त मौर्य, अध्यात्मिक, ऐतिहासिक, धार्मिक, अशी विविध विषयांवरचे ग्रंथ होते. कार्यक्रमात बोलताना संचालक मंडळाचे सदस्य प्रा.रायप्पा माशाळे यांनी पुस्तक निर्मितीचा इतिहास अत्यंत रंजक असल्याचे सांगितले. पंधराव्या शतकापूर्वी भूर्जपत्र व ताडपत्रांवर नैसर्गिक झाडपालांपासून तयार केलेल्या शाईने ग्रंथ लिहिले जात असत असे त्यांनी नमूद केले. पुढे पंधराव्या शतकात 'जोहान्स गुटेनबर्ग' यांनी छापखान्याचा शोध लावल्याने मुद्रणकलेला नवे युग प्राप्त झाले. भारतात छापखान्याचा प्रसार एकोणीसाव्या शतकात झाला. सन १८१० मध्ये विल्यम केरी यांनी 'द डिक्शनरी ऑफ मराठा लँग्वेज' हे मराठीत छापील पुस्तक प्रकाशित केल्याचे त्यांनी सांगितले. त्यानंतर छपाई तंत्रज्ञान झपाट्याने विकसित झाले. आजच्या घडीला भारतात दररोज हजारो पुस्तके प्रकाशित होत असून भविष्यात कृत्रिम बुद्धिमत्ता छपाई व प्रकाशन क्षेत्रासाठी वरदान ठरणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

# कर्जत तालुक्यात पाणीटंचाई तीव्र

## ।। चार गावे, चार आदिवासी वाड्यांना टँकरद्वारे पाणीपुरवठा

। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत तालुक्यात उन्हाळ्याची तीव्रता वाढताच पाणीटंचाईने डोके वर काढले आहे. तालुक्यातील काही नद्या बारमाही वाहात असल्या तरी अनेक प्रमुख नद्या व उपनद्या उन्हाळ्यात कोरड्या पडत असल्याने विशेषतः दुर्गम व आदिवासी भागात पाण्याचे मोठे संकट निर्माण झाले आहे.

या पार्श्वभूमीवर शासनाने पाणीटंचाई आराखड्याची अंमलबजावणी सुरू करत चार गावे आणि चार आदिवासी वाड्यांना टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू केला आहे. तसेच आणखी चार गावांकडून टँकरची मागणी करण्यात आली आहे.

दरवर्षीप्रमाणे यंदाही मार्चपासून तालुक्यातपाणीटंचाईजाणवूलागली आहे. टाटा धरणाच्या पाण्यावर पेज नदी काही अंतरापर्यंत वाहते; मात्र



त्याआधी उल्हास नदी कोरडी पडते. तसेच चिल्हार व पोश्री या नद्या आणि अनेक उपनद्या उन्हाळ्यात आटत असल्याने परिस्थिती गंभीर बनते.

दरम्यान, जलजीवन मिशन अंतर्गत अनेक नळपाणी योजना निधीअभावी रखडल्याने समस्या अधिकच वाढली आहे. याची दखल घेत डिसेंबर २०२५ मध्ये पाणीटंचाई कृती आराखडा तयार करण्यात आला होता. त्यानुसार यंदा तालुक्यातील २० गावे आणि ३९ आदिवासी वाड्या पाणीटंचाईग्रस्त म्हणून घोषित करण्यात आल्या आहेत.

तालुक्यातील उमरोली ग्रामपंचायतीतील अशाणे येथे यंदाचा पहिला शासकीय टँकर सुरू करण्यात आला आहे. त्यानंतर कोशाणे, उमरोली आणि ओलमन ग्रामपंचायतीतील झुगरेवाडी या गावांनाही टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू झाला आहे. तसेच किरवली

> “तालुक्यातील आणखी चार ठिकाणी टँकर सुरू करण्याची मागणी प्राप्त झाली आहे. त्या ठिकाणी पाहणी करून आवश्यक त्या ठिकाणी टँकर सुरू करण्याची कार्यवाही लवकरच केली जाईल.
> – केशव जाधव, स्थापत्य अभियांत्रिकी सहायक”

ठाकूरवाडी, सावरवाडी ठाकूरवाडी, पळसदरी ठाकूरवाडी आणि वर्णे ठाकूरवाडी येथेही टँकर सुरू करण्यात आले आहेत.

जिल्हाधिकारी स्तरावर मागवलेल्या निविदेनुसार कर्जत तालुक्यासाठी १४ हजार लीटर क्षमतेचे पाच टँकर मंजूर करण्यात आले असून, त्याद्वारे पाणीटंचाईग्रस्त भागांना पाणीपुरवठा केला जात आहे. वाढत्या उष्णतेमुळे पिण्याच्या पाण्याची मागणी वाढत असल्याचे प्रशासनाने नमूद केले आहे.

## रिक्षाला कारची धडक; गुन्हा दाखल

। रसायनी । प्रतिनिधी ।

पनवेल तालुक्यातील वावेघर गाव हद्दीत २२ एप्रिल रोजी मध्यरात्री अडीचच्या सुमारास रिक्षा आणि कार यांच्यात अपघात होऊन त्यानंतर मारहाणीची घटना घडली.

दापीवली येथून मुंबईकडे जात असलेल्या फिर्यादीच्या रिक्षाला मागून येणाऱ्या कारने धडक दिली. यानंतर दोन्ही चालकांमध्ये शाब्दिक बाचाबाची झाली. परंतु, हा वाद आणखी वाढत गेल्याने प्रकरण मारामारीपर्यंत पोहोचले. त्यानंतर आरोपीने रिक्षाचा पाठलाग करत सावळेगाव येथे पुन्हा अडवून फिर्यादी व त्यांच्या मुलीला मारहाण करून शिवीगाळ केली.

या घटनेत फिर्यादी जखमी झाले आहेत. याप्रकरणी रसायनी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, अधिक तपास पोहवा/पाटील करत आहेत.

## निवडक




### फणसाडमध्ये जागतिक वसुंधरा दिन

**कोर्लई :** मुरुड जंजिरा पर्यटनात प्रसिद्ध असलेल्या फणसाड वन्यजीव अभयारण्यात फणसाड वन्यजीव अभयारण्य आणि ग्रीन वर्क्स ट्रस्ट यांच्या संयुक्तविद्यमाने सुपेगाव येथील निसर्ग पर्यटन संकुलात जागतिक वसुंधरा दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी ग्रीन वर्क्स ट्रस्टचा दहावा वर्धापन दिनही साजरा करण्यात आला. सर्वसामान्य नागरिकांमध्ये निसर्ग संवर्धनाबाबत जागरूकता निर्माण करणे हे मुख्य उद्दिष्ट ठेवून ग्रीन वर्क्स ट्रस्टने गेल्या दहा वर्षांत केलेल्या विविध उपक्रमांचा आढावा सादर केला तर रुपाली नाईक यांनी प्लास्टिक प्रदूषण या विषयावर मार्गदर्शनपर सविस्तर माहिती देऊन उपस्थितांना पर्यावरण रक्षणासाठी जागरूक केले तसेच ग्रीन वर्क्स ट्रस्टच्या विविध उपक्रमांतून वापरल्या जाणाऱ्या किंवा त्यातून मिळणाऱ्या उपयुक्त वस्तूंची माहिती देण्यात आली. यामध्ये मधमाशी पालनातून मिळणारा मध, सापांना वाचवण्यासाठी वापरली जाणारी उपकरणे इत्यादींचा समावेश होता. यावेळी उपवनसंरक्षक शैलेंद्रकुमार जाधव,फणसाड वन्यजीव अभयारण्याचे वनपरिक्षेत्र अधिकारी नितीन ढगे, ग्रीन वर्क्स ट्रस्टचे संस्थापक व व्यवस्थापकीय विश्वस्त डॉ. निखिल भोपळे, कृपा पाटील, कोकबनच्या सरपंच तेजस्विनी वाजंत्री तसेच वनपाल, वनरक्षक, रा. जि.प. मराठी शाळा सातिर्डे-दरणे येथील शिक्षकवृंद आणि इतर मान्यवर उपस्थित होते.



### प्रवाशांच्या सुरक्षिततेचा प्रश्न कायम

**पनवेल :** पनवेल रेल्वे स्थानकात पनवेल ते नवीन पनवेल परिसर जोडण्यासाठी नवीन पादचारी पूल उभारण्यात आला असून, त्यामुळे जुन्या पुलावरील गर्दी कमी होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. मात्र, या नवीन पुलावर स्वयंचलित जिन्यांची (एस्कलेटर) सुविधा नसल्याने महिला, ज्येष्ठ नागरिक आणि दिव्यांग प्रवाशांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. तसेच, लिफ्टची अपुरी व्यवस्था असल्याने प्रवाशांची गैरसोय अधिक वाढली आहे. दरम्यान, काही प्रवासी वेळ वाचवण्यासाठी शॉर्टकट म्हणून रेल्वे रूळ ओलांडताना दिसत आहेत. ही कृती अत्यंत धोकादायक असून, अपघाताचा धोका वाढवत आहे. रेल्वे प्रशासनाकडून वारंवार सूचना देऊनही नियमांचे उल्लंघन सुरूच असल्याचे चित्र आहे. नवीन पूल उभारण्यात आला असला तरी प्रवाशांच्या सुरक्षिततेकडे अपेक्षित लक्ष दिले जात नसल्याची भावना व्यक्त होत आहे. प्रवाशांनी या पुलाचा सुरक्षित वापर करावा, यासाठी जनजागृतीसोबतच एस्कलेटर व अतिरिक्त सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी होत आहे. तसेच, रेल्वे रूळ ओलांडणाऱ्या प्रवाशांवर कडक कारवाई करण्याची गरजही व्यक्त केली जात आहे.



### जांभा उत्खननाबाबत महसूल ॲक्शन मोडवर

**तळा :** तळा तालुक्यात सुरू असलेल्या अवैधरित्या जांभा दगड उत्खननाबाबत तळा महसूल विभाग ॲक्शन मोडवर असून, तळा तहसीलदार स्वाती पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली कासेखोल येथील जांभा उत्खनन करण्यात येत असलेल्या ठिकाणी महसूल विभागाच्या कर्मचाऱ्यांकडून कारवाई करण्यात आली आहे.कासेखोल येथील शरणप्पा लक्ष्मण बडगिरे यांनी उपविभागीय कार्यालय माणगावमधून जांभा दगड उत्खनन करण्याची परवानगी घेतली होती. याबाबत मंडळ अधिकारी मांदाड, ग्राम महसूल अधिकारी मजगाव व ग्रामस्थ कासेखोल यांच्या समक्ष जागेवर जाऊन मोजमाप घेतले असता दिलेल्या परवानगी पेक्षा अतिरिक्त उत्खनन केल्याचे आढळून आले आहे. सदर अतिरिक्त उत्खनन करीता शरणाप्पा बडगिरे यांना कार्यालयाकडून दंडाची नोटीस बजावण्यात आली आहे.


## क्लासिफाईड
### जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- **बागायती वाडी विक्री १३ गुंठे** (घर, नारळ, सुपारी, विहीर) @२२ लाख पर गुंठा समुद्रापासून २०० मीटर मालक- सुहास माळी गाव- थळ गुंजाळ आळी, अलिबाग. रिसॉर्टसाठी योग्य जागा. मो. ८७७९८०५३५३
- **बिल्डींग मटेरियल शॉप मध्ये** अनुभवी सुपरवायजर हवा आहे. पेमेंट : २१०००-२५०००, संपर्क - ८००७८९३२३२
- **नागाव ४, सहाण ३ गुंठे** कमर्शियल बांधकाम केलेली भाडेतत्वावर देणे आहे. मो. ९३२४०६६१११
- **नागाव येथे राहून कामासाठी कपलची आवश्यकता** कामाचे स्वरूप : जेवण बनवणे, घरकाम करणे, तसेच गार्डन व स्विमिंग पूलची देखभाल करणे. सुविधा : राहण्यासाठी स्वतंत्र केअरटेकर रूम उपलब्ध. पगार : रू. २५,०००/- प्रति महिना संपर्क : ७५५९१८४६१२
- **३५ गुंठे शेतजमीन विकणे आहे.** मौजे कावीर- गरूडपाडा, बोअरवेल आणि इलेक्ट्रिक मीटर आहे. आतील रस्त्याला लागून. संपर्क : ९८६७५३०७२७
- **अलिबाग येथील होलसेल किराणा दुकानात** ऑफिस कामाकरीता योग्य कर्मचारी हवे आहेत. कॉम्प्युटरचे ज्ञान आवश्यक. शिक्षण : १०, १२ आवश्यक. ९४२२६९११४७
- **अलिबागमधील नाश्ता बनविण्यासाठी** बाई पाहिजे. ७०६६१३८३६८
- **इलेक्ट्रिशिअन कामासाठी पाहिजे.** ७३७८४८०१५१

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१


### लोणेरे तरुणी निर्घृण हत्या प्रकरण
## सकल मुस्लिम युवक संघटना आक्रमक

। महाड । प्रतिनिधी ।

लोणेरे येथे एका निष्पाप तरुणीवर झालेला अत्याचार व तिची निर्घृण हत्या ही अत्यंत भीषण, संतापजनक व मानवतेला काळीमा फासणारी घटना आहे. या अमानुष कृत्यामुळे संपूर्ण समाजात भीती व असुरक्षिततेचे वातावरण निर्माण झाले असून, महिलांच्या सुरक्षिततेबाबत गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या घटनेचा सकल मुस्लिम युवक संघटनेकडून निषेध केला असून, आरोपीला तात्काळ अटक व्हावी यासाठी संघटनेने आक्रमक पवित्रा घेतला आहे.

याप्रकरणी सकल मुस्लिम युवक संघटनेचे महाड तालुका अध्यक्ष फैज हुर्जुक यांनी पोलीस निरीक्षक गोरेगाव यांना दिलेल्या निवेदनात असे म्हटले आहे की, लोणेरे येथे एका निष्पाप तरुणीवर झालेला अत्याचार व तिची निर्घृण हत्या ही अत्यंत भीषण, संतापजनक व मानवतेला काळीमा फासणारी घटना आहे. या अमानुष कृत्यामुळे संपूर्ण समाजात भीती व असुरक्षिततेचे वातावरण निर्माण झाले असून महिलांच्या सुरक्षिततेबाबत गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

या घटनेतील आरोपींची गुन्हेगारी पार्श्वभूमी व त्यांच्या कृत्याची क्रूरता लक्षात घेता, सर्व संबंधित आरोपींना तात्काळ अटक करून त्यांच्यावर कडक कायदेशीर कारवाई करण्यात यावी, तसेच या प्रकरणात हलगर्जीपणा अथवा विलंब सहन केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी असे म्हटले आहे.

# घरफोडीच्या गुन्ह्यातील महिलेसह तिघे गजाआड

## पोयनाड पोलिसांची धडाकेबाज कारवाई; २३.७३ लाखांचा ऐवज जप्त

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

अलिबाग तालुक्यातील भाकरवड व नवीन देहेन परिसरात घडलेल्या घरफोडी व चोरीच्या दोन गंभीर गुन्ह्यांचा पोयनाड पोलिसांनी यशस्वी छडा लावत महिलेसह तिघा आरोपींना अटक केली आहे. या कारवाईत तब्बल २३ लाख ७३ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, पोलिसांच्या कामगिरीचे कौतुक होत आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, भाकरवड येथील नरेंद्र पाटील यांच्या चाळीत बिहारमधील कुंदनकुमार सिंग व इतर काहीजण भाड्याने राहत होते. शनिवार (दि. १८) रोजी सकाळी ८ ते सायंकाळी ६



दरम्यान अज्ञात चोरट्याने खिडकीचा लॉक तोडून घरात प्रवेश केला. त्याने पाच मोबाईल व ३ हजार रुपयांची रोकड असा एकूण ६८ हजार रुपयांचा ऐवज चोरून नेला. याप्रकरणी पोयनाड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोयनाड पोलिसांनी तांत्रिक तपासासह आरोपीचा शोध घेत शास्त्रीनगर येथील अनिल राठोड (२४) याला ताब्यात घेण्यात आले. दरम्यान, नवीन देहेन येथे सोमवारी (दि. १३) मध्यरात्री ते पहाटे दरम्यान दुसरी घरफोडी घडली होती. या घटनेत १८ हजार २०० रुपयांचे सोन्याचे दागिने, ४ लाख रुपयांची रोकड आणि ८५ हजार रुपयांचे तीन मोबाईल असा एकूण २३ लाख ५ हजार रुपयांचा ऐवज चोरीला गेला होता. याप्रकरणी पोयनाड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. १३ ते १८ एप्रिलदरम्यान पोयनाड पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडलेल्या दोन्ही गुन्ह्यांचा छडा लावत तिघा आरोपींना अटक करण्यात आली आहे. त्यांच्या ताब्यातून एकूण २३ लाख ७३ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या संपूर्ण कारवाईत सहाय्यक पोलीस निरीक्षक सुजित गडदे, सहाय्यक फौजदार नवनाथ म्हात्रे, पोलीस हवालदार सुरेश वाघमारे, मंगेश लांगी आदींच्या पथकाने महत्त्वाची भूमिका बजावल्याची माहिती पोलिसांकडून देण्यात आली.

### भोंदू बाबा अशोक खरात प्रकरण
## अटकेच्या दिवशीच उरणमध्ये लाखोंचा जमीन व्यवहार

। उरण । प्रतिनिधी ।

राज्यभर गाजत असलेल्या भोंदूगिरी प्रकरणातील मुख्य आरोपी अशोक खरात तुरुंगात असतानाच, उरण तालुक्यातील चाणजे येथे त्याच्या कुटुंबियांच्या नावावर झालेल्या जमीन व्यवहाराने खळबळ उडवली आहे. अटकेच्या दिवशीच नोंद प्रक्रियेला सुरुवात झाल्याची माहिती समोर येताच महसूल व निबंधक यंत्रणेच्या कामकाजावर गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, १२ मार्च २०२६ रोजी सर्वे नंबर ३७१/३ (क्षेत्र ०.२०.०० आर) ही जमीन अस्मिता अविनाश म्हात्रे व कैलास मिश्रीमल शहा यांच्याकडून कल्पना अशोक खरात यांच्या नावावर नोंदणीकृत खरेदीखताद्वारे सुमारे ५८ लाख ५० हजार रुपयांना खरेदी करण्यात आली. धक्कादायक बाब म्हणजे, १७ मार्च रोजी तलाठी कार्यालयाकडून वर्दी नोटीस प्रसिद्ध झाली आणि याच दिवशी अशोक खरातला पोलिसांनी अटक केल्याची नोंद आहे.

अटक आणि जमीन नोंद प्रक्रिया एकाच दिवशी सुरू होणे हा निव्वळ योगायोग की आखलेला डाव, असा थेट सवाल नागरिक विचारत आहेत. यानंतरही व्यवहाराचा वेग कमी झाला नाही. अवघ्या महिन्याभरात, १३ एप्रिल २०२६ रोजी फेरफार क्रमांक ८३५१ मंजूर करण्यात आला. संबंधित महिला फरार असल्याच्या चर्चा सुरू असतानाही कागदोपत्री प्रक्रिया ‘एक्सप्रेस’ वेगाने पूर्ण झाल्याने संशय अधिकच गडद झाला आहे.

सामान्य नागरिकांना सातबाऱ्यावर नाव चढवण्यासाठी महिन्यांचे चकरा माराव्या लागतात, तर दुसरीकडे संशयित पार्श्वभूमी असलेल्या व्यवहारांना एवढी झपाट्याने मंजुरी कशी? हा कसला प्रशासनिक न्याय, असा संतप्त प्रश्न उरणकर उपस्थित करत आहेत.

## गोमांस वाहतूक करणारा अटकेत

। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।

श्रीवर्धन पोलीस ठाण्याच्या हद्दीत बुधवार, दि. २२ एप्रिल रोजी सकाळी नऊ वाजण्याच्या सुमारास जसवली फाटा येथे एका व्यक्तीस गोमांसाची वाहतूक करताना पकडण्यात आले.

आरोपी स्कुटीवरून मांस विक्रीच्या उद्देशाने वाहतूक करत असल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले. तद्नंतर पोलिसांनी त्याला ताब्यात घेऊन त्याच दिवशी दुपारी ३.४४ वाजता अटक केली. याप्रकरणी विविध कलमांखाली गुन्हा दाखल असून, अधिक तपास पोसई राठोड करत आहेत.



## पावसाळ्यापूर्वी नालेसफाईला वेग

। पनवेल । प्रतिनिधी ।

आगामी पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर शहरात नालेसफाईच्या कामांना पालिकेने जोरदार सुरुवात केली आहे. शहरातील विविध भागांमध्ये साफसफाईची कामे युद्धपातळीवर सुरू असून प्रशासनाकडून त्यावर बारकाईने लक्ष ठेवले जात आहे.

नाले तुंबू नयेत आणि पावसाळ्यात पाणी साचण्याची समस्या उद्भवू नये, यासाठी विशेष काळजी घेतली जात आहे. यासाठी पालिकेचे स्वच्छ दूत आणि निरीक्षक प्रत्यक्ष ठिकाणी उपस्थित राहून कामांची पाहणी करत आहेत. पावसाळ्यात नागरिकांना कोणताही त्रास होऊ नये, यासाठी पालिकेकडून करण्यात येत असलेली ही पूर्वतयारी महत्त्वाची मानली जात आहे.

## मोहोपाडा महावितरणाच्या इमारतीचे नूतनीकरण

। रसायनी । प्रतिनिधी ।

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मोहोपाडा शाखेच्या इमारतीच्या नूतनीकरणाच्या अनुषंगाने महावितरणच्या कार्यालयाचे उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी अधीक्षक अभियंता बिक्कड यांच्या मार्गदर्शनाखाली विवेकानंद शिंदे, कार्यकारी अभियंता पनवेल ग्रामीण विभाग, संजय ठाकूर अतिरिक्त कार्यकारी अभियंता पनवेल ग्रामीण विभाग, श्री. राख उपकार्यकारी अभियंता पनवेल ग्रामीण उप विभाग क्रमांक २ तसेच मोहोपाडा शाखेचे सहाय्यक अभियंता लक्ष्मीकांत गलांडे पाटील, किरण चौधरी, विनय महाडिक, रेहमान अत्तार, कांबळे संतोष आणि कर्मचारी उपस्थित होते. अद्ययावत इमारतीचे नूतनीकरण करून मोहोपाडा शाखेच्यापरिसरात अखंडित वीजपुरवठा करण्याची ग्वाही देण्यात आली.

# बेकायदा टपऱ्यांचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर

। नवीन पनवेल । प्रतिनिधी ।

नवीन पनवेल रेल्वे स्थानक परिसरातील सेक्टर १७ मधील मंगलमूर्ती रोज बाजार भूखंडावर बेकायदेशीर टपऱ्यांचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. महापालिकेच्या अतिक्रमण विभागाकडून शहरभर कारवाई सुरू असताना या भागात मात्र भेदभाव होत असल्याचे आरोप स्थानिक नागरिकांनी केले आहेत.

स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, संबंधित टपरीधारकांकडे महापालिकेचा कोणताही वैध व्यवसाय परवाना नसतानाही येथे मोठ्या प्रमाणात खाद्यपदार्थांची विक्री सुरू आहे. सायंकाळच्या वेळेत या टपऱ्यांचा विस्तार होत फूटपाथवरही स्टॉल्स लावले जातात. काही प्रकरणांमध्ये हे स्टॉल्स भाड्याने दिले जात असल्याचा आरोपही करण्यात येत आहे. फूटपाथवर अतिक्रमण झाल्यामुळे पादचाऱ्यांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. याशिवाय, रात्रीच्या वेळी येथील सांडपाणी व कचरा आजूबाजूच्या गटारांमध्ये टाकला जात असल्याने परिसरात अस्वच्छता वाढत आहे.

नागरिकांचे म्हणणे आहे की, या टपरीधारकांवर राजकीय वरदहस्त असल्यामुळे त्यांच्यावर कारवाई होत नाही. अतिक्रमण विभागाची गाडी परिसरात आल्यावर काही वेळासाठी फूटपाथ मोकळा केला जातो, मात्र पथक निघून गेल्यानंतर पुन्हा त्याच ठिकाणी अतिक्रमण केले जाते. याशिवाय, या मार्केटमधून महापालिकेतील काही अधिकाऱ्यांना हप्ते दिले जात असल्याच्या चर्चाही स्थानिकांमध्ये सुरू आहेत. अनेक वेळा तक्रारी करूनही महापालिका प्रशासनाकडून ठोस कारवाई होत नसल्याचा आरोप नागरिकांनी केला असून, प्रशासन ‘धृतराष्ट्राची भूमिका’ घेत असल्याची तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केली जात आहे.

### जिल्हा कारागृहात गांधी शांती परीक्षा | महिला, पुरुषांनी घेतला सहभाग

# हिंसामुक्त समाज घडविण्यासाठी बंद्यांची परीक्षा

। अलिबाग । प्रतिनिधी ।

अलिबाग जिल्हा कारागृहात दाखल बंद्यांमध्ये नैतिक मूल्यांचा विकास आणि हिंसामुक्त समाज घडविण्यासाठी मुंबई सर्वोदय मंडळ, मुंबई या सामाजिक संस्थेच्या वतीने कारागृहातील बंद्यांकरिता आयोजित करण्यात आलेल्या गांधी शांती परीक्षेत जिल्हा कारागृहातील २३ महिला व पुरुष बंद्यांनी सहभाग घेतला असल्याची माहिती जिल्हा कारागृह अधीक्षक विशाल बाळासाहेब बांदल यांनी दिली आहे.

संस्थेचे स्वयंसेवक प्रेमशंकर तिवारी यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की, शांततापूर्ण जगाची निर्मिती करण्यासाठी तसेच भावी पिढीसाठी बंद्यांमध्ये प्रेम, बंधुत्व, मैत्रीभाव, सहिष्णुता, सेवाभाव, सत्य, अहिंसा आणि शांततेचे बिज



रुजवुन शांतिमय जिवन जगण्याकरीता बंद्यांना प्रवृत्त करण्यासाठी गांधी शांती परिक्षेचे आयोजन करीत असल्याचे सांगितले. तसेच महात्मा गांधीजींची आत्मकथा वाचून बंद्यांचे हृदय परिवर्तन व्हावे, त्यांना भावी जीवन जगण्याची प्रेरणा मिळावी व बंद्यांनी सत्य व अहिंसेच्या मार्गावर जावून त्यांचे विचार परिवर्तन होण्यास मदत करण्याच्या उद्देशाने या संस्थेमार्फत कारागृह ग्रंथालयात बंद्यांना वाचण्याकरीता गांधी विचारांची पुस्तके देण्यात आली आहेत.

तसेच गांधी शांती परिक्षेत अलिबाग जिल्हा कारागृहातील २३ महिला व पुरुष बंद्यांनी सहभाग घेतला होता. या स्पर्धेत सहभागी झालेल्या सर्व बंद्यांना मुंबई सर्वोदय मंडळ यांच्यावतीने खादीचे टॉवेल, हातरुमाल व प्रमाणपत्र वितरित करण्यात आले.

हा उपक्रम अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे डॉ.सुहास वारके व विशेष कारागृह महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे योगेश देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आला.

या कार्यक्रमासाठी प्रेमशंकर तिवारी व सुनिता पटेल (स्वयंसेवक) मुंबई सर्वोदय मंडळ, मुंबई तसेच देवलु रांजड (सुभेदार), रामेश्वरी ढाळगे, भारती शेवाळे (महिला शिपाई), सतीश जुंबळे, महाविर जगताप, गजानन खवळे (का. शिपाई) इत्यादी कारागृह अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

## जाहीर नोटीस

दि. २३/०४/२०२६

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील नमुद केलेली मिळकत कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीच्या विक्री संबंधीत बोलणी विद्यमान मालक १) मथुरा जोमा तांडेल, २) रविंद्र जोमा तांडेल, ३) अरुण जोमा तांडेल, ४) अपर्णा जोमा तांडेल यांचेसोबत झालेली आहे. सदरची मिळकत ही निर्वेध व बोजा विरहित असल्याचा भरवंसा आमचे अशिलांस विद्यमान मालक यांनी दिला असून सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करणेकामी जाहिर नोटीस प्रसिद्ध करण्याचे काम आमचेकडे दिलेले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे,

**-: मिळकतीचे वर्णन :-**

| मौजे | भुमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रू. पैसे) |
|---|---|---|---|
| पाटणी पांडापुर ता. पेण | ११०/२ | एकुण ०-८१-३० | १२.३२ |

वर वर्णन केलेल्या मिळकतीपैकी १) मथुरा जोमा तांडेल, २) रविंद्र जोमा तांडेल, ३) अरुण जोमा तांडेल, ४) अपर्णा सुनिल तांडेल यांच्या हिश्यातील क्षेत्र ०-३४-०० हे.आर., आकार ५.१५ रू. पै इतक्या क्षेत्राच्या मिळकती या जाहिर नोटीसीचा विषय आहेत.

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लिज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाण्यायेण्याचे मार्ग, वारसा हक्क आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्यांची वरील मिळकतीच्या विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या मुळ सही शिक्याची कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून होणाऱ्या २१ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार याजकडे कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदरचे मिळकतीचा विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी हे कळावे.

**ॲड. आशिष नरेंद्र म्हात्रे**
मु. पेझारी पो. पोयनाड
ता. अलिबाग, जि. रायगड.
मोबा.नं. ९२७३२७३८४३/९६३७२७००१९

## जाहीर नोटीस

दि. २३/०४/२०२६

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील नमुद केलेली मिळकत कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीच्या विक्री संबंधीत बोलणी विद्यमान मालक १) सुर्यदर्शन त्रिभुवनदास, २) हालेंद्रादित्य त्रिभुवनदास, ३) शिला भवानीदत्त हरकिसनदास ढोलकिया, ४) निशा जानकी रामन, ५) करिश्मा भवानीदत्त हरकिसनदास ढोलकिया, ६) हिना हर्षद हरकिसनदास ढोलकिया, ७) विरेन हर्षद हरकिसनदास ढोलकिया, ८) मोनिष हर्षद हरकिसनदास ढोलकिया, ९) निशा मुकेश बोसमाया, १०) किंजल धनवंत हरकिसनदास ढोलकिया, ११) हेमलता हेमंतकुमार श्रॉफ यांचेसोबत झालेली आहे. सदरची मिळकत ही निर्वेध व बोजा विरहित असल्याचा भरवंसा आमचे अशिलांस विद्यमान मालक यांनी दिला असून सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करणेकामी जाहिर नोटीस प्रसिद्ध करण्याचे काम आमचेकडे दिलेले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे,

**-: मिळकतीचे वर्णन :-**

| मौजे | भुमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रू. पैसे) |
|---|---|---|---|
| पाटणी पांडापुर ता. पेण | १०३/१/अ | एकुण ०-५१-८० | ८.०६ |

वर वर्णन केलेली मिळकत या जाहीर नोटीसीचा विषय आहेत.

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लिज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाण्यायेण्याचे मार्ग, वारसा हक्क आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्यांची वरील मिळकतीच्या विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या मुळ सही शिक्याची कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून होणाऱ्या २१ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार याजकडे कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदरचे मिळकतीचा विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी हे कळावे.

**ॲड. आशिष नरेंद्र म्हात्रे**
मु. पेझारी पो. पोयनाड
ता. अलिबाग, जि. रायगड.
मोबा.नं. ९२७३२७३८४३/९६३७२७००१९

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे म्हात्रोली ता. अलिबाग, जि. रायगड येथील गट नं. २३५/१८, एकूण क्षेत्र ०-४१-०० हे. आर., आकार १.२८ रू.पै. ही गवत मिळकत, या मिळकतीचे विद्यमान मालक प्रतिक्षाबेन नरोत्तम यांच्याकडुन आमच्या अशिलांनी सर्व हक्कांसह विकत घेण्याची ठरविलेली आहे. सदरहू मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
तारीख : २३/०४/२०२६

**(ॲड. संजय द. म्हात्रे)**
पत्ता-श्रुती सारंग को. ऑप. हौ. सो., ए विंग,
रूम नं.५, युनियन बँकेच्या समोर, ब्राम्हण आळी,
अलिबाग, ता. अलिबाग जि. रायगड.

## Anjuman Islam Janjira Urdu Primary School Panchkroshi, Tal-Murud-Janjira

Applications are invited for the following posts for the academic year 2026-27

On Purely Temporary Basis

**Walk in Interview**

Urdu Medium (Semi English)

| Sr. No. | Class | Post | Qualification Required | No. of Posts |
|---|---|---|---|---|
| 1 | All | Head Mistress | H.Sc./B.A. /B.Sc. D.Ed. | 01 |
| 2 | Jr. KG, Sr. KG & Ist to Vth | Assistant Teacher | H.Sc. D.Ed. | 07 |
| 3 | VIth to VIIth | Assistant Teacher | B.A./B.Sc. D.Ed. | 02 |

The candidate willing to apply may present directly with their resume along with applications on the date of interview.

Date of Interview: - 30th April 2026. Time: - 10.00 am

Address of School: - Anjuman Islam Janjira Urdu Primary School Panchkroshi, Tal-Murud Janjira.

Contact Number: Chairman: -9049125556

## जाहीर नोटीस

दि. २३/०४/२०२६

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील नमुद केलेली मिळकत कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीच्या विक्री संबंधीत बोलणी विद्यमान मालक १) मनिषा मनोहर झावरे, २) अनंता परशुराम थळे, ३) कृष्णा परशुराम थळे, ४) नरेश परशुराम थळे, ५) मंजुळा गोपाळ थळे, ६) शिवानी गोपाळ थळे, ७) सुश्मिता गोपाळ थळे, ८) सौरभ गोपाळ थळे यांचेसोबत झालेली आहे. सदरची मिळकत ही निर्वेध व बोजा विरहित असल्याचा भरवंसा आमचे अशिलांस विद्यमान मालक यांनी दिला असून सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करणेकामी जाहिर नोटीस प्रसिद्ध करण्याचे काम आमचेकडे दिलेले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे,

**-: मिळकतीचे वर्णन :-**

| मौजे | भुमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रू. पैसे) |
|---|---|---|---|
| जुई हब्बास ता. पेण | ४८/१ | ०-१८-२०<br>पो.ख ०-०३-३०<br>एकुण ०-२१-५० | २.०० |

वर वर्णन केलेली मिळकत ही या जाहिर नोटीसीचा विषय आहेत.

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लिज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाण्यायेण्याचे मार्ग, वारसा हक्क आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्यांची वरील मिळकतीच्या विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या मुळ सही शिक्याची कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून होणाऱ्या २१ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार याजकडे कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदरचे मिळकतीचा विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी हे कळावे.

**ॲड. आशिष नरेंद्र म्हात्रे**
मु. पेझारी पो. पोयनाड
ता. अलिबाग, जि. रायगड.
मोबा. नं. ९२७३२७३८४३/९६३७२७००१९

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस कळविण्यात येते की, आमचे अशिलाने खालील वर्णन केलेली मौजे- कोठींबे, ता. कर्जत, जिल्हा रायगड येथील मिळकत, मिळकत मालक यांचेकडून खुषखरेदीने घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| गट क्र. | क्षेत्र हे.आर.प्र. | आकार | मालकाचे नाव |
|---|---|---|---|
| १५/१/अ | ०१.२७.००<br>००.०८.००<br>०१.३५.०० | ०.९० | कवटी पांडुरंग कवटे<br>मनी राघो शिद<br>भागू दगडू शिद<br>आंबो दगडू शिद<br>देवकी मच्छिंद्र भगत<br>अशोक दगडू शिद<br>जानकी दगडू शिद |

वरील वर्णन केलेली मिळकत स्वकष्टार्जित असून निर्वेध व बोजारहीत असल्याबाबत मिळकत मालकीचे म्हणणे आहे. तरी सदर मिळकतीवर कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, लिज, मृत्युपत्र, विक्रीचा करार, साठेकरार, पोटगी चार्ज, ताबा, वहीवाट, इजमेंट, बोजा तारण, वारसा, ट्रस्ट, कुळहक्क अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्याने ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ दिवसांच्या आत खाली सही करणार यांच्याकडे कागदपत्रे पुराव्यासहीत लेखी कळवावे. तशी कोणाचाही कोणत्याही प्रकारची हरकत तक्रार मुदतीत आमच्याकडे न आल्यास मिळकतीवर कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अगर अथवा तो असल्यास तो आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिलेला आहे असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेली तक्रार आमच्या अशिलावर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी, कळावे,

ठिकाण - कर्जत
दिनांक -२४/४/२०२६

सही/-
**ॲड.अक्षय अंकुश तिखंडे**
शॉप नं.२, राजलक्ष्मी को. ऑ. हौ सोसायटी
कर्जत, रायगड मो. नं.-९९२३४६५३५३

## PUBLIC NOTICE

This is to inform the public that Mrs. Sejal Gopalbhai Shaha (“Owner”) has informed my Client that she is the sole and absolute owner of the property set out in the Schedule (“Scheduled Property”) and that she is in lawful and peaceful possession thereof, and that her title is clear, marketable, and free from all encumbrances. I am instructed by my Client to issue this Public Notice for the sole purpose of verifying the said Owner’s right, title and interest to the Scheduled Property.

All person (s) claiming or having any share, right, title, estate, interest, claim or demand whatsoever to or in respect to the Scheduled Property or any part thereof, whether by way of sale, ownership, transfer, assignment, tenancy, sub-tenancy, lease, sub-lease, license, gift, release, exchange, family arrangement, possession, mortgage, charge, encumbrance, lien, inheritance, succession, bequest, easement, order/decree/judgment of any court, attachment, writing or otherwise of any nature whatsoever are hereby required to make the same known writing to the undersigned at the within mentioned address, within ten (10) days from the date of publication hereof, with notarised documentary evidence on which they are basing and asserting their rights with respect to the Scheduled Property or any part thereof, failing which, such claim, demand, right, title, interest, dispute, demand or objection, if any, shall be deemed to have been waived and/or abandoned for all intents and purposes.

This Public Notice issued on this 23 day of April, 2026.

**Schedule above referred to**

All that piece and parcel of freehold land bearing Gat No. 141 admeasuring 01-96-00 H-R-sqm, assessed to Rs. 3.56 Ps and situated at village Mhatroli, Taluka Alibaug, District Raigad.

**Adv. S.Y.Bartake**
**Adv. S.S. Bartake**
Office at B/202, Kuberakshe CHS, Near Maruti Naka, Alibag, Taluka Alibag, District Raigad 402201.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची जमिन मिळकत तिचे मालक शेखर रामचंद्र बैलमारे यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तिचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे

**मौजे एकसळ तालुका कर्जत जिल्हा रायगड येथील जमिन मिळकत**

| सर्व्हे नंबर/हिस्सा नंबर | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|
| ९१/२ | एकुण क्षेत्र ०-२७-४० हे आर पॉ | २-५० |

या मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, बयानापावती, खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीज, कब्जा, लोन, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ (एकवीस) दिवसांत लेखी पुराव्यासह खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक २४/०४/२०२६

**खरेदीदारातर्फे वकील ॲड.वृषाली रघुनाथ मोरे**
मोबा. ८५३०१४६८५४
ऑफिस पत्ता- शॉप नं. २९, तळ मजला,
हिरापन्ना शॉपिंग प्लाझा बिल्डींग,
भारत गॅस समोर, अमराई रोड, कर्जत
ता. कर्जत, जि.रायगड ४१०२०१

**खरेदीदारातर्फे वकील ॲड.निलेश कान्हु मोरे**
मोबा. ९८२२६९११०९
ऑफिस पत्ता- शॉप नं.२९. तळ मजला,
हिरापन्ना शॉपिंग प्लाझा बिल्डींग,
भारत गॅस समोर अमराई रोड, कर्जत
ता.कर्जत, जि. रायगड ४१०२०१

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे म्हात्रोली ता. अलिबाग, जि. रायगड येथील गट नं. २३५/६/३, एकूण क्षेत्र ०-४१-०० हे.आर., आकार १.२९ रू.पै. ही गवत मिळकत, या मिळकतीचे विद्यमान मालक ओमप्रकाश मंगीलाल पुरनमलका यांच्याकडुन आमच्या अशिलांनी सर्व हक्कांसह विकत घेण्याची ठरविलेली आहे. सदरहू मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
तारीख : २३/०४/२०२६

**(ॲड. संजय द. म्हात्रे)**
पत्ता-श्रुती सारंग को. ऑप. हौ. सो., ए विंग,
रूम नं.५, युनियन बँकेच्या समोर, ब्राम्हण आळी,
अलिबाग, ता. अलिबाग जि. रायगड.

## जाहीर सुचना

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील वर्णनाची मिळकत तिचे मालक श्री. हुसेन सलीम कांचवाला यांच्याकडुन कायमचे खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**शेतजमिन मिळकतीचे वर्णन**
**मौजे नालंधे, ता कर्जत जि रायगड येथील मिळकत**

वरील शेतजमीन मिळकत सर्व्हे नं १४/१ एकुण ०.४३.०० गुंठे, सर्व्हे नं १४/२ एकुण १.०६.६० गुंठे, सर्व्हे नं १५/४/ब एकुण ०.४०.०० गुंठे, सर्व्हे नं १५/८ एकुण ०.१४.७० गुंठे, सर्व्हे नं १५/६ एकुण ०.१८.५० गुंठे जागा विकत घेणार आहेत. तरी शेतजमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाणखत, दान, भाडेपट्टा, लीज अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास आणि त्यांची आमचे अशीलाच्या खरेदीच्या व्यवहारात हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १४ दिवसाच्या आत लेखी पुराव्यासह खाली नमुद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मिळकतीशी कोणतीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसलेही प्रकारचा हक्क हित संबंध त्यांनी आमचे अशीलाच्या लाभात सोडुन दिलेला असुन त्यांनी आमचे अशीलाच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशील खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

येणेप्रमाणे जाहीर सुचना आहे.

दिनांक : २४/०४/२०२६

**ॲड. देविदास यशवंत देवघरे**
पत्ता. मु.पो कडाव ता कर्जत रायगड
भ्रमणध्वनी ९०२८५९२७९८

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे-सातिर्जे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील गट नं. २७६/१, एकूण क्षेत्र ०-६६-०० हे. आर., आकार १.६९ रू. पै. या मिळकतीपैकी मालकीचे क्षेत्र ०-२३-८८ हे. आर. पैकी क्षेत्र ०-०७-८५ हे. आर. ही मिळकत निरंतर रस्त्याच्या वहिवाटीकरीता व दक्षिणेकडील क्षेत्र ०-१५-५० हे. आर. कायमस्वरूपी रस्त्याकरीता क्षेत्र या मिळकतीचे विद्यमान मालक साकीब रशिद मस्कती व मार्क जोसेफ सेल्वीन यांच्याकडुन आमच्या अशिलांनी सर्व हक्कांसह विकत घेण्याची ठरविलेली आहे. सदरहू मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
तारीख : २३/०४/२०२६

**(ॲड. संजय द. म्हात्रे)**
पत्ता - श्रुती सारंग को. ऑप. हौ. सो., ए विंग,
रूम नं. ५, युनियन बँकेच्या समोर, ब्राह्मण आळी,
अलिबाग, ता. अलिबाग जि. रायगड.

## Saraswati Education Society’s
## Rajesh Y Tasgoankar College Of Homoeopathy
## Raigad Homoeopathic Hospital

Dr N.Y.Tasgaonkar Educational Complex, Village-Vadvali, Tal-Karjat, Dist-Raigad (Maharashtra)

Email Id - principal.rytch@tasgaonkartech.com, hr.chandhai@tasgaonkartech.com

Web Site :- www.tasgaonkarhmc.com /Contact No:- 9029730040 / 8805838177 / 8421098854

**WE ARE HIRING**

Applications are invited for filling up the posts in the above-mentioned College and Hospital.

| Sr. no. | Subject | Vacant Post | | |
|---|---|---|---|---|
| 1 | | Principal/Director/Head of Institution | | |
| | | Professor | Associate Professor | Assistant Professor |
| 2 | Anatomy | 1 | 1 | 2 |
| 3 | Physiology and Biochemistry | 1 | 1 | 2 |
| 4 | Hom. Pharmacy | 0 | 1 | 1 |
| 5 | Hom. Materia Medica | 1 | 1 | 1 |
| 6 | Organon and Hom Philosophy | 1 | 1 | 2 |
| 7 | Hom. Repertory and Case Taking | 1 | 1 | 2 |

| Sr No | Position | Requirment | Sr No | Position | Requirment |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Resident Medical Officer | 2 | 11 | Office Superintendent | 1 |
| 2 | Medical Officer | 3 | 12 | Clerk | 4 |
| 3 | House Physician | 5 | 13 | Accountant | 1 |
| 4 | Pharmacist | 3 | 14 | Data Entry Operator | 1 |
| 5 | Nursing Staff In Charge | 1 | 15 | Lab Technician | 2 |
| 6 | Nursing Staff | 8 | 16 | X-Ray Technician | 1 |
| 7 | Operation Theatre Nurse | 1 | 17 | X-Ray Attendant | 1 |
| 8 | Store Keeper | 1 | 18 | Dresser | 1 |
| 9 | Operation Theatre Assistant | 1 | 19 | Ward boys/ Ayas | 7 |
| 10 | Laboratory Attendant | 3 | 20 | Multi-Tasking Staff | 6 |

Note:-

1. Last date of application is 29/4/2026
2. Date and Time will be informed to the applicant
3. Reserve category applicant should submit relevant category documents (CC/CV/NC)
4. Qualification and Experience and Requisite Examination (NTET) is as per the NCH MES 2024 Gazzete.
5. Pay Scale is as per NCH MES 2024.
6. Any non-apply Candidate remain present on date of interview will be consider depend on Vacancy
7. TA/DA will not be given by Institute.

Chairman
Saraswati Education Society

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

ज्याअर्थी मौजे-भिसेगांव, ता.कर्जत, जि.रायगड येथील पुढीलप्रमाणे वर्णनाची मिळकत भोगवटादार रकान्यामधील नमुद इसमाच्या खुद्द मालकीची मिळकत असून सदर मिळकत त्यांनी मे. राधेय मकान निर्मण एलएलपी च्या वतीने भागीदार विनीत जे केडिया यांना दिनांक २२/१०/२०२४ रोजीच्या नोंदणीकृत विकसन करारनामान्वये विकसनाकरीता दिलेली आहे. परंतु, काही अपरिहार्य कारणांमुळे मे.राधेय मकान निर्मण एलएलपी च्या वतीने भागीदार विनीत जे. केडिया यांच्याकडून पुढील वर्णनाच्या मिळकतीचे विकसन होवू शकले नाही. त्यामुळे, मे. राधेय मकान निर्मण एलएलपी च्या वतीने भागीदार विनीत जे. केडिया यांनी पुढील वर्णनाची मिळकत लक्ष्मी नारायण एंटरप्राइजेस तर्फे प्रोप्रायटर श्री. विनायक मारूती रणपिसे यांना विकसनाकरीता देण्याचे ठरविले आहे. त्यामुळे, त्यासंदर्भात आम्ही सदर मिळकतीच्या मालकी हक्कांची पडताळणी करीत आहोत.

**-: जमीन मिळकतीचे वर्णन :-**
**मौजे भिसेगाव, ता. कर्जत, जि. रायगड येथील मिळकत.**

| भोगवटाधारकाचे नाव | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्रफळ हे.आर.चौ.मी | आकार रू.पै. |
|---|---|---|---|
| श्री.प्रकाश प्यारेलाल परमार व इतर २ | ४८/१/अ/१ | ०-१८-१० | ०-८० |

वरील प्रमाणे मिळकत त्यामधील तदंगभुत सर्वहक्कहितसंबंध यासुद्धा.

त्याअर्थी विद्यमान मालकांव्यतिरिक्त सदर मिळकतीसंदर्भात अगर तिचे कोणत्याही भागावर कुणाही तिऱ्हाईतांचे गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, करारनामा, लिज, चार्ज, ॲटॅचमेंट, अन्न-वस्त्र निवारा, कुळ हक्क, ताबा-कबजा, एम.ओ.यु., हुकूमनामा, मनाई आदेश, जप्ती, वहिवाट, हिस्सा, संपादन, रिक्विझेशन अगर त्याप्रकारचे कोणतेही हक्क-हितसंबंध निगडीत असल्यास अगर सदर मालकी हक्कांस कुणाचीही हरकत असल्यास अशा हितसंबंधीत व्यक्ती, संस्था इत्यादींनी त्यांच्या लेखी हरकती जरूर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १४ (चौदा) दिवसांचे आत आमच्या खालीलप्रमाणेच्या पत्त्यावरील कार्यालयात सादर कराव्यात.

विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकतीवरील विद्यमान मालक श्री. प्रकाश प्यारेलाल परमार व इतर २ यांचे मालकी हक्क निर्वेध व बोजारहित आहेत असे समजुन ना हरकत दाखला देण्यात येईल. मुदतीनंतर आलेल्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत, हे सर्व जाहीर व्हावे.

कर्जत
दिनांक: २४/०४/२०२६

सही/-
**ॲडव्होकेट. मिनाक्षी जगन्नाथ भासे**
पत्ता- शॉप नं. १६, श्री नेमीनाथ हाईटस्,
मुद्रे (बुद्रुक), ता.कर्जत, जि.रायगड ४१० २०१.
मो.नं. ७४१०१४८१२१/७७९८१५११८८
minakshibhase@gmail.com

प्रो.फी जमा :     अर्जदाराचे वकील श्रीमती रश्मी कुलसंगे

## जाहिर नोटीस

**अलिबाग येथील मा. दिवाणी न्यायाधीश, वरीष्ठ स्तर साो.यांचे न्यायालयात.**

दिवाणी चौकशी अर्ज क्र. :३१/२०२६
(वारस दाखला मिळणेकरीता)

श्रीमती विणा विजय बुरांडे .... अर्जदार.
विरूद्ध
कोणीही नाही ... सामनेवाले.

या जाहिर नोटीसने तमाम लोकांस कळविण्यात येते की,

सदरहू अर्जदार यांनी कै. विजय काशिनाथ बुरांडे यांच्या मृत्यू पश्चात अर्जात नमूद केलेल्या बँक ऑफ बडोदा या बॅकेत असणारी रक्कम अर्जदार यांना मिळणेकरीता अर्जदार हेच कै. विजय काशिनाथ बुरांडे यांचे वारस आहेत. या संदर्भात वारस दाखल्याची आवश्यकता आहे. त्यामुळे अर्जदार यांनी प्रस्तुतचा अर्ज 'वारस दाखला' मिळण्याकरीता दाखल केलेला आहे.

अर्जदार यांच्या हक्काबद्दल कोणालाही व्यक्तीगत हरकत करावयाची असल्यास त्यांनी ही जाहिर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून वर नमूद मा. न्यायालयात एक महिन्याच्या आंत हजर राहून आपल्या हरकती घ्यावयाच्या आहेत.

याद्वारे असे जाहिर करण्यात येते की, वर नमूद कालावधी संपण्याच्या अगोदर योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मा. न्यायालय वरील अर्जदार यांचे हक्कांबद्दल पुरावा देण्याची ताबडतोब कारवाई करील व वारस दाखला मिळण्यास अर्जदार हक्कदार आहेत असे शाबित झाल्यास त्यांना 'वारस दाखला' मंजुर करील.

सदरची नोटीस आज दिनांक २१ माहे ०४ सन २०२६ रोजी आमच्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-**
**कनिष्ठ लिपिक,**
**दिवाणी न्यायालय, क-स्तर,**
**जि. रायगड**

**सही/-**
**सहाय्यक अधीक्षक,**
**दिवाणी न्यायालय, क-स्तर अलिबाग**
**अलिबाग, जि. रायगड.**

## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची मिळकत, मिळकतीचे विद्यमान मालक श्री. कृष्णा पांडुरंग झावरे, मु. भिलजी, पो. रामराज, ता.अलिबाग, जि. रायगड यांच्याकडून कायमस्वरुपी विकत घेण्याचे ठरवले आहे. तसा जमिन मालकांबरोबर साठेकरार सुद्धा केलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नंबर | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| भिलजी ता.अलिबाग जि.रायगड | ७३ | एकूण ०-२७-८० | ६.०० |

सदर मिळकतीवर कुणाचाही गहाण, दान, लिज, विक्रीचा करार, पोटगी, चार्ज, बक्षिस, वहिवाट, इजमेंट, बोजा, तारण, वारसा, ट्रस्ट, कुळ हक्क अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत खाली सही करणार यांच्याकडे कागदपत्रे पुराव्यासहीत लेखी कळवावे. तशी कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत, तक्रार, मुदतीत आमच्याकडे न आल्यास वरील मिळकतीवर कुणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अगर अथवा तो असल्यास तो आमचे अशिलांचे लाभांत सोडून दिलेला आहे व सदर मिळकत ही निर्वेध, बोजारहीत आहेत असे गृहीत धरुन सदरहू मिळकतीसंबंधी आमचे अशिल खरेदी विक्रीचा व्यवहार करतील. मुदतीचे बाहेर आलेल्या कुणाच्याही कोणत्याही प्रकारच्या हरकती/तक्रारी विचारात घेतल्या जाणार नाहीत. याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
दिनांक :- २३-०४-२०२६

सही/-
**ॲड. नंदकुमार पां. तांबडकर**
जिल्हा न्यायालय, अलिबाग
मु.पो. सुडकोली, ता. अलिबाग, जि.रायगड
मो.नं.९०११७७९०८१

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

## ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने– तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने– मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड– कुंदन– पोलकी– सेट– मॅचिंग बांगड्या– कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

# शेतकरी आधारभूत किंमतीपासून वंचित

## रायगडमध्ये भात खरेदीत मोठी घट



**। रायगड । प्रतिनिधी ।**

कोकणातील भात उत्पादनासाठी प्रसिद्ध असलेल्या रायगड जिल्ह्यात यंदाच्या हंगामात भात खरेदीत मोठी घट नोंदवली गेली आहे. पावसाचा लांबलेला कालावधी, सततचा ओलावा आणि कापणीच्या काळात झालेल्या अतिवृष्टीमुळे भात पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. यामुळे अनेक शेतकऱ्यांचा भात सरकारी निकषांनुसार पात्र ठरला नाही आणि हजारो शेतकरी किमान आधारभूत किंमत योजनेपासून वंचित राहिले.

यंदा जिल्ह्यात केवळ ६.०१ लाख क्विंटल भाताची खरेदी झाली असून, मागील वर्षाच्या तुलनेत ही संख्या लक्षणीयरीत्या कमी आहे. जिल्ह्यातील ३९,५७२ शेतकऱ्यांनी नोंदणी केली होती, मात्र त्यापैकी फक्त २७,७४६ शेतकऱ्यांकडूनच प्रत्यक्ष खरेदी करण्यात आली. म्हणजेच सुमारे १२ हजारांहून अधिक शेतकरी खरेदी प्रक्रियेपासून वंचित राहिले आहेत. कापणीच्या काळात पडलेल्या पावसामुळे भाताच्या दाण्यात ओलावा वाढला. शासनाच्या खरेदी निकषांनुसार ठरावीक मर्यादेपेक्षा जास्त ओलावा असलेला भात स्वीकारला जात नाही. त्यामुळे अनेक शेतकऱ्यांचा भात खरेदी केंद्रांवर नाकारण्यात आला. काही ठिकाणी शेतकऱ्यांना भात वाळवण्यासाठी योग्य सुविधा नसल्याने परिस्थिती अधिकच बिकट झाली.

जिल्ह्यातील २७ खरेदी केंद्रांवर भात खरेदी सुरू होती. मात्र या केंद्रांवर अनेक अडचणी समोर आल्या. किचकट आणि वेळखाऊ नोंदणी प्रक्रिया, वजन मोजणीतील विलंब, साठवण गोदामांची कमतरता आणि वाहतुकीसाठी साधनांची अपुरी उपलब्धताया कारणांमुळे खरेदीचा वेग मंदावला. अनेक शेतकऱ्यांना दिवसेंदिवस प्रतीक्षा करावी लागली. काही ठिकाणी भाताचे पोते उघड्यावर ठेवावी लागल्याने त्यात अधिक ओलावा निर्माण झाला आणि नुकसान वाढले.

सरकारी खरेदी प्रक्रियेत होणारा विलंब आणि नकार यामुळे अनेक शेतकऱ्यांनी खासगी व्यापाऱ्यांकडे वळण्याचा मार्ग स्वीकारला. मात्र खासगी बाजारात एमएसपीपेक्षा कमी दर मिळाल्याने शेतकऱ्यांना आर्थिक तोटा सहन करावा लागला. खर्च वाढला, उत्पादन घटले आणि दरही कमी मिळाले, अशी संतप्त प्रतिक्रिया शेतकऱ्यांकडून व्यक्त होत आहे.

रसायनी, तळोजा, रोहा आणि खोपोली परिसरात झपाट्याने वाढणाऱ्या औद्योगिक प्रकल्पांमुळे शेतीयोग्य जमिनीचे क्षेत्र कमी होत असल्याचेही चित्र आहे. पारंपरिक भात शेती करणाऱ्या भागांवर औद्योगिकीकरणाचा दबाव वाढत असून, यामुळे शेतीकडे दुर्लक्ष होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. नैसर्गिक संकटांसोबतच या बदलत्या परिस्थितीचा दुहेरी फटका शेतकऱ्यांना बसत आहे.

पार्श्वभूमीवर शेतकरी संघटनांनी काही ठोस मागण्या पुढे केल्या आहेत . भात खरेदी प्रक्रिया सुलभ व पारदर्शक करावी, अतिरिक्त खरेदी केंद्रे सुरू करावीत, ओलावा निकषांमध्ये सवलत द्यावी, साठवण व वाळवण सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, वाहतुकीसाठी अनुदान द्यावे, एमएसपीवर बोनस जाहीर करावा अशा शेतकऱ्यांच्या मागण्या आहेत.

# वाळवणाच्या मासळीवर बेमोसमी पावसाचे पाणी



**। उरण । प्रतिनिधी ।**

सोमवारी झालेल्या बेमोसमी पावसाचा सुक्या मासळीवर परिणाम झाला आहे. मासळी वाळविण्यासाठी ठेवली असता ती काही प्रमाणात वाया गेली आहे. त्यामुळे सुक्या मासळीच्या दरात आणखी वाढ होण्याची शक्यता आहे.

पावसाळ्यात खोल समुद्रातील तसेच खाडीतील मासळीचे प्रमाण कमी होत असल्याने मांसाहार करणारे या कालावधीत सुक्या मासळीवर ताव मारतात. पावसाळा अवघ्या महिन्यांवर येऊन ठेपला असून सुक्या मासळीला मोठया प्रमाणात मागणी वाढली आहे. यामध्ये आंबार, बोंबील जवळा, कोलंबीचे सोडे याला अधिक पसंती दिली जात आहे. मात्र गेल्या काही महिन्यांत मासळीची आवक घटल्याने सुक्या मासळीच्या दरात वाढ झाली आहे. याचा फटका खवय्यांना बसत आहे.

उरण तालुक्यातील करंजा, खोपटे, केळवणे, दिघाटी परिसरात अनेक ठिकाणी मासळी सुकवताना दिसून येते. यामध्ये बोंबील, वाकट्यांसह गावाजवळील रस्त्यावर देखील लांबलचक पट्ट्यात जवळा सुकवताना दिसून येतो. तर, सध्या रस्त्याच्या कडेला छोट्या टोपल्या मांडून सुकी मासळी विकण्यात येत आहे. यामध्ये सुकी माखली, पापलेट, शिंगाली, बागडे, मांदेलीचा समावेश आहे. तर जवळा, वाकट्या, कोलंबी सोडे, आंबार याला सर्वाधिक पसंती असल्याचे केळवणे येथील मासळी विक्रेतीने सांगितले.

### सुक्या मासळीचे दर
(प्रती किलो)

| | | |
|---|---|---|
| कोलमाची वडी | – | ५० रुपये (१२ नग) |
| जवळा | – | २०० रुपये |
| आंबार | – | ४०० रुपये |
| दांडी सुकट | – | ४०० रुपये |
| बोंबील | – | ४०० ते ७०० रुपये |
| वाकट्या | – | २०० ते ५०० रुपये |
| माखली | – | १००० रुपये |
| पापलेट | – | ६०० रुपये |
| कोलंबी सोडे | – | १८०० रुपये |

# मच्छिमारांचा आधुनिकतेकडे कल

## लाकडी बोटीऐवजी फायबर बोटींना वाढली पसंती

**। उरण । प्रतिनिधी ।**

बदलत्या काळानुसार रायगड जिल्ह्यातील पारंपरिक मासेमारी व्यवसायाने आता आधुनिकतेची कास धरली आहे. उरण परिसरातील करंजा, मोरा आणि इतर प्रमुख बंदरांमध्ये सध्या लाकडी बोटींच्या तुलनेत फायबर बोटींची उभारणी मोठ्या प्रमाणावर होत असल्याचे चित्र दिसत आहे. खर्चिक देखभाल आणि लाकडाची टंचाई यांमुळे मच्छीमार आता फायबर तंत्रज्ञानाकडे वळत आहेत.

पूर्वी खोल समुद्रात मासेमारीसाठी लाकडी बोटींचाच मोठ्या प्रमाणावर वापर केला जात होता. या बोटींसाठी बाभूळ आणि महागडे सागवान लाकूड लागते. मात्र, वाढता खर्च आणि लाकडाची कमतरता यामुळे मच्छिमारांसमोर अडचणी निर्माण होत होत्या. अंदाजे ९० टन क्षमता असलेल्या एका लाकडी बोटीच्या बांधणीसाठी ७५ ते ८० लाख रुपये खर्च येतो. त्याचबरोबर आवश्यक लाकूड उपलब्ध करून बोट पूर्ण तयार होण्यासाठी किमान एक वर्षाचा कालावधी लागतो.

आर्थिक अडचणी आल्यास हा कालावधी आणखी वाढतो. उरण परिसरातील करंजा मोरा आणि इतर बंदरांमध्ये सध्या अनेक मच्छिमारांनी फायबर बोटींची निर्मिती सुरू केली असून, या बदलामुळे वेळ आणि पैशाची बचत होत आहे. परिणामी मासेमारी व्यवसायाला आधुनिकतेची नवी दिशा मिळत असल्याचे चित्र स्पष्ट होत आहे.

फायबर बोटी फायदेशीरफायबर बोटींची बांधणी कमी कालावधीत पूर्ण होते. या बोटी वजनाने हलक्या, अधिक टिकाऊ आणि देखभालीसाठी किफायतशीर ठरत आहेत. लाकडी बोटींच्या देखभालीसाठी दरवर्षी सुमारे ५० हजार ते एक लाख रुपयांपर्यंत खर्च करावा लागतो, तर फायबर बोटींच्या बाबतीत हा खर्च तुलनेने कमी आहे.

पर्यावरण संवर्धनाचा हेतू याशिवाय लाकडी बोटींसाठी होणाऱ्या वृक्षतोडीमुळे पर्यावरणावरही परिणाम होत असल्याची जाणीव आता मच्छीमारांना होत आहे. त्यामुळे पर्यावरणाचे नुकसान टाळणे आणि व्यवसाय अधिक फायदेशीर करणे या दुहेरी उद्देशाने मच्छिमार फायबर बोटींचा स्वीकार करत आहेत.

# शिक्षण सेवकांचा रोह्यात मूक कॅन्डलमार्च



**। कोलाड । प्रतिनिधी ।**

२०२४ च्या शिक्षक भरतीमध्ये लागलेल्या शिक्षक बांधवांमध्ये संपूर्ण महाराष्ट्रातील एकूण १२ शिक्षण सेवकांचा अकाली मृत्यू झाला आहे, त्यांच्या कुटुंबीयांवर ओढवलेले दुःखाचे डोंगर याबाबतचा खूप खेद वाटत आहे. यासाठी दिवंगत शिक्षण सेवक बांधवांस श्रद्धांजली वाहण्यासाठी रायगड जिल्ह्यातील सर्व शिक्षण सेवकांच्या वतीने मारुती चौक येथे २५ एप्रिल रोजी कॅन्डलमार्चचे आयोजन करण्यात आले आहे.

याबाबतचे निवेदन गट शिक्षणाधिकारी रोहा, रोहा तहसीलदार, पोलीस निरीक्षक रोहा आणि मुख्याधिकारी रोहा नगरपरिषद यांना देण्यात आली असल्याची माहिती शिक्षण सेवक शोभा खांडेकर यांनी दिली आहे.

आमचे सहकारी शिक्षणसेवक प्रशांत तांबे याचे नुकतेन अकाली निधन झाले आहे. त्यांच्या निधनामुळे संपूर्ण शिक्षण क्षेत्रात शोककळा पसरली आहे. त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी आणि त्यांच्या कुटुंबियांच्या दुःखात सहभागी होऊन स्मृतीस चिरशांती लाभो यासाठी रायगड जिल्ह्यातील २०० हून अधिक शिक्षणसेवक यांची उपस्थित राहणार असून रोहा शहरात एक शांततामय कॅन्डलमार्च मौन मोर्चा आयोजित करण्यात आले असून दिवंगत शिक्षण सेवकांना श्रद्धांजली वाहण्यात येणार आहे,

शनिवारी रोहा शहरातील मारुती चौक ते शिव छत्रपती शिवाजी महाराज स्मारक असे या कॅन्डलमार्च मौन मोर्चाचे स्वरूप असल्याचे आयोजकांकडून कळविण्यात आले असून यासाठी शोभा खांडेकर, कल्याणी भोसले, प्रशांत अहिरराव, शिवकुमार माने, निवृत्ती शिंदे, अतुल बोंद्रे, प्रभाकर तुपे, मयूर पाटील, शिवशंकर डांगे अथक परिश्रम घेत आहेत.

# भाजपला महिला आरक्षणाची घाई!




**। उरण । प्रतिनिधी।**

केंद्र सरकारने २०२३ मध्ये महिला आरक्षण विधेयक संसदेत मंजूर केलेले असतानाही त्याची अंमलबजावणी करण्यात आलेली नाही. त्याऐवजी २०२६ मध्ये पुन्हा महिला आरक्षणाच्या आडून परिसीमन विधेयक संसदेत आणण्याचा प्रयत्न करण्यात येत असून ही संविधान विरोधी कृती आहे. महिला आरक्षणाच्या नावाखाली भाजपला स्वतःची पोळी भाजण्याची घाई झाली आहे, असा आरोप रत्नागिरी उत्तर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या अध्यक्षा सोनललक्ष्मी घाग यांनी केला आहे.

वास्तविक पहिल्यांदा जातीनिहाय जनगणना करणे आवश्यक आहे; परंतु केंद्र सरकार तसे करत नाही. त्यामुळे भाजप सरकारची जनतेला दिशाभूल करण्याची ही खेळी आहे. हे केवळ महिला आरक्षण विधेयक नाही, तर देशाच्या लोकशाही ढाच्यात बदल करण्याचा प्रयत्न आहे. भारतीय संविधानावर आक्रमण करण्याचा प्रकार आहे. त्यामुळे जनतेची दिशाभूल करणाऱ्या विधेयकाला काँग्रेस पक्ष कधीही साथ देणार नाही, ते कायम हाणून पाडेल, असे रत्नागिरी उत्तर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या अध्यक्षा सोनललक्ष्मी घाग यांनी बुधवारी पत्रकार परिषदेत सांगितले.

काँग्रेसने नेहमीच महिलांना सत्तेत आणि पक्षातही प्राधान्य दिले आहे. सरोजिनी नायडू, इंदिरा गांधी, प्रतिभाताई पाटील, सोनिया गांधी अशा असंख्य महिलांना काँग्रेसने संधी दिलेली आहे. थोडक्यात काँग्रेसने नेहमीच महिलांना सत्तेत आणि पक्षातही प्राधान्य दिले आहे, असेही सोनललक्ष्मी घाग यांनी पत्रकारांच्या प्रश्नांना उत्तरे देताना सांगितले.

# ‘खत टंचाई भासणार नाही’

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

शेतकऱ्यांना आगामी हंगामात रासायनिक खतांचा पुरेसा पुरवठा सुनिश्चित करण्यासाठी कृषी विभागाने व्यापक नियोजन केले आहे. शासनाकडून उरण तालुक्यासाठी एकूण ४२५ मेट्रिक टन युरिया रासायनिक खताचे नियोजन करण्यात आले असून एप्रिल ते सप्टेंबर २०२६ या कालावधीत नियोजित साठ्यानुसार खत विक्रेत्यांना टप्प्याटप्प्याने पुरवठा केला जाणार आहे.

# संताच्या चरणी मानवी जीवन धन्य होते

## रामदास पाटील यांचे प्रतिपादन



**। पाताळगंगा। प्रतिनिधी।**

जीवनात ईश्वराची प्राप्ती आवश्यक आहे.यामुळे जीवनात धन्यता प्राप्त होत असते.संत तुकाराम महाराज धन्य हा शब्द आवडीचा आहे. तसेच संत ज्ञानेश्वर महाराज यांचा बरवा हा शब्द आवडीचा आहे. यामुळेच महाराज प्रत्येक अवयवाला धान्यता मानत असतात.आपल्या वाचे मधून रामाचे गुणगान यावे तो खऱ्या अर्थाने आपला धन्य दिवस असा मानावा लागेल. देह उत्तम असताना या परमेश्वराचे गुणगान गावे,कारण संतांच्या चरणावर मस्तक ठेवले तर जीवन धन्य होत असतो, असे प्रतिपादन रामदास पाटील यांनी केले.

दीपोत्सवाच्या माध्यमातून या ठिकाणी सामाजिक सांस्कृतिक, राजकीय, शैक्षणिक, वारकरी अशा विविध माध्यमातून या ठिकाणी उपस्थित होते.

या अखंडभक्तीरसामृतयज्ञोत्सव आयोजन हनुमंत विष्णू लभडे, मार्गदर्शन ज्ञानेश्वर पाटील यांच्या माध्यमातून करण्यात आले. हे पाचवे वर्ष असल्यामुळे या कार्यक्रमास यात्रे सारखे प्रचंड स्वरूप प्राप्त झाले होते. यावेळी पसायदान घेत, मुखात विठ्ठलाचा आणी टाळांच्या गजराने हा परिसर दुमदुमून गेला.यावेळी उपस्थित मान्यवरांचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आले.

## निवडक

### शिष्यवृत्तीसाठी १८२४ विद्यार्थी

**खरोशी :** प्राथमिक आणि उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा २६ एप्रिल२०२६ रोजी होत असून पेण तालुक्यात १८२४ विद्यार्थी परीक्षा देणार आहेत अशी माहिती पेण पंचायत समितीच्या गटशिक्षणाधिकारी शर्मिला शेंडे यांनी दिली. प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा इयत्ता चौथीसाठी ८ केद्रावर १हजार २१५ विद्यार्थी आणि इयत्ता ७ वी उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेसाठी ६ केंद्रावर ६०९ विद्यार्थी परीक्षा देणार आहेत. इयत्ता चौथीसाठी आशा किरण इंग्रजी माध्यमिक विद्यालय, पेण एज्युकेशन इंग्लिश माध्यमाची शाळा, के एस लिटिल इंजस पेण, जयकिसान विद्यामंदिर वडखळ, राजिप शाळा आमटेम, पेण शिक्षण महिला समितीची इंग्रजी माध्यमाची शाळा आणि बाळगंगा विद्या मंदिर चुनाभट्टी जिते या केंद्रावर परीक्षा होणार आहेत. तर ७ वी साठी शारदा विद्यामंदिर कासू, के इ एस लिटील एंजेस स्कूल पेण, न्यू इंग्लिश स्कूल जोहे, जय किसान विद्या मंदिर वडखळ, कन्या शाळा पेण आणि आश्रम शाळा वरवणे या परीक्षा केंद्रावर परीक्षा होणार आहेत.

### उन्हाच्या कडाक्यात पुन्हा माठाचा थाट

**अलिबाग :** एप्रिल-मे महिन्याच्या वाढत्या उष्णतेमुळे रायगडकर पारंपरिक उपायांकडे वळताना दिसत आहेत. थंडगार पाण्यासाठी मातीचे माठ, सुरई आणि आकर्षक डिझाइनच्या मातीच्या बाटल्यांची मागणी शहरात वाढली आहे. विविध भागांतील मातीच्या वस्तू विक्री केंद्रांवर ग्राहकांची गर्दी वाढत असून, विक्रेत्यांनाही यंदा चांगली कमाई होत आहे. साध्या माठापासून ते नक्षीकाम केलेल्या रंगीबेरंगी बाटल्यांपर्यंत अनेक पर्याय ग्राहकांसाठी उपलब्ध आहेत. साध्या माठांची किंमत सुमारे २५० रुपयांपासून सुरू होत असून, डिझाइन व आकारानुसार ती ८०० ते १,००० रुपयांपर्यंत जाते. किमती वाढल्या असल्या तरी मागणीत कोणतीही घट झाली नसल्याचे विक्रेत्यांचे म्हणणे आहे. विशेष म्हणजे मातीच्या बाटल्यांना तरुणांकडून मोठी पसंती मिळत आहे. अनेक जण या बाटल्यांवर स्वतः रंगकाम करून त्यांना वैयक्तिक स्पर्श देत आहेत. प्लास्टिकला पर्याय आणि पर्यावरणपूरक जीवनशैलीचा स्वीकार यामुळे मातीच्या वस्तूंचा वापर वाढत असल्याचे चित्र आहे. उन्हाळ्यात पक्ष्यांसाठी पाण्याची सोय करण्याकडेही नागरिकांचा कल वाढला आहे. गच्ची, बाल्कनी किंवा झाडांवर ठेवण्यासाठी लहान मातीची भांडी मोठ्या प्रमाणावर खरेदी केली जात आहेत. सोसायट्यांमध्ये आणि सार्वजनिक ठिकाणीही पक्ष्यांसाठी पाण्याची व्यवस्था केली जात आहे. फ्रीजमधील अति थंड पाण्यापेक्षा माठातील पाणी अधिक आरोग्यदायी असल्याने नागरिक त्याला प्राधान्य देत आहेत.नैसर्गिक थंडावा आणि मातीचा सौम्य स्वाद यामुळे माठ पुन्हा घराघरात स्थान मिळवत आहे.



### उष्माघातापासून जपण्याचे आवाहन

**पनवेल :** सध्या पनवेल तालुक्याचे तापमान ४० डिग्री सेल्सिअसच्या पुढे नोंदविले गेले आहे. त्यामुळे या पार्श्वभूमीवर उष्माघात टाळण्यासाठी शेतकऱ्यांनी सकाळी आणि संध्याकाळी शेतातील कामे करण्याची गरज आहे. तसेच, पुरेसे पाणी पिणे आणि आहारात फळभाज्यांचा समावेश करणे गरजेचे आहे, असे आवाहन पनवेलचे अप्पर तहसीलदार जितेंद्र इंगळे यांनी शेतकऱ्यांना केले आहे. तालुक्यात सध्या उन्हाचा तडाखा वाढत असून उष्माघात जीवावर बेतू शकतो. त्यामुळे शेतातील कामांच्या वेळा बदलण्याच गरज असून १२ ते ४ मध्ये शक्यतो बाहेर जाणे टाळावे. सध्या शेतात फळभाज्या, भाजीपाला,फळबागा अशी पिके उभी आहेत. तसेच, अनेक भागातील शेतांच्या मशागती, खत घालणे, बांधबंदिस्ती सुरू आहे. या पार्श्वभूमीवर तज्ज्ञांनी दुपारच्या वेळेत शेतात काम करू नये, असा सल्ला दिला आहे. उन्हाळ्यात टप्प्याटप्प्याने भरपूर पाणी प्यावे. एकदम किंवा फ्रीजमधील पाणी पिणे टाळावे. उष्ण, तेलकट, मसालेदार जेवण टाळावे. याउलट पाणी धरून ठेवणाऱ्या फळभाज्यांचा आहार वाढवावा. मांसाहार मर्यादित करावा. खरबूज, कलिंगड, नारळ याचे सेवन करावे. चक्कर येणे, मळमळणे, जीभ किंवा त्वचा कोरडी पडणे आदी लक्षणे आढळल्यास वैद्यकीय मदत घ्यावी, असे तालुका आरोग्य अधिकारी डॉ. अपर्णा पवार यांनी सांगितले.

### गव्हाण फाटा ते चिरनेर रोड सुरू

**उरण :** उरण मार्गावरील गव्हाण फाटा ते चिरनेर रोड या महत्त्वाच्या रस्ता वाहतुकीसाठी खुला करण्यात आला आहे. गेली अनेक वर्षे रखडलेल्या या कामामुळे नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता; मात्र आता रस्ता सुरू झाल्याने प्रवाशांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. या रस्त्याचे काम सुरू झाल्यापासून परिसरातील वाहतुकीवर मोठा परिणाम झाला होता. त्यामुळे प्रवासाचा वेळ वाढत होता. तसेच अनेकदा वाहतूक कोंडीही निर्माण होत होती. विशेषतः कामावर जाणाऱ्या नागरिकांना, विद्यार्थ्यांना आणि व्यापाऱ्यांना याचा मोठा त्रास सहन करावा लागत होता. अखेर प्रशासनाने या रस्त्याचे काम पूर्ण करून तो वाहतुकीसाठी खुला केला आहे. नव्याने तयार झालेल्या रस्त्यामुळे प्रवास अधिक सुलभ आणि जलद झाला आहे. त्यामुळे उरण मार्गावरील वाहतूक सुरळीत होण्यास मदत होणार आहे.

### वाढत्या उष्णतेचा भाजीपाल्याला फटका

**अलिबाग :** बाजारांमध्ये पालेभाज्यांच्या दरात वाढ झाली असून, बदलते वातावरण आणि वाढती उष्णता याचा थेट परिणाम बाजारावर झाला आहे. विशेषतः भाजीपाला मोठ्या प्रमाणात खराब होत असल्याने, आवक मोठी असली तरी चांगल्या प्रतीचा शेतमाल कमी उपलब्ध होत आहे. प्रामुख्याने कोथिंबीर, मेथी आणि शेपू यांसारख्या पालेभाज्यांसह लिंबू आणि टोमॅटोचे भावही कडाडले आहेत. त्यामुळे पुरवठा साखळीवर दबाव वाढला आहे. दरम्यान, उन्हाळ्यात लिंबू व पालेभाज्यांची मागणी वाढत असल्याने दरांवर आणखी ताण निर्माण होत आहे. पालेभाज्यांमध्येही हीच स्थिती दिसून येत आहे. कोथिंबीर, मेथी, पालक आणि शेपू या सर्वच प्रकारांमध्ये आवक असूनही दर्जेदार माल कमी पडत आहे. उष्णतेमुळे पालेभाज्यांची पाने लवकर सुकत असल्याने बाजारात पोहोचेपर्यंत मोठ्या प्रमाणात शेतमाल खराब होत आहे. त्यामुळे चांगल्या प्रतीच्या पालेभाज्यांना तुलनेने अधिक दर मिळत आहेत. व्यापाऱ्यांच्या मते, मार्चच्या अखेरीपासून तापमानात झालेल्या वाढीमुळे पिकांवर ताण आला आहे. तसेच, उष्ण हवामानामुळे काढणीनंतरचा भाजीपाला लवकर सुकणे किंवा खराब होणे यामुळे प्रत्यक्ष विक्रीयोग्य मालाचे प्रमाण कमी होत आहे. परिणामी, आवक आणि उपलब्धता यामध्ये फरक निर्माण होऊन दर वाढत आहेत. येत्या काही दिवसांत उष्णतेची तीव्रता कायम राहिल्यास दरात आणखी चढ-उतार होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

फेरीवाल्यांची नियमित तपासणीची मागणी | नागरिकांनी सावध राहण्याची गरज

# उरणमध्ये शीतपेयांच्या दर्जावर प्रश्नचिन्ह



**। उरण । प्रतिनिधी ।**

एप्रिलच्या वाढत्या उकाड्यामुळे उरण तालुक्यात शीतपेय विक्रेत्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. लिंबूपाणी, सरबत, ताक, लस्सी आणि फ्रूट सॅलडसारख्या पेयांकडे नागरिकांचा ओढा वाढत असला, तरी या पेयांच्या दर्जाबाबत गंभीर शंका व्यक्त होत आहेत.

रस्त्यावर विक्री होणाऱ्या बहुतांश शीतपेयांमध्ये स्वच्छतेचा अभाव असल्याचे चित्र दिसून येत आहे. ताक व लस्सी तयार करताना वापरले जाणारे दूध, दही व पाणी यांची गुणवत्ता तपासली जात नसल्याने आरोग्य धोक्यात येण्याची शक्यता आहे. तसेच अनेक ठिकाणी वापरला जाणारा बर्फ हा अनधिकृत कारखान्यांमधून आणला जात असल्याची बाबही समोर आली आहे.

काही विक्रेत्यांकडून सरबतामध्ये कृत्रिम रंग व स्वाद मिसळले जात असल्याचे आढळून आले आहे. तर फळांच्या नावाखाली विकले जाणारे फ्रूट सॅलड हे जुन्या फळांपासून बनवले जात असल्याचे आरोग्य विभागाच्या निरीक्षणात आले आहे. यामुळे अतिसार, पोटदुखी, टायफॉईडसारख्या आजारांचा धोका वाढत असल्याचा इशारा तज्ज्ञांनी दिला आहे. दरांच्या बाबतीत पाहता, हे पदार्थ नागरिकांना परवडणाऱ्या किमतीत उपलब्ध आहेत.

लिंबूपाणी १० ते २०, सरबत १५ ते ३०, ताक १० ते २५, लस्सी ३० ते ६०, तर फ्रूट सॅलड ३० ते ८० दरम्यान विकले जात आहे. दर कमी असले तरी दर्जावर प्रश्नचिन्ह असल्याने नागरिकांनी सावध राहण्याची गरज व्यक्त होत आहे.

आरोग्य तज्ज्ञांनी नागरिकांना घरगुती किंवा विश्वासार्ह ठिकाणचीच पेय पिण्याचा सल्ला दिला आहे. तसेच स्थानिक प्रशासनाने फेरीवाल्यांवर नियमित तपासणी करून स्वच्छतेचे नियम काटेकोरपणे लागू करावेत, अशी मागणीही होत आहे. उष्णतेपासून दिलासा देणारी ही पेयेच, निष्काळजीपणामुळे आजाराचे कारण ठरू नयेत, यासाठी प्रशासन आणि नागरिक दोघांनीही सजग राहणे आवश्यक आहे.

**आरोग्यासाठी घातक**

अनेक शीतपेयांमध्ये साखरेचे प्रमाण जास्त असते. याव्यतिरिक्त , एस्पार्टम सारखे कृत्रिम गोडवे वापरले जातात. शीतपेयांमध्ये बेंझोइक ॲसिड आणि सॉर्बिक ॲसिड यांसारखे रासायनिक संरक्षक वापरले जातात, जे आरोग्यासाठी हानिकारक ठरू शकतात.




## राशीभविष्य

- **मेष** : नव्या योजना मार्गी लागतील. कौटुंबिक स्वास्थ्य लाभेल. स्थावर प्रश्नात तडजोड करावी लागेल.
- **वृषभ** : घरगुती प्रश्नांचा गुंता वाढेल. व्यवसायात कामाचा ताण वाढेल. प्रकृतीच्या तक्रारींकडे लक्ष द्यावं.
- **मिथुन** : आर्थिक व्यवहारात लाभ होईल. दिलासादायक घटना घडतील. ज्येष्ठांचा सल्ला कामी येईल.
- **कर्क** : मनाजोग्या घटना घडतील. मुलांच्या कला-गुणांना वाव मिळेल. नव्या ओळखींचा लाभ घ्यावा.
- **सिंह** : नोकरीत नव्या जबाबदाऱ्या येतील. कामासाठी धावपळ, दगदग होईल. उष्णतेचे विकार संभवतात.
- **कन्या** : सरकारी कामं मार्गी लागतील. खर्चाचं प्रमाण वाढतं राहील. पर्यटन उद्योगात अनुकूलता राहील.
- **तूळ** : कर्ज प्रकरणात दिलासा मिळेल. अंगभूत कला-गुणांचा विकास होईल. लॉटरीतून लाभ संभवतो.
- **वृश्चिक** : विवाहाची बोलणी सफल होतील. कामासाठी प्रवास लाभदायक ठरेल. मानसिक स्वास्थ्य राहील.
- **धनु** : अनावश्यक खर्च टाळावा. गुंतवणूक तुर्तास करू नये. प्रक्रिया उद्योगात विशेष अनुकूलता लाभेल.
- **मकर** : अनपेक्षित घटनांनी दिलासा मिळेल. कलाकारांचा उत्साह वाढता राहील. बाकी चिंता नसावी.
- **कुंभ** : कौटुंबिक प्रश्नांचा ताण राहील. विवाहेच्छुकांचे विवाह ठरतील. मुलांच्या प्रगतीकडे लक्ष द्यावं.
- **मीन** : प्रियजनांच्या भेटी होतील. धार्मिक स्थळांची यात्रा घडेल. व्यवसायात बदलाचा विचार होईल.

## २४ एप्रिल
### दिनविशेष

**१९७३:** महान क्रिकेटपटू सचिन तेंडुलकर यांचा जन्म.
**२०११:** सत्य साईबाबा यांचे निधन.
**२०१६:** विजय मल्ल्या यांचा पासपोर्ट रद्द करण्यात आला.
**२०१७:** छत्तीसगडमधील सुकमा जिल्ह्यामध्ये नक्षलवादी हल्ल्यात २५ जवान हुतात्मा, सहा जण जखमी.
**२०१८:** गडचिरोलीतील बोरिया जंगलातील चकमकीत ठार झालेल्या नक्षलवाद्यांचा आकडा वाढला.

### आरोग्यमंत्र
## किती मीठ खावं?

मीठ हा स्वयंपाकातला अत्यावश्यक घटक आहे. मिठाशिवाय पदार्थाला चव प्राप्त होत नाही. मात्र मानवी शरीराला मिठाची नेमकी गरज किती आणि जास्त प्रमाणात मिठाच्या सेवनाचे दुष्परिणाम कोणते हा विषय नेहमीच अभ्यासाचा आणि चर्चेचा असतो. कारण जास्त प्रमाणातील मीठ हानिकारक ठरतं. मीठ नामक क्षार शरीराच्या सर्व भागात आढळतो. शरीरातील चयापचयासाठी आणि वितरणासाठी हा आवश्यक घटक आहे. तो जठरातील रस आणि पित्त बनवण्यास मदत करतो. या क्षारामुळे शरीरातील आम्ल संतुलित राहतं आणि मज्जारज्जू तसंच मासपेशींचं कार्य व्यवस्थित सुरु राहतं. शरीरातलं या क्षाराचं प्रमाण कमी झाल्यास अशक्तपणा येतो. त्वचा ढिली पडते, पोटऱ्यांमध्ये गोळे येतात, वजन कमी होतं, डोळे खोल जातात, मानसिक दुर्बलता जाणवतं आणि हृदयाच्या कार्यात फरक पडतो. याउलट मीठ अधिक खाल्ल्यामुळे पित्त वाढतं, रक्ताच्या गतीमध्ये वाढ होते, खूप तहान लागते, मूर्च्छा येते, हाडं कमकुवत होतात, चेहऱ्यावर सुरकुत्या पडतात, केस लवकर पांढरे होतात, मूत्रपिंडाचं कार्य वाढतं तसंच हात-पाय, चेहरा आणि पोटावर सूज येते. आयुर्वेदात नेहमीच्या मिठाप्रमाणेच नैसर्गिक (जमीन उकरून मिळालेल्या खाऱ्या पाण्यापासून मिळवलेलं मीठ), बीड (बिडलोण), रोमक (जयपूरजवळच्या सांभर तलावातील पाण्यापासून बनलेलं मीठ), पांसुज (fossil salt) आदी प्रकारचं मीठ वापरलं जातं.



### सफर देशांची
## लिथुआनियाविषयी...

उत्तर युरोपातला हा लहान देश बाल्टिक समुद्राच्या पूर्व किनाऱ्यावर वसला आहे. देशातले ८२ टक्के लोक 'लिथुआनियन' ही भाषा बोलतात. 'व्हिल्नियस' या देशाची राजधानी. १७९५ मध्ये लिथुआनिया रशियन साम्राज्याचा भाग झाला. १६ फेब्रुवारी १९१८ या दिवशी हा देश स्वतंत्र झाला. पण लिथुआनियावर आक्रमणं सुरूच राहिली. १६ जून १९४० या दिवशी 'सोव्हिएत युनियन'ने या देशाचा ताबा घेतला. १९४१ ते १९४४ या काळात लिथुआनियावर नाझी जर्मनीचं राज्य होतं. १९४४ पासून १९९० पर्यंत हा देश पुन्हा 'सोव्हिएत युनियन'च्या ताब्यात होता. ११ मार्च १९९० या दिवशी लिथुआनियाला स्वातंत्र्य मिळालं. हा देश नाटो आणि युरोपियन युनियनचा सदस्य आहे. या देशाला ९९ किलोमीटरचा समुद्रकिनारा लाभला आहे. 'नेमुनास' ही या देशातली सर्वात मोठी नदी. देशात ३३ टक्के वनसंपदा आहे. या देशात बरेच तलावही आहेत. भरपूर जंगल असल्यामुळे इथे लाकूड उद्योग मोठ्या प्रमाणावर आहे. या देशात पाच राष्ट्रीय तर ४०२ निसर्ग उद्यानं आहेत. देशात वन्य प्राणीही मोठ्या प्रमाणावर आहेत. इथे युरो आणि 'लिथुआनियन लिटास' चलनांचा वापर केला जातो.

### स्टाईल स्टेटमेंट
## पादत्राणांचं मनोहारी विश्व

महिलांची फॅशन कपडे आणि ज्वेलरीपुरती मर्यादित नसते. पादत्राणं हा सुद्धा त्यांच्या स्टाईल स्टेटमेंटचा महत्त्वाचा भाग असतो. साडी., सलवार कमीज, कुर्ता, जीन्स, इव्हिनिंग गाउन अशा प्रत्येक प्रकारच्या प्रावरणाला साजेशी पादत्राणं महिलांच्या वॉर्डरोबची शान ठरत असतात. महिलांकडे पादत्राणांचे किमान तीन ते चार जोड असतातच. सध्या फॅशनविश्वात समर फुटवेअरचा ट्रेंड आहे. अर्थात ही पादत्राणं फक्त उन्हाळ्यातच नाही तर प्रत्येक मौसमात तुम्हाला कूल लूक देतील. पादत्राणांच्या अशाच काही हटके डिझाइन्सवर एक नजर टाकू या.

✻ कुर्ता-लेगिंग, सलवार-कमीज किंवा अगदी जीन्सवरही पंजाबी मोजड्या चालून जातात. पारंपरिक पेहरावाची शान ठरणाऱ्या पंजाबी मोजड्यांमध्ये प्रचंड वैविध्य पहायला मिळतं. लग्न, पार्टीसाठी पादत्राणं घ्यायचा विचार असेल तर शिमरी वर्कवाली मोजडी ट्राय करायला हरकत नाही. यासोबतच मिरर वर्क, थ्रेड वर्क, सीक्वेंस वर्क, नेट फ्रील, फ्लोरल प्रिंटवाल्या मोजड्याही घेता येतील. (क्रमश:)

### पंचांग

**शुक्रवार, २४ एप्रिल २०२६**
पराभवनाम संवत्सर शके १९४८, वैशाख शु. ८, चंद्रराशी : कर्क, नक्षत्र : पुष्य, योग : शूल, सूर्योदय ६.१७, सूर्यास्त ६.५७

### फॉरवर्ड्स

**ज़िन्दग़ी क़ा सफ़र कुछ यूं सुहाना होना चाहियें...**

**सितम चाहें हों हज़ार अंदाज़ शायराना चाहियें...!**

### फॅशन पॅशन


'चिनोज' हा मुलांच्या वॉर्डरोबमधला सर्वात वैविध्यपूर्ण असा बॉटमचा प्रकार. चिनोज अधिक आरामदायी असतात. ऑफिस लूकसाठी चिनोज कशा वापरायच्या याविषयी...

✻ ऑफिसमध्ये फॉर्मल ड्रेसकोड नसेल तर चिनोज विविध पद्धतींनी घालता येईल. तुमच्या चिनोजला जीन्स समजा. त्यावर कॅज्युअल टी शर्ट, प्लेड शर्ट किंवा दोन्ही घाला. यावर स्नीकर्स कॅरी करा.

✻ फॉर्मल लूकसाठी चिनोजवर चेक्स, प्लेन किंवा स्ट्राईपवाला शर्ट घालता येईल. यावर टायही लावता येईल. (क्रमश:)

### कार अँड बाईक
## काळजी कारची

आरामशीर प्रवासासाठी बरेच युवक कारला प्राधान्य देतात. स्वत:च्या कारमधून प्रवास करण्याची शानचं वेगळी असते. मात्र कारची स्वच्छता ही एक कटकटीची बाब ठरते. स्वच्छतेचे निकष पाळले नाहीत तर कारमध्ये दुर्गंध येतो. प्रदुषित हवेमुळे घुसमटल्यासारखं वाटतं. या समस्या सोडवण्यासाठी कार आयोनायझर सोबत ठेवा. यामुळे ताजेपणाची अनुभूती मिळू शकेल. ✻ कारमध्ये धूम्रपान केल्यानंतर धूर आणि वास भरून राहतो. त्याचा प्रभाव दूर करण्यासाठी कारमध्ये छानसा परफ्युम स्प्रे करा. ✻ कधीकधी कारच्या एसीमधूनही वेगळा वास येऊ लागतो. अशा वेळी कार एसी क्लीनरचा वापर करू शकता. कार एसी क्लीनरमुळे चांगला गंध येतोच शिवाय जंतूही मरून जातात. अँटीबॅक्टेरियल क्लीनर निवडा. ✻ कारच्या सीटमध्ये तसंच इतर ठिकाणी साठलेली धूळ काढून टाकण्यासाठी छोटा व्हॅक्युम क्लीनर मिळतो. या व्हॅक्युम क्लीनरमुळे आतली धूळ निघून जाते आणि कार चमकू लागते. ✻ कार स्वच्छ करण्यासाठी घरातला कपडा न वापरता मायक्रोफायबरचं कापड वापरावं लागतं. यामुळे कारवर स्क्रॅचेस पडत नाहीत आणि ती नवी कोरी दिसते.



### खेचाखेची
## उशीर

**शिक्षक:** उशीर का झाला शाळेत यायला ?

**चिंटू:** आई बाबा भांडत होते.

**शिक्षक:** त्याचा उशिरा येण्याशी काय संबंध?

**चिंटू:** माझा एक बूट आईच्या तर दुसरा बाबांच्या हातात होता.

### वेगळं काही

इटलीमधल्या काही शहरांमधल्या रस्त्यांवर कचऱ्याचे ढीग साचल्यामुळे तिथे लोक त्रासले आहेत. इटलीला येणाऱ्या पर्यटकांकडून कर वसूल केला जातो. त्यामुळे आमच्याकडून कर घेऊनही कचऱ्याच्या बाबतीत सरकार काहीच करत नसल्याचं तिथे येणाऱ्या पर्यटकांनी म्हटलं आहे. रोम हे ऐतिहासिक महत्त्व असलेलं पर्यटन स्थळ आहे. मात्र इथली मेट्रो स्थानकं, रेल्वे स्थानकं, प्रसिद्ध इमारती आणि रस्त्यांवर घाणीचं साम्राज्य पसरल्यामुळे सर्व जण चिंतेत आहेत. या समस्येमुळे रोमच्या महापौरांच्या राजीनाम्याची मागणी होते आहे. इटलीसारख्या पुढारलेल्या देशातही कचऱ्याची समस्या असल्याचं पाहून कोणालाही आश्चर्य वाटल्याशिवाय राहणार नाही.

### फॅशन पॅशन
## फॅन्सी स्लीव्हज

विविध धाटणीचे पेहराव शिवून घेताना बाह्यांमधील वेगळेपण लक्ष वेधून घेतं. वेगवेगळ्या प्रकारे बाह्या शिवून घेता येतात. अर्थातच यावेळी आपला कम्फर्ट आणि पेहरावाचा एकूण बाज लक्षात घ्यायला हवा. बाह्यांच्या स्टाईलमध्ये प्रयोग केले असता स्टायलिश लूक मिळतो शिवाय चांगला फीलही मिळतो. बाह्यांच्या अशा काही पॅटर्न्सवर नजर टाकू या...



✻ भारतीय पारंपरिक पेहरावामध्ये 'रफल स्लीव्हज' हा प्रकार शोभून दिसतो. ब्लाऊज, कुर्ते तसंच चोलीमध्ये अशा स्लीव्हजचा वापर केला जातो. रफल स्लीव्हजमुळे विशेष प्रसंगी घालायच्या कपड्यांची रंगत वाढेल. ✻ सध्या 'बेल स्लीव्हज' हा प्रकारही लोकप्रिय ठरत आहे. या स्लीव्हज पुढच्या बाजूने ढगळ असतात. पण बारीक हाताच्या युवतींनी बेल स्लीव्हज कॅरी करणं टाळावं. ✻ 'लॉंग केप स्लीव्हज'चा ट्रेंडही भरात आहे. ✻ पूर्ण बाह्यांमध्ये 'बॉक्सी स्लीव्हज'ची लोकप्रियता वाढली आहे. पाश्चिमात्य पेहरावांवर स्लीव्हजचा हा प्रकार खुलून दिसतो. या स्लीव्हज खालच्या बाजूने फुगीर असतात. हात जाड असतील तर अशा स्लीव्हज कॅरी करता येतील.

## सुडोकू ९५


| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ७ | | ९ | १ | | | | | |
| | ८ | | | ७ | २ | | | ६ |
| | | | ३ | | | | १ | ७ |
| | | | | | ९ | ७ | २ | ४ |
| ९ | | ७ | ६ | ४ | ३ | १ | | ८ |
| ५ | ४ | ८ | ७ | | | | | |
| ६ | ९ | | | | ५ | | | |
| ४ | | | ९ | ३ | | | ६ | |
| | | | | | ६ | ४ | | ९ |

**टीप -**
✻ या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ ह्न ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.
✻ आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.
✻ अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत.

## सुडोकू ९४ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ५ | ३ | ८ | १ | ६ | ४ | २ | ९ | ७ |
| ७ | ९ | २ | ८ | ५ | ३ | ६ | ४ | १ |
| १ | ४ | ६ | ७ | ९ | २ | ८ | ३ | ५ |
| ९ | ८ | ३ | ५ | ४ | ७ | १ | ६ | २ |
| ६ | ७ | १ | ९ | २ | ८ | ३ | ५ | ४ |
| ४ | २ | ५ | ६ | ३ | १ | ९ | ७ | ८ |
| ३ | ६ | ७ | २ | ८ | ५ | ४ | १ | ९ |
| २ | ५ | ४ | ३ | १ | ९ | ७ | ८ | ६ |
| ८ | १ | ९ | ४ | ७ | ६ | ५ | २ | ३ |

## शब्दकोडे क्रमांक ९५



**आडवे शब्द :-**
१) दिव्यातील पाच धाग्यांचीवळलेली वात
५) सहजगत्या,विनासायास
१०) राजसुख
१२) बडबड
१४) कापड विणण्याचे साधन
१५) चळवळ
१७) मर्कट
१८) खेकडा
२१) नूतन
२२) बगळा
२३) रत्नाकर
२५) रोख रक्कम
२७) धमकी
२९) नम्र, वाकणे
३१) नृत्यकलेचे दैवत
३३) भेग,चीर
३४) अंधार
३५) भार
३७) एक कोल्हापुरी दागिना
३८) दोरा
३९) वर्ष,सन
४१) समुद्रातील एक छोटा प्राणी
४२) काड्यांची सतरंजी
४४) जैन साधू
४६) शेळी
४८) विचारार्थ भरलेली बैठक
५०) बसण्याची फळी
५१) सामान
५२) वर्ण
५४) श्रीमंत ,सरदार
५५) कासोटा,ओटी,कंबर
५७) जास्तीत जास्त
६०) हत्तींचा राजा
६२) वेळ घालविणे
६३) युद्ध
६५) बागवान
६७) नंतर
६८) कार्य
६९) धुणे
७१) युक्ती
७३) री ओढणे, संमती दर्शविणे
७५) प्राचीन
७६) सरळ नसलेली,वक्र
७८) चकाकणे, प्रकाशित होणे
७९) धमनी
८१) शरीराची ठेवण
८२) उमानाथ
८४) अनर्थ,धक्का
८५) पांढुरका रंग
८७) अफवा
८९) श्रीविष्णूचे एक नाव
९१) कणीदार पीठ
९२) तुकडा
९३) धुंदी,कैफ
९४) मत्सर,शत्रुत्व
९५) पूर्ण नाश

**उभे शब्द :-**
१) आईसारखी आदरणीय व्यक्ती
२) छताच्या छिद्रातून जमिनीवर पडलेले उन
३) मार्ग,रस्ता
४) वेळूचे किंवा गहू,जवस इ.चे सत्व
६) भारवाहक
७) जागृतावस्था
८) नांगर
९) आयुष्य,पाणी
१०) पुरुषांच्या नावा पुढची पंत सारखी एक पदवी
११) कापडाची वा गादीची गुंडाळी
१३) टिंगल
१६) मध्यस्थ
१९) खराब,अमंगळ
२२) सुकामेव्यातील एक बी
२४) जाणे
२५) प्रत्येक दिवशी
२६) डफावर गाणे म्हणणारा
२८) हेतु,कारण
३०) आश्चर्य
३२) गवंडी
३६) एक गळीत धान्य
३८) धापा टाकणे
४०) काया
४१) नारायणराव पेशव्यांचे अखेरचे उदगार
४३) डाक
४४) माफ
४५) शेवटचे बारीक व लहान बोट
४७) सलवार बरोबरचा कुडता
४९) दूध भाकरी
५३) हत्ती
५६) अखंड
५८) चिकण माती
५९) रजनीनाथ
६१) रात्रीच्या रात्रीच
६३) एकरूप,तल्लीन
६४) राख

(उत्तर उद्याच्या अंकात)

## मागील शब्दकोड्याचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| क | र्म | वी | र | | वि | सा | वा | | म | ज | कू | र | | स | ल |
| ट्या | | र | य | त | | प | र | वा | न | गी | | वि | वा | ह | |
| र | सा | | न | | पो | ळा | | ता | | | मा | वा | | चा | स |
| | न | | दि | वा | ळी | | प्र | व | च | न | का | र | | रि | क्त |
| का | क | र | व | | भा | गा | का | र | | र | | | पा | णी | |
| नी | | | द | हे | ज | | र | ण | बा | व | रा | | लु | | मे |
| क | पा | र | | म | णे | र | | | ध | र | णी | कं | प | | ह |
| पा | ल | व | | ग | | स | हे | तु | क | | व | | द | मा | मा |
| ळी | | | अ | र्भ | क | | मा | मा | | कि | सा | न | | म | न |
| ओ | ग | रा | ळे | | व | र्त | मा | न | का | ळ | | ग | र | म | |
| र | वा | ना | | ना | | | लि | | वे | स | क | र | | रा | जा |
| ड | | व | च | ना | व | च | नी | | बा | | र्म | | का | त | |
| णे | | ना | | | र्ण | | | अं | ज | न | | सं | | ब | क |
| | ना | त | ल | ग | | व | रा | त | | र | हि | वा | स | | प |
| वा | ली | | व | र | क | स | | र | | मा | | द | म | दा | टी |
| चा | | ऋ | ण | | रा | न | टी | | वा | ई | ट | | र | म | |

# लखनऊ सुपर जायंट्सचा पराभवाचा चौकार

## घरच्या मैदानात आव्हान पेलण्यास अपयशी; राजस्थान रॉयल्स गुणतालिकेत दुसऱ्या क्रमांकावर

**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |**

राजस्थान रॉयल्सने रियान पराग याच्या नेतृत्वात आयपीएल स्पर्धेच्या १९ व्या मोसमात सलग ४ सामने जिंकून चाबूक सुरुवात केली. मात्र विजयी चौकारानंतर राजस्थानची गाडी विजयाच्या ट्रॅकवरुन घसरली. राजस्थानला सलग २ सामने गमवावे लागले. राजस्थानचा २२ एप्रिलला लखनऊ सुपर जायंट्स विरुद्ध सामना झाला होता. लखनऊनेही सलग ३ सामने गमावले होते. त्यामुळे लखनऊसमोर राजस्थान विरूद्धच्या सामन्यात २२ एप्रिल रोजी सलग चौथा पराभव टाळण्याचे आव्हान होते. मात्र, लखनऊ घरच्या मैदानात हे आव्हान पेलण्यात अपयशी ठरली. लखनौला एकाना स्टेडियममध्ये



१६० धावांचा पाठलाग करताना १८ ओव्हरमध्ये ऑलआऊट ११९ रन्सच करता आल्या. राजस्थानने अशाप्रकारे ४० धावांच्या मोठ्या फरकाने हा सामना जिंकला. राजस्थानला या विजयानंतर पॉइंट्स टेबलमध्ये फायदा झाला आहे. राजस्थानने लखनऊला पराभूत करत पॉइंट्स टेबलमधील टॉप २ मध्ये धडक दिली आहे. राजस्थानला विजयामुळे पॉइंट्स टेबलमध्ये २ स्थानांचा फायदा झाला आहे. राजस्थानने चौथ्या क्रमांकावरुन दुसऱ्या स्थानी झेप घेतली आहे. राजस्थानच्या विजयामुळे रॉयल चॅलेंजर्स बंगळुरु आणि सनरायजर्स हैदराबादची पिछेहाट झाली आहे. या दोन्ही संघांना १-१ स्थानने नुकसान झालं आहे. राजस्थान-लखनऊ सामन्याआधी हैदराबाद दुसऱ्या तर आरसीबी तिसऱ्या स्थानी होती.

राजस्थानला विजयामुळे नेट रनरेटमध्येही फायदा झाला आहे. राजस्थानचा नेट रनरेट हा आता +०.७९० असा आहे जो सामन्याआधी +०.५९९ असा होता. राजस्थानच्या खात्यात आता ७ सामन्यानंतर १० गुण झाले आहेत. राजस्थान रॉयल्स ५ सामने जिंकणारी मोसमातील दुसरी टीम ठरली आहे. राजस्थानआधी पंजाबने ५ सामने जिंकण्याची कामगिरी करुन दाखवली आहे.तर लखनऊ पराभवानंतरही नवव्या स्थानी कायम आहे. लखनौला या पराभवाचा नेट रनरेटमध्ये फटका बसला आहे. लखनऊचा हा ७ सामन्यानंतर पाचवा पराभव ठरला, त्यामुळे त्यांचा नेट रनरेट हा -१.२७७ असा झाला आहे.

### पंजाब टेबल टॉपर

**दरम्यान पंजाब किंग्स पॉइंट्स टेबलमध्ये पहिल्या स्थानी कायम आहे. पंजाब या मोसमातील एकमेव अजिंक्य टीम आहे. पंजाबने ६ पैकी ५ सामने जिंकले आहेत. तर पंजाबचा केकेआर विरुद्धचा सामना हा पावसामुळे रद्द करण्यात आला. त्यामुळे दोन्ही संघांना प्रत्येकी १-१ गुण देण्यात आला. त्यामुळे पंजाबच्या खात्यात ११ गुण आहेत.**

विनायक दळवी

## दोन जुनी खोडं; त्यांच्या संघर्षाचे मार्केटिंग



दोन दिग्गजांमधील संघर्ष म्हणजे रोहित शर्मा आणि महेंद्रसिंग धोनी भारताच्या या दोन महान खेळाडूंमधील लढतीचा खूपच मोठे चित्र रंगवण्यात आले होते. खरंतर हे दोन खेळाडू गेली कित्येक दोन दशके, एकत्रितपणे आणि एकमेकांविरुद्ध खेळत आले आहेत. त्यांच्या एकमेकांसमोरच्या संघर्षाला विशेष महत्त्व देण्याइतक काहीच नव्हतं. २००६ मध्ये चेन्नई येथे झालेल्या ५० षटकांच्या चॅलेंजर ट्रॉफीमध्ये ते पहिल्यांदा एकाच मैदानावर एकत्र खेळले होते. रोहित शर्मा 'इंडिया रेड' संघाकडून आणि धोनी 'इंडिया ब्लू' संघाकडून खेळला होता. संघसहकारी किंवा प्रतिस्पर्धी म्हणून त्यांनी खेळलेल्या ६५२ सामन्यांपैकी तो पहिला सामना होता.आज, गुरुवारी, या गोष्टीला जवळपास २० वर्षे पूर्ण झाल्यावर, रोहित आणि धोनी पुन्हा एकदा एकाच मैदानावर वानखेडे स्टेडियमवर, आमने सामने आले. दोन्हीने सरावा दरम्यान केवळ फलंदाजीच केली नाही, तर यष्टीरक्षणही केले. यावरून असे सूचित होते की तो आपल्या त्रासदायक पोटऱ्यांना, सामन्यासाठी तयार करत होता. रोहित आणि धोनी हे दोघेही आपापल्या संघाचे अजूनही प्रमुख खेळाडू आहेत. दोन्ही खेळाडू आपापल्या फ्रँचायझींचे चेहरे आहेत, हे त्यांच्या कौशल्याचे द्योतक आहे, परंतु याकडे एक प्रकारचा दोषारोप म्हणूनही पाहिले जाऊ शकते. हे या गोष्टीचे प्रतीक आहे की आयपीएलमधील दोन सर्वात यशस्वी संघ इतर, संघांच्या तुलनेत किती मागे पडले आहेत. आता ते आपले वर्चस्व प्रस्थापित करत आहेत.

काळ खरोखरच बदलला आहे. पूर्वीप्रमाणे केवळ नावावर किंवा गत कौशल्यावर आयपीएल स्पर्धा खेळता येत नाही. प्रामुख्याने हा खेळ आता तरुण खेळाडूंचा होत चालला आहे. खेळाप्रमाणेच या खेळातील काही आयुध देखील अधिक परिणामकारक निकाल देऊ लागलेत. म्हणजे एखादी विशिष्ट पद्धतीची बॅट असेल तर त्यामुळे चेंडू अधिक खोलवर जाऊन पडतो. त्यामुळे यंदाच्या आयपीएस स्पर्धेत आपण पाहिलं असेल, की प्रत्येक खेळाडूची बॅट तो मैदानात शिरताना तपासली जाते. बॅटची लांबी रुंदी आणि जाडी, चेंडू ज्याप्रमाणे रिंगमधून तपासला जातो तशी तपासली जाते. कोणताही अनैसर्गिक फायदा जर खेळाडूला होत असेल तर अशा गोष्टी वाढत राहणार. म्हणजे एकीकडे प्रेक्षकांना आकर्षित करण्यासाठी डीजे, रंगीबेरंगी लाईट्स, म्युझिक, मोठे स्क्रीन, फोटोग्राफी याद्वारे, यामुळे तरुणाई आकर्षित करायची.दुसरीकडे खेळाडूंना त्यांचे कौशल्य दाखवण्यासाठी अधिकाधिक युक्त्या योजून मदत करायची.क्रिकेट हा आता खेळ राहिला नाही तर एक इंडस्ट्री उद्योग बनला आहे. आणि आयपीएल या उद्योगातील एक चलनी नाणं आहे. त्यामुळे अधिकाधिक प्रयोग या आयपीएलमध्येच केले जाणार यात शंका नाही.

## माजी जगज्जेता बॅडमिंटनपटू ॲक्सल्सेनची निवृत्ती

**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |**

दोन वेळचा ऑलिम्पिक आणि जागतिक विजेता डेन्मार्कचा बॅडमिंटनपटू व्हिक्टर ॲक्सल्सेनने वयाच्या ३२ व्या वर्षी निवृत्तीची घोषणा केली आहे. गेल्या काही काळापासून दुखापतींनी त्रस्त असलेल्या ॲक्सेल्सेनने शरीरच आता थांबायला सांगत आहे, असे म्हणत बॅडमिंटनला अलविदा करण्याचा निर्णय जाहीर केला.

ॲक्सल्सेन पाठीच्या त्रासामुळे गेल्या वर्षी ऑक्टोबरपासून स्पर्धात्मक बॅडमिंटनपासून दूर आहे. या त्रासामुळे त्याच्यावर शस्त्रक्रिया करावी लागली होती आणि त्यानंतर तो तीव्र वेदनांनी त्रस्त होता. तीन वेळचा युरोपीय विजेता असलेल्या ॲक्सल्सेन याने बुधवारी निवृत्तीच्या निर्णयाची घोषणा केली. गेल्या काही काळापासून पाठीच्या दुखण्याशी झुंज देत आहे. गेल्या वर्षी एप्रिलमध्ये शस्त्रक्रिया झाल्यानंतर आणि दीर्घ पुनर्वसन प्रक्रियेतून गेल्यानंतरही, दुर्दैवाने ऑक्टोबरमध्ये मला पुन्हा त्रास सुरू झाला. तेव्हापासून आवश्यक असलेल्या पातळीवर खेळणे किंवा सराव करणे शक्य झाले नाही. वेदनांमुळे मी सराव करू शकलो नाही आणि म्हणूनच मला हा अत्यंत कठीण निर्णय घेण्यास भाग पडले,असे ॲक्सल्सेन म्हणाला. त्याने सलग १८३ आठवडे जागतिक क्रमवारीत अग्रस्थान राखले होते. दम्यासारख्या आजाराचा सामना करत ॲक्सल्सेनने टोक्यो आणि पॅरिस ऑलिम्पिकमध्ये सलग सुवर्णपदके जिंकली.

२०१७ व २०२२ मध्ये तो जगज्जेता ठरला. याशिवाय युरोपीय अजिंक्यपद स्पर्धेमध्ये सुवर्णपदक जिंकणाऱ्या डेन्मार्क संघाचा तो सहा वेळा भाग होता. ज्या सर्जनने माझ्यावर गेल्या वर्षी शस्त्रक्रिया केली आणि ज्या डॉक्टरांकडे मी उपचार घेत होतो, त्यांच्याशी सल्लामसलत करूनच निवृत्तीचा निर्णय घेतल्याचेही ॲक्सल्सेन म्हणाला होता.

## बुद्धिबळ स्पर्धेत मुक्ताईचे खेळाडू चमकले

**| सावंतवाडी | प्रतिनिधी |**



मडगाव येथील युनिटी क्लबने आयोजित केलेल्या चौथ्या राष्ट्रीय रॅपिड रेटिंग बुद्धिबळ स्पर्धेत बाळकृष्ण पेडणेकर याने बाविसावा क्रमांक पटकावला. स्पर्धेचे आयोजन नागोवा, मडगाव येथील स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स हॉलमध्ये करण्यात आले. विविध राज्यांतील ३२१ खेळाडूंनी स्पर्धेत सहभाग घेतला. सिंधुदुर्ग जिल्ह्यातून येथील मुक्ताई अकॅडमीचे आंतरराष्ट्रीय मानांकित बाळकृष्ण पेडणेकर, पुष्कर केळूसकर, विघ्नेश अंबापूरकर तसेच प्रज्वल नार्वेकर, आकाश वाटवे यांनी सहभाग घेतला. यावेळी रॅपिड रेटिंग स्पर्धेसोबत ब्लिट्ज नॉनरेटिंग स्पर्धेचे देखील आयोजन करण्यात आले. ब्लिट्ज नॉनरेटिंग स्पर्धेत नऊ फेऱ्यांमध्ये सहा जिंकून आणि एक बरोबरीत सोडवून साडेसहा गुणांसह एकोणिसावा क्रमांक मिळवला. त्याला रोख रक्कम देऊन गौरविण्यात आले. रॅपिडमध्ये पुष्कर केळूसकर याने सहा फेऱ्या जिंकून सहा गुणांसह आपल्या आंतरराष्ट्रीय रेटिंगमध्ये तब्बल ५४ गुणांची वाढ केली. मुक्ताई अकॅडमीचा जिल्ह्यातील लहान खेळाडू सात वर्षीय आकाश वाटवे याने पहिल्यांदाच राष्ट्रीय स्पर्धेत सहभाग घेऊन उत्कृष्ट खेळ केला होता.

## खेळाडूंच्या भवितव्याशी खेळ

**वाडा :** तालुक्यातील कोने येथील तालुका क्रीडा संकुलाचे बांधकाम वादात सापडले आहे. या कामासाठी गंज लागलेल्या लोखंडाचा वापर करण्यात येत असल्याने मनसेच्या पदाधिकाऱ्यांनी कामाची पाहणी करून बंद पाडले आहे. तालुक्यासाठी अभिमानास्पद असलेल्या क्रीडा संकुलाबाबत मनसे सुरुवातीपासून आक्रमक आहे. हे संकुल उभे राहण्यासाठी गेली १० वर्षे सातत्याने पाठपुरावा केला जात आहे. तालुकास्तरापासून जिल्हास्तरापर्यंत वेगवेगळ्या अधिकाऱ्यांच्या भेटी घेऊन कामासाठी पुढाकार घेतला होता.

## जलतरण स्पर्धेत सियाला दुहेरी रौप्यपदक

**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |**



अहमदाबादच्या जलतरण तलावात महाराष्ट्राच्या सियाने पुन्हा एकदा आपली ताकद दाखवून दिला. खेलो इंडिया अस्मिता राष्ट्रीय जलतरण स्पर्धेत सिया देवरुखकरने दुहेरी रौप्यपदक जिंकत क्रीडाक्षेत्रात आपला दबदबा निर्माण केला. विलेपार्लेच्या प्रबोधनकार ठाकरे क्रीडा संकुलात सराव करणाऱ्या या जलतरणपटूची मेहनत अखेर पदकांमध्ये परिवर्तित झाली. वीर सावरकर क्रीडा संकुलात पार पडलेल्या स्पर्धेत १८ वर्षाखालील गटात सियाने अप्रतिम कामगिरी केली. ५० मीटर ब्रेस्ट स्ट्रोक आणि १०० मीटर ब्रेस्ट स्ट्रोक या दोन्ही प्रकारांत तिने रौप्यपदकावर नाव कोरले. तिच्या स्ट्रोक्सची अचूकता आणि वेग पाहून प्रतिस्पर्ध्यांनाही चक्रावून टाकले. फ्रीस्टाईल प्रकारातही सियाने चांगली झुंज दिली. ५० मीटर आणि १०० मीटर फ्रीस्टाईलमध्ये ती पाचव्या स्थानावर राहिली, पण तिचा जिद्दीचा खेळ प्रेक्षकांच्या मनात घर करून गेला. तिच्या या दुहेरी रौप्य कामगिरीने आगामी स्पर्धांसाठी तिच्याकडून सुवर्ण कामगिरीची अपेक्षा आणखी उंचावली आहे.

## शार्दुल, सिद्धेशला 'क्रिकेटर ऑफ द इयर'

**| मुंबई | प्रतिनिधी |**

मुंबई क्रिकेट असोसिएशनने बुधवारी एका दिमाखदार सोहळ्यात २०२४-२५ आणि २०२५-२६ या दोन हंगामांतील उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या खेळाडूंचा गौरव केला. भारतीय संघाचा अष्टपैलू शार्दुल ठाकूर आणि फलंदाज सिद्धेश लाड यांना मवर्षातील सर्वोत्तम ज्येष्ठ क्रिकेटपटूफया पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. भारताला विविध वयोगटात वर्ल्ड कप स्पर्धेचे जेतेपद जिंकून देणाऱ्या मुंबईकर खेळाडूंचा आणि प्रशिक्षकांचा यावेळी विशेष गौरव करण्यात आला. १९ वर्षांखालील वर्ल्ड कप विजेत्या भारतीय संघाचे नेतृत्व करणाऱ्या आयुष म्हात्रे याच्यासह सूर्यकुमार यादव, शिवम दुबे, जेमिमा रॉड्रिग्ज आणि प्रशिक्षक अमोल मुजुमदार यांचा सत्कार करण्यात आला.

ज्येष्ठ क्रिकेटपटू चंद्रकांत पाटणकर, शोभा पंडित, श्रीकांत तिगदी, रवींद्र सावंत यांना जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. सूर्यकुमार यादव, शिवम दुबे, आयुष म्हात्रे, अभिज्ञान कुंडू. जेमिमा रॉड्रिग्ज, अमोल मुजुमदार, आविष्कार साळवी यांचा सत्कार करण्यात आला

## चीतपट स्पर्धेत पृथ्वीराज विजेता

**विक्रमगड :** झडपोलीतील जिजाऊनगरीत राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेत २०२५ चा महाराष्ट्र केसरी पृथ्वीराज मोहोळने अटीतटीच्या लढतीत हिंद केसरी भारत मदनेला चीतपट केले. जिजाऊ शैक्षणिक व सामाजिक संस्थेचे संस्थापक नीलेश सांबरे यांच्या सुवर्णमहोत्सवी वाढदिवसानिमित्त झडपोलीत ही स्पर्धा भरवण्यात आली होती. राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेत राज्यभरातील ४०० हून अधिक कुस्तीपटूंनी सहभाग नोंदवला. महाराष्ट्राच्या मातीतील अस्सल रांगडा खेळ पाहण्यासाठी कुस्तीप्रेमींनी मोठी गर्दी केली होती.

## सॅफ महिला फुटबॉल स्पर्धेत भारत-बांगलादेश एकाच गटात

**| गोवा | प्रतिनिधी |**



गोव्यात होणाऱ्या सॅफ महिला अजिंक्यपद फुटबॉल स्पर्धेचा ड्रॉ बुधवारी काढण्यात आलाद्र त्यानुसार पाच वेळचा विजेता यजमान भारत आणि गतविजेता बांगलादेश संघ एकाच गटात आले आहेत. मालदीव ब गटातील तिसरा संघ आहे.

एकूण सहा संघांची समावेश असलेली स्पर्धा २५ मेपासून फातोर्डा येथील पंडित जवाहरलाल नेहरू स्टेडियमवर खेळली जाईल.

दक्षिण आशियाई फुटबॉल महासंघाचे (सॅफ) सचिवालय बांगलादेशमधील ढाका येथे तेथे बुधवारी ड्रॉ काढण्यात आला. अ गटात गतउपविजेता नेपाळ, श्रीलंका व भूतान हे संघ आहेत.

दोन्ही गटांतील अव्वल दोन संघ उपांत्य फेरीत पात्र ठरतील. क्रमवारीनुसार ड्रॉसाठी भारत व नेपाळ, बांगलादेश व श्रीलंका, भूतान व मालदीव अशी विभागणी करण्यात आली होती.स्पर्धेची गटवारी अ गट : नेपाळ, श्रीलंका, भूतान ब गट : भारत, बांगलादेश, मालदीव या गटात आहेत.

## विश्वचषकापूर्वी संघाची चिंतेत वाढ

**| जोहान्सबर्ग | वृत्तसंस्था |**

भारत आणि दक्षिण आफ्रिकेच्या महिला क्रिकेट संघांमध्ये टी-२० आंतरराष्ट्रीय मालिका खेळली जात आहे. आतापर्यंत तीन सामने खेळले गेले असून, भारतीय संघ तिन्ही सामन्यांत पराभूत झाला आहे. भारतीय संघ पराभूत झाला असला तरी, भारतीय आणि दक्षिण आफ्रिकेच्या संघांनी एक अशी कामगिरी केली आहे जी यापूर्वी कधीही झाली नव्हती. सुमारे दोन वर्षांपूर्वी प्रस्थापित झालेला एक विक्रम मोडला गेला आहे.

२०२६ च्या महिला टी-२० विश्वचषकापूर्वी भारतीय महिला संघ दक्षिण आफ्रिकेच्या दौऱ्यावर आहे. तिथं पाच सामन्यांची टी-२० मालिका खेळली जात आहे. पहिले तीन सामने गमावल्यानंतर भारतानं ही मालिका गमावली आहे. तिसऱ्या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना भारतीय संघाने २० षटकांत ४ गडी गमावून १९२ धावा केल्या. दक्षिण आफ्रिकेने हे लक्ष्य केवळ एक



गडी गमावून १६.३ षटकांत पूर्ण केलं. दक्षिण आफ्रिकेची कर्णधार लॉरा वॉल्व्हार्डने ५३ चेंडूंमध्ये ११५ धावा करुन शानदार शतक झळकावलं. या खेळीत तिनं १४ चौकार आणि ५ षटकार मारले.

## तीन क्रिकेटपटूंवर क्रिकेटबंदी

**नवी दिल्ली :** १९ वर्षांखालील संघाचे कोच वेंकटरामन यांच्यावर जीवघेणा हल्ला केल्याच्या गंभीर आरोपामुळे पुद्दुचेरी क्रिकेटमध्ये मोठी खळबळ उडाली आहे. पुद्दुचेरी क्रिकेट संघटनेने प्रथम श्रेणीत तीन क्रिकेटपटूंवर तत्काळ निलंबनाची कारवाई करत कठोर पाऊल उचलले आहे. जे. कार्तिकयन, ए. अरविंदराज, एस. संतोष कुमारन या तिघांवर हत्येच्या प्रयत्नाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यामुळे तिघांवर संघाच्या सर्व उपक्रमांमध्ये सहभागी होण्यास बंदी घालण्यात आली आहे.

### गुकेश, वैशालीसमोरचा मार्ग खडतर | उझबेकिस्तान, चीनचे मोठे आव्हान

# बुद्धिबळात दुहेरी जगज्जेतेपदांची संधी

**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |**

बुद्धिबळात पुरुष आणि महिला जगज्जेते एकाच देशाचे असण्याची किमया आजवर केवळ दोनच देशांना साधली होती. भारत त्या मार्गावर आहे. पण दोम्माराजू गुकेश आणि रमेशबाबू वैशाली या दोघांसमोरचे अंतिम आव्हान खडतर आहे.

गुकेश तर विद्यमान जगज्जेता आहे. या वर्षाच्या अखेरीस त्याच्या जगज्जेतेपदास आव्हान देईल उझबेकिस्तानचा ग्रँडमास्टर जावोखिर सिंदारोव. वैशाली जगज्जेतेपदापासून एक पाऊल दूर आहे. पण तिच्या मार्गात उभी आहे चीनची विद्यमान बुद्धिबळ जगज्जेती जू वेनजून. वैशाली आणि सिंदारोव या दोघांनी नुकतीच सायप्रस येथील कॅंडिडेट्स स्पर्धा जिंकली.



गुकेश २०२४च्या डिसेंबरमध्ये जगज्जेता बनला. त्या वर्षी त्याने बुद्धिबळ ऑलिम्पियाडमध्येही चमक दाखवली होती. पण गतवर्षी त्याच्या खेळातील धार काहीशी कमी होऊ लागली. अनेकदा संधी असूनही तिचे विजयात रूपांतर करण्यात तो कमी पडत होता. काही वेगळे प्रयोग करून पाहिले, पण त्याचाही उपयोग झाला नाही. गुकेश २०२४ च्या अखेरीस २७९४ एलो गुणांवर होता. त्याला प्रथमच २८०० एलो गुणांचा टप्पा गाठण्याची संधी होती. पण गतवर्षी सुरुवातीपासून त्याचा खेळ त्याच्या लौकिकास साजेसा फारसा झाला नाही.

सध्याची स्थिती पाहता गुकेशविरुद्ध जगज्जेतेपदाच्या लढतीमध्ये सिंदारोवचे पारडे जड असल्याचे अनेकांना वाटते. सिंदारोवने कॅंडिडेट्स स्पर्धेत सलग तीन डावांमध्ये भारताचा रमेशबाबू प्रज्ञानंद, अमेरिकेचे फॅबियानो करुआना आणि हिकारू नाकामुरा यांना हरवून दाखवले. प्रज्ञानंदला तर त्याने दोन वेळा हरवले. विशेष म्हणजे हे तिघेही कॅंडिडेट्स अजिंक्यपदाचे प्रबळ दावेदार मानले जात होते. पण सिंदारोवच्या झपाट्यासमोर त्यांना संधीच मिळाली नाही. सिंदारोवने १४ पैकी १० गुण मिळवत ही स्पर्धा विक्रमी पद्धतीने जिंकली. आज सिंदारोव २७७५ एलो गुणांसह जागतिक क्रमवारीत पाचव्या स्थानावर आहे.

**वैशालीचा देदीप्यमान विजय**

कॅंडिडेट्स स्पर्धेत खुल्या गटात प्रज्ञानंदकडून अपेक्षा बाळगल्या जात होत्या. पण त्याची बहीण वैशालीने महिलांच्या गटात अनपेक्षित बाजी मारली. विशेष म्हणजे आठही बुद्धिबळपटूंमध्ये तिचे गुणांकन तळाचे होते. तरीदेखील झू जिनर, तान झोंग्यी अशा मातब्बर चिनी बुद्धिबळपटूंसमोर वैशाली धीराने खेळली. तिने पाच विजय मिळवले. भारताची दिव्या देशमुख सुरुवातीस चांगली खेळली, पण नंतर तिची लय हरवली.जागतिक क्रमवारीत पहिल्या चारही बुद्धिबळपटू चिनी आहेत. गेली दहा वर्षे जगज्जेत्याही चिनी बुद्धिबळपटूच आहेत. विद्यमान जगज्जेती चीन-जू वेनजून आठ वर्षांपासून जगज्जेती आहे.

पाचवे पुण्यस्मरण



कै. लक्ष्मण दत्तू पिंगळे

स्वर्गवास - २४ एप्रिल २०२१

ना ध्यानी, ना मनी, तुम्ही गेलात आम्हा सोडूनी
स्मृतीस तुमच्या वंदन करुनी, काय लिहावे उदास होऊनी
क्रूर नियतीने कसा केला घात,
आज नाहीत तुम्ही आमच्या सहवासात
तुमच्या पवित्र स्मृती आम्हा सर्वांची

भावपूर्ण श्रद्धांजली

पत्नी- विजया लक्ष्मण पिंगळे, मुलगे- जनार्दन, राजन सुना-ज्योत्स्ना, रिता नातसून- अंकिता, समृद्धी मुली- मेघना, विणा, जयश्री जावई- मेघनाथ, विष्णू, राजेंद्र, समीर, महेंद्र, विनायक. नातवंडे - मयुरी, परेश, स्नेहा, रोहित, प्रणाली, प्रतिक, मंजिरी, सोनल, साहिल, प्रणय, पतवंडे- नैतिक, ईश, अर्श, समस्त पिंगळे परिवार

मु.पो. कुर्डूस, ता. अलिबाग, जि. रायगड

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुला९बा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)